TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192773
UNIVERSAL LIBRARY

# कोंडा--कणी

[ लघुकथा संग्रह पांचवा ]

लेखक

ना. ह. आपटे

★

सन १९४४ ]

[ मूल्य २ रुपये

प्रकाशक :

वा. रा. पेंडसे

व्यवस्थापक—आपटे मंडळी ( कोरेगांव ). शाखा पुणें २.

---

चित्रकार—श्री. दलाल, मुंबई ४.

कव्हर छपाई—न्यू मनोहर प्रेस, मुंबई ४

---

मुद्रक :

ज. ग. जोशी

म. स. लिमिटेडच्या प्रेस, ३९४ सदाशिव, पुणें २

माझ्या ताटांत असलेली कोंडाकणी टिपून

मला आनंद देणारीं माझीं पाखरें

# चि. मंगल,

# मुकुंद,

# प्रभावती

यांना ही शाब्दिक कोंडाकणी

प्रेमपूर्वक अर्पण.

—लेखक.

# परामर्श

आमचे कोरेगावचे साहित्यिक मित्र रा. नारायण हरी आपटे याच्या प्रस्तुत पुस्तकाला मी प्रस्तावना लिहावी अशी विनती त्याच्या प्रकाशकानी मला केली ती मान्य करण्यात मला आनद वाटतो पण सकोचहि वाटतो. वास्तविक अशा प्रस्तावनेचे काहींच कारण नाहीं. कारण साहित्यिक या नात्यानें आपटे यानी आज २०—२५ वर्षे इतकें वाङ्मय वाचकापुढें ठेविलेले आहे व त्याचा स्वीकार वाचकवर्गानें इतका आदरपूर्वक केलेला आहे कीं, एखाद्या वडीलकीच्या नात्याच्या साहित्यिकाने त्याच्या एखाद्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून त्याना मोठीशी कीर्ति किंवा प्रसिद्धी पूर्वी जी मिळाली नाहीं ती आता मिळणार असे थोडेच आहे! तथापि त्याच्या साहित्याविषयीं मला जें वाटते ते प्रगट करण्याची ही एक सधी साधावी एवढ्याच बुद्धीनें प्रकाशकाची ही विनती मी मान्य केली. रा. आपटे हे कोरेगावसारख्या एका बाजूच्या लहानशा गावीं राहून छापखाना व वाङ्मय याच्या साधनानें आपली उपजीविका करीत राहिले यामुळे त्याच्या साहित्याची थोडीबहुत उपेक्षा झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसें पाहिलें तर त्याच्या अनेक पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या यावरून वाचकवर्गानें तरी त्याची उपेक्षा केली नाहीं हें खास. परतु उपेक्षा हा शब्द या अर्थानें मी योजू इच्छितो कीं, पुण्यामुबईसारख्या शहरीं ते राहते तर लोकदृष्ट्या ते प्रमुख साहित्यिकाच्या मेळ्यात बावरताना जितके दिसले असते तितके ते एका बाजूस पडल्यामुळें

दिसले नाहींत. साहित्य समेलनाच्या अध्यक्षपदाकरिता जी नावें प्रायः सुचविण्यात येतात त्यात त्याचा समावेश होण्यासारखाच होता. आपटे यांचे वाङ्मय ललित या प्रकारापेक्षा बोधप्रद या प्रकाराकडे अधिक झुकते. यामुळें आजकालच्या झगझगीत कादबऱ्या वाचल्यानें तरुण वाचकवर्गाच्या मनावर जी छाप पडल्याचे आपण पाहतो ती त्याच्या वाङ्मयानें पडत नसावी असे मला वाटते. परतु त्याचे वाङ्मय बोधप्रदतेच्या हेतूनें लिहिलें असलें तरी त्यात त्याची प्रज्ञा व प्रतिभा म्हणजे ज्ञान व ते प्रगट करण्याची कला ही विचारी मनाला मान्यच करावी लागतात. त्याचें वळण काहीसे कै. हरी नारायण आपटे याच्यासारखे आहे, म्हणजे त्याच्या ललितवाङ्मयाचे विषय मध्यम प्रतीच्या किंबहुना त्या मध्यम प्रतींतीलहि त्यातल्या त्यात गरीब प्रतीच्या समाजाच्या जीवनातून घेतलेले असतात. आणि मोठमोठ्या शहराची वस्ती सोडून खेडेगावच्या समाजातील ज्या जीवनाचा त्याना प्रत्यक्ष अनुभव मिळतो त्याचा उपयोग त्यानी लघुकथा व कादंबऱ्या यातून केलेला आहे. ते अगदीं सनातनी नसले तरी, आधुनिकात आधुनिक असे जे नागर जीवन त्याचें आकर्षण त्याच्या बुद्धीला फारसे वेधू शकत नाहीं. महाराष्ट्र समाजातील जुन्या जीवनात जे सद्गुण आढळतात ते स्थायी व्हावे हें ध्येय त्यानी आपल्या वाङ्मयात डोळ्यापुढें ठेविलेले दिसते. आणि या दृष्टीनें त्यानी आपल्या कादबऱ्याद्वारे पुष्कळच यश मिळविलें असे निश्चित म्हणता येते. तथापि प्रतिभेच्या गुणानें वाङ्मयाचे जे प्रकार लेखकाला सुचतात तेहि त्यानी हाताळले आहेत. यामुळें त्याच्या लघुकथा व कादबऱ्या यातून गुप्त अभिप्रायात्मक थट्टेखोर बाह्मणेदार अशींहि कथानके आढळतात त्याची भाषा साधी सोपी असून तींत पाडित्य प्रदर्शनाचे अवडंबर नाहींच म्हटलें तरी चालेल.

कोरेगावसारख्या ठिकाणी छापखाना चालविल्यानें त्यांची जीवनयात्रा व्हावी तशी फलप्रद झाली नाहीं. लक्ष्मी व सरस्वती यांचे वैर पुरातन आहे. हें जाणून त्यानी ज्या समाधानी वृत्तीनें आपला संसार केला ती त्यांना भूषणास्पदच ठरेल. त्यानी एक दोन बोलपटाची कथानके लिहिलेली प्रसिद्ध आहेतच.तथापि बोलपट लेखकाला जी सोन्याची खाण सापडते अशी सामान्यतः समजूत आहे तीहि दुर्दैवानें त्याना लाभली नाहीं असे म्हणतात. तथापि त्याचा 'कुकू' हा बोलपट पाहून प्रेक्षकानीं केलेली स्तुती तरी कोणाला आपल्या अन्यायी कृपणपणामुळे हिरावून घेता आली नाहीं. स्वतः माझा व आपटे याचा परिचय फारच थोडा आहे. तथापि चागल्या साहित्यिकाच्या गणणेच्या दृष्टीनें मी जेव्हा महाराष्ट्रभर नजर फिरवितों तेव्हा कोरेगावावर ती काहीं काळ खिळून राहाते. यात शका नाहीं असो प्रारभीं सागितल्याप्रमाणें रा. आपटे याच्या सबधानें असलेली माझी भावना प्रगट करण्याकरिताच केवळ या प्रस्तावनेची सधी मी साधली. म्हणून एवढें बोलून ही प्रस्तावना पुरी करितो.

—न. चि. केळकर

# प्रकाशकाकडून

— * —

कोंडाकणी हा श्री. ना. ह. आपटे यांनीं लिहिलेल्या लघुकथांचा संग्रह आहे. यातील सर्व लहान मोठ्या कथा या पूर्वी निरनिराळ्या साप्ताहिकातून आलेल्या असून त्या त्या त्यावेळीं वाचकाना आवडल्या असल्याचें दिसते. लघुकथासंबधीं असलेल्या मन्त्रातन्त्रांत त्या कोठवर बसतात, हें टीकाकारानी ठरवावें. आम्ही एवढेंच सांगतों— लघुकथा लेखक म्हणून श्री. ना. ह. आपटे गाजत नसतां त्याच्या कथाचा हा पाचवा भाग होय. * पहिल्या चारी भागाप्रमाणें हा भागहि महाराष्ट्रातील गुणग्राही वाचकाच्या आश्रयास पात्र होईल असा आम्हास विश्वास आहे.

या भागात आलेल्या कथापैकीं कोणतीहि कथा वाचावी व आपल्या भोवतालच्या जगात पहावें. वाचकाना त्याची अनुभूती स्पष्ट झाल्यावांचून राहणार नाहीं. पहिली कथा—अक्षर काव्य. हिचें रहस्य शेवटच्या दोन ओळींत असून लघु लघुकथेचा तो एक उत्कृष्ट नमुना आहे. शेवटची कथा आहे—मूषक नी माणूस. आजच्या संसारी मनुष्याला तिचें रहस्य फोडून सागण्याचें कारण नाहीं. मानवी जीवनाविषयीं उदरासारख्या प्राण्यानें विचार करावा व जाता जाता मनुष्य जातीला दोन कोपरखळ्या द्याव्या हे हास्यास्पद असलें तरी विचार करण्यासारखे नाही असें कोण म्हणेल.

---

* १ बनारसी बोरें, २ आराम विराम, ३ सुमनगन्ध, ४ हसा किंवा रुसा. हे निघालेले पहिले चार भाग होत.

**टेऊ टुक मांदा**—नाव चमत्कारिक आहे. ही एक आफ्रिकन **लोक कथा** (Folklore) आहे. मोठी चित्ताकर्षक आहे असें नव्हे, पण एका वाचकानें ती वाचल्यावर तो तिची शिफारस इतराना करील, असें वाटतें.

**इंपा छाप** ब्रॅंडी झोकणारा तरुण वाचकाना इथें तिथें आढळेल. पण या पलीकडे जास्त परिचय नको. वाचकाच्या पुढें संग्रह ठेवलेला आहे त्यानी त्याचा योग्य तो परामर्श घ्यावा.

आम्ही **आपटे मंडळीचें** प्रकाशन स्वस्तःकडे घेऊन पुण्यास कार्यालय थाटलें व एका वर्षात पाच सहा पुस्तकें वाचकाच्या सेवेंत सादर केली. तेव्हा या कार्यास कोणा ज्येष्ठ साहित्तिकाचा आशीर्वाद मिळावा, अशी स्वाभाविक इच्छा झाली. श्री. ना. ह. आपटे याना विचारता त्यानी साहित्यसम्राट श्री. तात्यासाहेब केळकर याच्याकडे बोट दाखवले. आम्हाला ती सूचना सर्वस्वी योग्य वाटली. तेव्हा आम्ही थोडें धाडस करून साहित्यातील या 'महादेवा'कडे भीत भीतच गेलों व विनंति केली. नकार मिळेल की काय? ही धास्ती होती. पण अनुभव उलटा आला. श्री. तात्यासाहेबाना लेखक आपटे याच्या विषयीं काय वाटते तें त्यानी चटकन् लिहून दिले! आम्हाला सार्थक वाटलेंच पण श्री. ना. ह. आपटे याना हा **आशिर्वाद** प्रोत्साहक वाटला!—या कृपेबद्दल आम्ही श्री. तात्यासाहेबाचे फार आभारी आहो.

वाचकाची अशीच सेवा घडत राहावी, असें मनापासून वाटते. प्राप्त परिस्थिति उग्र–उग्रतर––होत चालली आहे व भवितव्य अत्यंत तमोमय आहे!—पाहावयाचें मार्ग कसा दिसतो!

आपटे मडळी<br>लकडीपूल, पुणें २. } **प्रकाशक**

# कोंडा-कणीं

★

## १ अक्षर-काव्य !

तो शाळामास्तर झाला आणि त्याची नेमणूक एका मुलीच्या शाळेवर थर्ड असिस्टंट म्हणून झाली. त्यास हायसें वाटलें.

पुढें त्याच शाळेतील एका प्रौढ कुमारिकेशीं त्याचे लग्न झाले. हा त्याचा जरी प्रेमविवाह नव्हता, तरी त्यास मोठी धन्यता वाटली.

त्याला कादंबऱ्या वाचण्याचा स्वभावतःच नाद असल्यामुळें त्याला रोमान्सचें महत्त्व कळत होते. व तसे काहीं आपल्या आयुष्यात व्हावें असें त्याला भारी वाटत होते.

पण एकच अडचण होती. त्याला आईबाप व म्हणूनच तिला सासूसासरा होते. ही कौटुंबिक कोंडी पार फोडून टाकण्याचें किंवा झुगारून देण्याचें त्याच्या ठिकाणी मनोधैर्य नव्हते आणि त्याची ती तर साधारण भेदरट मुलगीच होती.

तरीपण त्यानें ठरविले कीं, रोमान्सची मजा चोरून मारून लुटता आल्यास पाहावें. काहीं गोष्टींतील चोरटेपणा मोठा गोड असतो, असें त्यानें कोठे तरी वाचलें होतें.

आणि घरीं असता एका आघोळीच्या प्रसगीं त्यानें तसली गोड चोरी करून त्या म्हणण्याचा अनुभव घेतलाहि होता.

पुढें एकदा त्याची ती माहेरी जाणार होती व तो स्वतः नव्यानेंच बदली झालेल्या ठिकाणीं हजर होणार होता. त्याच्या वियोगाचा हा पहिला प्रसग होता !

पण त्यामुळें प्रेमपत्राची देवघेव करण्यास त्याना सुसधि प्राप्त झाली.

आदले रात्रीं त्यानें तिला आर्जविलें व बजावले कीं, पहिलें प्रेमपत्र सधि मिळताच ताबडतोब आलें पाहिजे.

ती भयभीतच झाली. पण तिलाहि ती कल्पना काहीं वावगी वाटली नाहीं.

तिनें सस्मित वदनानें पत्र पाठविण्याचें वचन दिले व उलट बजावलें, " आपलें पहिल्यादा आलें पाहिजे. "

त्यानें तिच्याजवळ एक शिस्पेन, दोनतीन पाकिटे व पुष्कळसे कागद देऊन ठेविलें. पत्र कसे लिहावें व पोस्टात कसें टाकावें याच्या काहीं युक्त्याहि त्यानें तिला सागितल्या.

आणि त्याचा वियोग घडून आला

नोकरीच्या गावीं जाताच त्यानें आपलें पहिलें प्रेमपत्र लिहिलें.

आणि तिनेंहि पण उलट डाकेनें उत्तर देण्याची सधि साधली !

दोघानाहि पत्रे मिळाली ! आनद झाला !—त्यांनीं एकात गाठला !

पण—पण— पण ! ! !

**तिला त्याचें काव्य कळेना !**

**त्याला तिचें अक्षर वाचतां येईना ! !**

२

# टेऊटुक् मांदा

सगळीकडे सारखे पसरलेलें एक फार मोठें आभाळ होतें. त्याखाली तसेंच मोठे एक काळे अरण्य होते आणि त्या अरण्याला लागून एक मोठे सरोवर होते. या सरोवराचें नाव होतें नोरागी. असे सागतात कीं मागे केव्हा तरी चुकपाग देवाचे व डोगा राक्षसाचें आभाळात भले जगी युद्ध झालें ! त्यात जी नासधूस झाली, तीमुळें आभाळ फाटून त्याचें एक लक्तर खालीं पडलें. तें लक्तर म्हणजेच नोरागी सरोवर. आणि डोगा राक्षसाच्या झिंज्या उपटून देवानें खाली टाकल्या, त्याचें झाले अरण्य !

नोरागी सरोवर असें काहीं मोठे होतें कीं त्यात हजार हत्ती एका वेळीं पोहायला घुसले असते, तरी त्याना कसलीच अडचण झाली नसती. पाणीही पुष्कळ खोल, स्वच्छ आणि थड. यामुळें त्यांत नाना प्रकारचे जलचर प्राणी सुखानें नादत होते. मोठमोठ्या वल-वेली सर्वत्र पसरल्या होत्या. शेवाळाचीं मोठमोठीं बेटें त्यात होतीं. सरोवराचा सारा कगोरा अगदीं वाकडा तिकडा, खडबडीत, खडकाळ

असा होता. आणि तेथे बोरू, नेचे, देवनळ याचा अगदीं सुकाळ होता. यापलीकडे होतें भयकर अरण्य! लहान मोठ्या वृक्षाची व त्याच्यावर पसरलेल्या वेलीची अशी दाटी होती की हत्तींना जाता येता आपली अंगें रगडून घ्यावी लागत. मोठमोठ्या वृक्षाची उची तर विचारायलाच नको. आभाळामध्यें त्याचीं डोकी खुपसली गेली होतीं. या गर्दीमुळें त्या वृक्षाच्या लाब लाब सावल्या नोरागीच्या पाठीवर हात पाय पसरून निजलेल्या असत. सरोवरात सूर्याला आपलें तोड पाहायचे झाल्यास आभाळात उच उच चढावे लागे. अशी काहीं फार गमत होती, त्या सरोवराची न् अरण्याची!

नोरागी सरोवर व त्याच्या भोवतालचें अरण्य चुकपाग देवानें एका मोठ्या कासवाला आंदण दिलेले होते. या कासवाचे नाव होते टेऊटुक् मांदा. येथे असलेले सारे पशुपक्षी, जलचर प्राणी, कीटक मांदाला आपला धनी मानीत आणि त्याला देवाप्रमाणे मान देत.

मादाही मोठा चागला राजा होता. सरोवरात एक मोठा भुईचा तुकडा लाबवर घुसला होता. मांदा या स्थानी राही आणि राज्य करी. अरण्यात राहणारा हत्ती, पाण्यात राहणारा नक्र, आणि पर्वताच्या सुळक्यावर राहणारा गरूड याच्या मानानें मादा अगदींच तुच्छ होता. पण देवानेंच त्याला राजा केल्यामुळें तो सर्वांना भारी व पूज्य होता. शिवाय त्याच्याठायीं एक मोठा विस्मयकारक गुण होता. मांदाला मजुळ स्वरात सर्वांना समजेल व आवडेल असें गातां येत होतें.

मादाचें गाणें फार सुरेल—फार गोड. एका मोठ्या खडकावर बसून तो गाऊ लागला कीं वारा एकदम थांबे. हत्ती स्तब्ध होत. सरोवर शात शात भासे. सारे जीव खाणेंपिणें टाकून ऐकू लागत!

आभाळसुद्धा आनदानें हसू लागे! मग सारी सृष्टि देवाला म्हणे, “देवा आमचा मादा सुखी असो! शतायु असो!”

अशा प्रकारें सर्वांना सुखी ठेऊन मादा आपले राज्य चालवीत असता एकदा कोठून तरी कोगा नावाचा एक पारधी मादाच्या राज्यात आला. राज्य मोठे व सर्व दृष्टीनी समृद्ध, एखादा बाहेरचा जीव येऊन जगू लागला तर त्याला कोण नाहीं म्हणणार! मादा किंवा त्याचे प्रजाजन यापैकी कोणीही या नव्या पाहुण्याकडे लक्ष दिलें नाहीं. कोगा पारधी त्या भागात पहिल्यादा भीतभीतच आला होता. पण खाण्यापिण्याची चगळ, आडकाठी कसलीच नाहीं व कुठेही राहता येईल अशी निवात जागा. कोगाला आणखी काय पाहिजे होते! त्याने आपलें धनुष्यबाण व जाळे खाली टाकून एका ठायीं तळ दिला. आणि यानतर दोनतीन दिवसातच त्याला कळून आलें कीं त्या भागाचा राजा टेऊटुक् मादा आहे व त्याला मन-मोहक गाता येते. कोगाला याचें अत्यत आश्चर्य वाटलें! असला चमत्कार त्याने कधींच पाहिला नव्हता! शिवाय त्या चमत्काराचा त्याला आणखी एक विलक्षण अनुभव आला. मादाचें गायन सुरू झालें, कीं कोगाला पारध मिळविणे फारच सुलभ जाई! गायनाच्या लाटा सर्वत्र पसरू लागल्या, कीं सगळ्या प्राण्याना विलक्षण मुग्धता येई! पाण्यातील मासे पकडण्यास जाळें टाकण्याची आवश्यकताच राहत नसे. पाण्यात घुसलेल्या खडकावर बसावे नी पाण्यात अस-णारा कोणताही मासा हात घालून बाहेर काढावा! जी गोष्ट माशाची तीच पशुपक्ष्याची. सश्याची ससेहोलपट करण्याचें कारणच उरलें नाहीं आणि कपोत पकडण्याकरिता झाडावर फासा तयार करण्याचें श्रमहि पडले नाहींत. इच्छेप्रमाणें वाटेल त्याला पकडावें व राधावें! कोगाला ही सुलभता व सफलता एकदम मानवली! आपल्या

कुटुंबासह व निवडक गणगोतासह या स्वर्गातच येऊन राहावें अशी त्याला इच्छा झाली. तो त्याप्रमाणें परत जाण्यास निघालाही. पण तितक्यात त्याला एक कल्पना सुचली ! आपण आपल्या परिवारासह इकडे येण्यापेक्षा मादालाच आपणाकडे नेले तर ? आणि जो जों तो या गोष्टीचा विचार करू लागला तो तो त्याला मादा आपलासा करणें विशेष इष्ट वाटू लागले.

कोगाने विचार करकरून आपली योजना ठरविली. दुसऱ्या दिवशीं त्यानें एक लहानसा तराफा तयार केला व संधि साधून मादाचें निवासस्थान गाठले. दोन दिवसात त्या दोघाचा परिचय घडून आला. मादाच्या राज्यात नाना प्रकारचे व आकाराचे पशु-पक्षी व जीवजन्तु होते, परतु दोन पायावर उभा राहून व स्वतत्रपणे हाताचा उपयोग करून जीवन चालविणारा मनुष्य प्राणी मादाच्या पाहण्यात या घटकेपर्यंत आला नव्हता. यामुळें कोगाचा परिचय व त्याचें बोलणें चालणें, मादाला मोठे कौतुकाचें व नवलाचें वाटलें. त्यानें कोगाचे स्वागत करून प्रश्न केला, “ द्विपादा, तू कोठून आलास ! तुझे नाव काय ! आणि मजकडे तुझे काय काम आहे ! ”

कोगानें पुनः पुन्हा प्रणाम करून नम्रपणानें आपलें नावगाव सागितलें व म्हटलें, “ महाराज' आपली कृपा या दीनावर असावी व माझ्याकडून स्वामींनीं सेवा घ्यावी. मला अन्य काहीं नको. ”

त्याची ती नम्र वाणी ऐकून मादाचे मन प्रसन्न झाले व त्यानें कोगाला आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यानें मादाचें धन्यवाद गात जवळच्या एका खंदडीं तळ दिला. त्याच्या योजनेंतील एक गोष्ट साध्य झाली. आश्रय मिळाल्यानतर कोगानें मोठ्या भाविकपणानें मादा राजाची सेवा आरंभिली.

चुकपाग देवानें एकदा असे म्हटलें होते कीं,

छक्कू पेंधे धन्धन ढाकी ।
केमे म्हपकू कलताऊ ॥

याचा अर्थ असा–प्राण्यानो, तुम्हाला आपसात प्रेम वाढवावयाचें असल्यास काय करा? आपसात गोड बोला. स्तुति करा व सेवा करा. यानें तुम्हीं सफल व्हाल! सुखी व्हाल!

कोगानें देवाचा हा उपदेश डोळ्यापुढें ठेवून मादाशीं तसें वर्तन केले. यामुळे अगदीं थोड्या वेळात मादाला कोगा मनापासून आवडू लागला. मादा राजा असला तरी प्रत्यहींचा त्याचा सारा जीवनक्रम पूर्ण स्वावलबी होता. पण कोगानें त्याच्या राजेपणाची त्याला जाणीव देऊन त्याच्या अनेक गोष्टी आपल्याकडे घेतल्या! त्याच्या भोजनाची व्यवस्था ठेवणें, निरनिराळे खाद्यपदार्थ तयार करणें व ते त्यास आग्रहानें खाऊ घालणें, त्याला पाल्यापाचोळ्याची सुदर शय्या करून देणें, त्याचें अंग रगडणें, त्याला लौकर निद्रा लागण्याकरितां झटणें आणि प्रभातकाळीं तो उठण्याच्या आत त्याच्या सेवेंत हजर असणें इत्यादि गोष्टी कोगानें मोठ्या आस्थेनें व न कटाळता चालविल्या. शिवाय मादाच्या गायनाची तो इतकी प्रशसा करी व इतक्या विविधतेनें करी कीं, पुढेंपुढें मादाला चुकपांग देवापेक्षा आपण श्रेष्ठ असल्याचा भास होऊ लागला. कोगाला हेंच हवें होतें.

अशा स्थितींत मादाला कोगाविषयीं कोणी सावध राहण्याची सूचना दिली नाहीं. मादाचे बालपणापासूनचे दोन जिवलग मित्र होते. नोई नावाचा कावळा आणि भेरा नावाचा कोल्हा! मादाने या दोघाची ओळख कोगाशीं करून दिलेली होती. पण त्या दोघाना कोगाचें मुळींच कौतुक वाटलें नाहीं व त्याना कोगाचा सशयहि आला. कोगानें हें ताडले. पण त्यानें गागरून न जातां त्या दोघानाही भाळून टाकण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा व्हावा तसा

उपयोग झाला नाहीं. नोई व भेरा यानीं आपला संशय बाहेर न दाखविता माना डोलावल्या, पण मादाला त्यानी एकीकडे गाठून म्हटलें, मादा, गड्या सावध ऐस अं, हा कोगा ना आपल्या जातीचा गोताचा. त्याची भाषा वेगळी, चालणें वेगळें. तो वाईट नसेल, पण चागला असेलच, अशी खात्रीं वाटत नाहीं. पाहा बोवा. ”

कोगाच्या स्तुतीनें व सेवेनें हुरळून गेलेला मादा स्वतःशींच हसला. पण नोई व भेरा आपले मित्र आहेत, याचें त्याला अद्याप स्मरण होतें. म्हणून त्यानें आपल्या मित्राना म्हटलें, “तुम्ही निश्चित असा. मला तसा संशय आला तर कोगाला मी आपल्या राज्यातून हाकलून देईन किंवा हत्तींच्या ताब्यात देऊन मारून टाकीन.”

पण पुढें तसें मुळींच झालें नाहीं. उलट, त्यानें भोळेपणानें म्हणा किंवा खुशींत येऊन म्हणा आपल्या मित्राची सावधान राहण्याची सूचना कोगाजवळ प्रगट केली ! कोगा तसा धूर्त होता. त्यानें नोई व भेरा याच्या सदिच्छेची मनापासून प्रशसा केली आणि मादानें तशी सावधानता अवश्य बाळगली पाहिजे. तीपासून हितच आहे असें आपलें मत प्रगट केलें. कोगाची हीं निस्पृहता पाहून मादाला त्याचा अधिकच विश्वास वाटू लागला. त्यानें कोगाला आपला मुख्य मत्री करून टाकिलें.

यानतर कोगानें आपल्या आर्जवाचें, स्तुतीचें व सेवेचें प्रमाण आणखी वाढवलें. त्यानें मादाला आपल्या तराफ्यावर बसवून सरोवरात दूरपर्यंत फिरण्यास न्यावें, कधीं दूरच्या कांठावर नेऊन आपल्या धनुष्य बाणाचें कौतुक दाखवावें, कधीं सरोवरात जाळें टाकून मासे पकडण्याची करामत करून दाखवावी आणि कधी पाण्यांत सुरकांडी मारून पोहून दाखवावे इत्यादि प्रकारानी त्यानें

मादाची विचारशक्ति अगदीं भारून टाकली. कोगा मैत्रीला योग्य तर आहेच, पण इतर दृष्टींनीही त्याची योग्यता काहीं आगळीच आहे. असेंहीं त्याच्या मनानें घेतले. त्याचा विश्वास वाढलेला पाहून मग एके दिवशी कोगानें त्याच्या सेवेंत तत्पर असता त्याला म्हटलें "राजाधिराज, या सेवकाच्या घराला आपले पाय लागावे, त्याच्या कुटुंबातील मडळींना दर्शन व्हावे व गायन ऐकण्याची सधि मिळावी अशी फार-फार इच्छा आहे."

यावर मादा म्हणाला, "कोगा, मीं तुझ्यासगे तुझ्या घरीं अवश्य येईन, पण असे पाहा. नोई व भेरा माझे बाळपणापासूनचे स्नेही. त्याचा विचार मला घेतला पाहिजे. किंवा त्यानासुद्धा आपण बरोबर घेऊ. ते आले म्हणजे बोलणें काढ. सगळेच जाऊ या"—पण त्याचा हा विचार कोगाला रुचला नाहीं. तथापि त्याने बाह्यत: आनद दर्शवीत म्हटले, "वाहवा! मग तर फारच गमत होईल" पुढें त्यानें तो विषय तितकाच ठेवला. पण मनात मात्र त्याला वाटलें, मादाला एकटाच नेणें इष्ट. आणि तोही शक्य तितक्या लौकर. नोई, भेरा व मादा याची आता गाठभेट होताच उपयोगी नाहीं. असा विचार करून त्यानें एक नवा व्यूह रचला.

दोन दिवसानेतर तो मादाला म्हणाला, 'महाराज, त्या झाडीपलीकडचा भूभाग आपण कधीं पाहिला आहे काय?—नाहीं महाराज, तो आपल्याच राज्यात मोडतो. आपण तिकडे कधींच कसे गेला नाहीं! —छे छे! मी परवा सहज तिकडे फिरून आलो; किती सुदर आहे म्हणता! आपली तर तहानभूक हरली!—आठ दिवसाखाली मी तें कद आपणास भाजून दिले होते. हा. ते आपल्याला फार रुचले होते. ते कद त्या रानात फार! उद्यां सकाळीं जाऊ या का तिकडे?—चक्कर मारून येऊ या एक?—"

मादा म्हणाला, " उद्याच जाऊ या म्हणतोस ? परवा गेलों तर? उद्या नोई व भेरा येणार आहेत भेटायला. "

कोगानें म्हटले, " तें माझ्या लक्षात आहे ना. पण ते येणार आहेत दोनप्रहरीं. आपण असे करू. भल्या पहाटे उठू आणि दोन प्रहरच्या आत परत येऊ. येताना ते कद भरपूर आणू. माझ्या मनात आज एक नामी पक्वान्न बनवून नोई व भेरा याना अर्पण करावयाचें आहे. त्याची रुचि चाखून ते असे प्रसन्न होतील ! मोठी मजा येईल भोजनाला. आणि मग बोलण्यात बोलण काढू आपल्या गावी जाण्याचे. तुम्ही आपल्या मित्रमडळीसह आमच्या घरीं याल, त्या दिवशीं मी स्वतःला भाग्यवान् समजेन. " असे बोलून त्यानें मादाची अफाट स्तुति केली. आणि नतर पुन्हा म्हटलें, " मग उद्या भल्या पहाटे निघावयाचेंच बरें का ! "

मादानें त्याचें म्हणणें मान्य केले. कोगानें प्रवासाची तयारी रात्रींच करून ठेवली. नतर एक प्रहर रात्र शिल्लक आहे तोंच कोगानें मादाला तराफ्यावर उचलून चढविलें. तराफ्यावर मऊ मऊ तृणशय्या होतीच. मादा थोडासा कुरकुरत गवताच्या ढिगात शिरला व पुन्हा झोपीं गेला. हर्षभरित चित्तानें कोगानें तराफा अपेक्षित दिशेला लावून वल्हवण्याचा वेग वाढविला.

यानतर मादा किती वेळानें जागा झाला कोण जाणें. पण ज्या वेळीं त्यानें डोळे उघडून पाहिले, त्या वेळीं त्याला आपला तराफा एका अनोळखी प्रदेशांतून चालल्याचे दिसून आले. कोगा एका जलाशयाच्या काठाकाठानें असलेल्या वृक्षाच्या सावलीतून मदगतीनें तराफा वल्हवीत होता. का कोणाला ठाऊक ? तो अनोळखी प्रदेश पाहताच मादाचें मन किंचित् अस्वस्थ झालें. पण ते बाहेर न दाखविता तो कोगाला म्हणाला, "काय रे कोगा, आपण इकडे कुठे

आलों ? मध्यान्ह तर झालेली दिसते. भोंवतालचा प्रदेशही अनोळखी दिसतो. आपण परत कसे जाणार लौकर घरीं ?— ” कोगानें हसत म्हटले, “ त्याचे असे झाले, पण महाराजाना ती हकीगत मी मागाहून सागतो. आता अपराण्हकाल होऊन गेलाय्. महाराजानीं यथास्थित भोजन करावे. ”

मादा मनाशीं चपापलाच. पण त्याला भूकही लागली होती. म्हणून त्यानें विशेष वाटाघाट न करता सपाटून भोजन केले. पोट भरल्यावर कोणालाहि बरे वाटतेच. मादाची तशी कळी खुलताच कोगा म्हणाला, “ महाराज, दासाला क्षमा असावी. मी थोडी लबाडी केली. महाराजाना मी आपल्या गावीं घेऊन जात आहें. सध्याकाळपर्यंत आपण पोंचू मुक्कामाला. ”

भोजनाची सुस्ती डोळ्यावर असताही मादाचें मन चरकलें. ही गोष्ट काहीं बरी झाली नाहीं. कोगानें असे कपट का करावें ! असेंच त्याला वाटले व त्याला कोगाचा रागही आला. त्यानें एकदम दरडावून म्हटलें, “ कोगा, मला असें फसविलेस; बरें नाही केलेस; मुकाट्याने तराफा मागे वळीव. मला घरी गेलेंच पाहिजे— ”

कोगा म्हणाला, “ नाहीं महाराज, तुम्हाला माझ्या घरीं आले पाहिजे. दोन दिवस आमच्याकडे राहा, मग पोंचवीन तुम्हांला परत.” या त्याच्या बोलण्यात थोडी कठोरता, थोडा उद्धटपणा होता.

मादाची सुस्ती एकदम उडाली. थोडा विचार करताच त्याला स्वतःची निःसाह्यता चटकन् उमगली. गोड बोलून, कोगाच्या कलानें घेऊन व थोडें पडतेही घेऊन सुटका करून घेतली पाहिजे, असें त्यानें ठरविले. त्यानें मनमोकळेपणानें हसण्याचें सोंग करीत म्हटलें, “ कोगा, किती धूर्त आहेस रे तू ! बरें चला. हीही गमत झाली म्हणायची. पण कोगा, दोनच दिवस राहणार बरें का तुझ्या घरीं.

अगदीं दोनच दिवस. मग लगोलग मला परत पोंचवलें पाहिजेस.'' आणि त्यानें आशेनें कोगाच्या मुखाकडे पाहिले. तो मान डोलवीत हसला. मादाला ते हसणे कसेंसे वाटले. तरीपण तो विशेष न बोलता वामकुक्षीच्या निमित्तानें स्वस्थ पडून राहिला.

यानतर काहीं कालानें त्याचा तराफा नोरागींत पडणाऱ्या एका नदीच्या मुखात शिरला! नदीच्या दोन्हीं तिराला उच उच दरडी असून त्याच्यावर घनदाट अरण्य पसरले होते. कोगानें मादाला ती शोभा दाखवीत म्हटले, " मादा, हे माझे राज्य, बरे का. मीं तुझे स्वागत करतों."

सूर्यास्ताच्या सुमाराला तराफा पुष्कळच दूर आला होता. आता नदीच्या दोन्हीं अंगाना मोठमोठे खडक असून, पात्रातही हत्ती-एवढाले धोंडे दिसत होते. पाण्याचा खळखळाट व थयथयाट अपूर्व होता. नोरागी सरोवराच्या शात पृष्ठावर आयुष्य घालविणारा मादा नदीच्या पात्रातील हा देखावा पाहून भयचकित झाला! कोगा मधून मधून पाहात होता. त्यानें मादाच्या दृष्टींतील भयभीतपणा पाहून गभीरपणे म्हटले, "पाहिलेस मादा, माझ्या राज्याचा कसा कडेकोट बदोबस्त आहे! मोठमोठे राक्षस मी पहाऱ्यावर ठेवले आहेत. पाणी कसे नाचते आहे? कसे ओरडते आहे? या स्थलात माझ्या आज्ञेवाचून कोणाला आत येता येत नाहीं. की बाहेर जाता येत नाहीं." असें बोलत त्यानें नदीच्या काठाला असलेल्या दोन खडकाच्या दुबेळक्यात तराफा नेऊन लावला! नतर त्यानें खडकावर उडी मारून एक आरोळी ठोकली. ती ऐकून मादा घाबरला. तो झटकन् पाण्यात उडी टाकून कुठे तरी दडी मारणार होता. पण त्या विचाराने भाबावून तो इकडे तिकडे पाहतो तोच कोगानें त्याच्या अंगावरच उडी मारली! त्याने मादाला दरडावून म्हटले, "ए खुळ्या

Nikalson Road Kashmiri Gate

माझ्याइथून निसटण्याचा प्रयत्न करशील तर फुकट मरशील, अं! ध्यानात ठेव. तुझ्या रक्षणाची जबाबदारी आता माझ्यावर आहे. माझ्या मर्जीप्रमाणें तुला चालले पाहिजे." मादाला मान डोलावणे भाग होतें.

इतक्यात कोगाच्या कुटुंबातील माणसे आली. दोन म्हातारे, दोन म्हाताऱ्या, एक तरुण स्त्री, पाचसहा मुलें एवढा तो कबिला होता. कोगाला पाहताच त्या सर्वांनी एकच कल्ला केला. "तू कुठं गेला होतास? आम्ही काळजींत होतों. घरातला कर्ता तू. आमची खाण्यापिण्याची व्यवस्था करून गेला नाहींस. आजसुद्धा हात हालवीत आलास पारध कुठं आहे?" इत्यादि प्रश्नांनी त्यांनी त्याला भंडावून सोडले. कोगानें हसत हसत सर्वांना थांबविलें व आपल्या पायाजवळचा मांदा दाखवला. नंतर तो मांदाला म्हणाला, "मांदा, एक गाणं म्हणून दाखव अं. फक्कड झालं पाहिजे." पेंचात सापडलेला मांदा मुकाट्याने गाऊं लागला! त्याच्या गायनाच्या लहरी हवेत तरंगूं लागताच पाण्यातील जलचर व भोंवतालचे पशु-पक्षी मोहित झाले! मग कोगानें पारध किती सुलभतेनें मिळते, याचें प्रत्यंतर आपल्या कुटुंबीयांना दाखविलें. मांदा इकडे गात असता कोगाने पाण्यात हात घालून मोठमोठे मासे बाहेर काढले व कांठाला फेकले. ससे हरणे धावत आली होती. त्यांना पकडून ठेवण्यास त्याने लहान मुलांना फर्माविलें. तात्पर्य, आठ दिवस सर्वांना पुरेल अशी शिकार त्यांना हा हा म्हणता मिळाली!

हा चमत्कार पाहताच कोगा व त्याचें कुटुंब यांना केवढा आनंद झाला असेल, याची कल्पनाच करावी! सर्वांनीं कोगाला शाबासकी दिलीच. पण मांदाचेंही कौतुक केले. मांदाला डोक्यावर घेऊन नाचत सगळी मंडळी शिकारीसह आपल्या वस्तींत आली!

२

दोन दिवसांनीं मादाला परत पोंचविण्याचा वायदा होता. त्यानें कोगाची मर्जी जाऊ नये म्हणून आठ दिवस वाट पाहिली. नतर त्यानें कोगाला आर्जवानें म्हटले, " मला आता पोंचीव ना माझ्या घरीं. नोरागी सरोवराची मला भारी आठवण होते. केव्हा पोंचविणार ? "

कोगा म्हणाला, " लौकरच. हें बघ, आमच्या गावाला माझ्या मनात एक जेवण द्यावयाचें आहे तेवढा समारभ आटपला कीं तुझी सुटका झालीच म्हणून समज. तुला उगीच ठेऊन घेण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. दोन दिवस थाब. " बिचारा मादा ! कोगाच्या वचनावर भिस्त ठेवणें त्याला भाग होते.

दोन दिवसानी गावजेवण झालें. कोगाचा मोठा लौकिक झाला. हळूहळू त्याचें भाग्य वाढीला लागले. मादाच्या गानकुशलतेमुळें कोगाचा शिकार मिळविण्याचा प्रश्न इतका सुलभ झाला होता, कीं त्या अद्‌भुत साधनानें तो सावकारकी करू लागला व मोठा दान-शूरही झाला. अल्प कालात त्याची प्रतिष्ठा सर्वत्र पसरू लागली. अर्थात् या धादलीत मादाला त्याच्या घरीं पोचविण्याची गोष्ट कोगा जवळ जवळ विसरून गेला ! एवढेंच नव्हे, तर मादाच्या पोटा-पाण्याकडे किंवा सामान्य सुखसोईकडेही पाहण्याचे तो विसरला ! स्वाभाविक आहे. उद्योगी मनुष्य कुठे म्हणून लक्ष देणार ?

बाकी कोगानें मादाची चागली व्यवस्था ठेवली होती. त्याच्या घराच्या अंगणात पाण्याचें एक डबके होतें. त्यात मादाला स्वतत्र सोडलें होते. आणि त्यानें उगीच इकडे तिकडे भटकून सकटात सापडू नये म्हणून त्या डबक्याभोवतीं निवडुगाचें दाट कुपण लावलें

होतें. कासवासारख्या तुच्छ प्राण्याची व्यवस्था आणखी तीं काय करावयाची ? मादानें त्यात सुख मानावें आणि कोगा म्हणेल त्या बुद्धीनें गायन करून त्याचा योगक्षेम चालवावा असेंच कोणी म्हटलें असतें ! निदान कोगा तरी मादाला तसें बजावी. पण मादा कृतघ्न. त्याला सारखे वाटे, आपली सुटका केव्हा होते, आणि आपण सुखरूपपणे नोरागी सरोवराकडे केव्हा जातों म्हणून तो कोगाची अडचण ध्यानात न घेता सारखी कुरकुर करी व काहीं प्रसगीं अडेलपणा दाखवी. भलताच हट्ट घेऊन बसे. मग कोगा काय करणार ? तो त्याला कधीं चुचकारी, कधीं गोड बोले, कधीं भरघोस आश्वासन देई ! आणि एवढ्यानें नच भागलें, तर मग मात्र तो अत्यत निर्दयपणाने मादाला झोडपून काढी ! त्या त्या वेळीं तो मादाला म्हणे, 'तुझी ब्याद गळ्यात घेऊन मीच फसलो आहें. त्यात तू अशी भुणभूण लावलीस तर मी तरी काय करणार ? वेळ येताच मी तुला नोरागी सरोवराकडे पोचविणार आहेच. गुण्या-गोविदाने घेतलेस, सारे ठीक जमेल ! उगीच त्रास दिलास, अगाची चामडी लोळवीन !—" या सरळ, स्पष्ट, न्यायी व व्यवहारी बोलण्यावर मादा काय उत्तर देणार ? तो कपाळाला हात लावून बसे. एका काळीं त्याला आपल्या भाग्याचा केवढा अभिमान होता ! आपल्याला गाता येते व त्यामुळे आपण जीवमात्राला मोहित करू शकतों, याचाही त्याला केवढा ताठा होता. पण अरेरे ! आज त्याला त्याच गुणानें एका डबक्यात येऊन पडण्याचा प्रसग आला होता ! नोरागी सरोवराची आठवण करावी. तेथील स्वच्छ, सुदर वाता-वरणाचीं चित्रे मनाशीं पाहावीं, नोई व भेरा याचें स्मरण करावें आणि त्याबरोबर सध्याचें दुर्दैव आठवून स्वतःशीं रडावें. एवढेंच त्याच्या हातात राहिलें होते !

## ३

यानंतर अनेक दिवसानंतरची गोष्ट. कोगा आपल्या पंचक्रोशींत मोठा धनाढ्य गणला जाऊन सर्वांचा नायक बनला होता. आतां त्याचा दरारा सर्वत्र वाढला असून त्याचा शब्द खालीं पडू देण्याची कोणाचीच प्राज्ञा नव्हती. हा सारा प्रभाव मादाच्या गुणाचा किंवा पायगुणाचा असल्यामुळें त्याची दखल मादाला करून देणें कोगाला अगत्याचें वाटलें. तो स्वतःशीं प्रौढी सांगत व चाबूक दाखवीत मादाला बजावूं लागला, पाहिलेंस मादा, "तूं किती भाग्यवान् आहेस? केवढ्या मोठ्या थोर, न्यायी, दानशूर, उदारधी पुरुषाशीं तुझा संबंध आला आहे! आणि असे असून तू म्हणतोस मला नोरागी सरोवराकडे पोंचवा! काय म्हणावें तुझ्या वेडेपणाला! —आतां त्यातून तुझी इच्छाच असेल त्या स्थानाकडे जाण्याची, तर माझी ना नाहीं. तुला तुझ्या घरीं परत पाठविण्याचें वचन मी देऊन चुकलों आहे. तें मला पाळलें पाहिजेच. पण माझ्यावाचून तुझा निभाव लागेल का? हें तुझें तू ठरीव. बोल पोंचवूं तुला नोरागी-कडे?—" बिचारा मादा! काय बोलणार? कोगाच्या मिट्ठास भाषणापेक्षा त्याच्या हातांतील आसूडाची योग्यता व प्रभाव त्याच्या जास्त परिचयाचा होता. दीन दृष्टीनें त्या चाबकाकडे पाहत तो गप्प बसे.

अशा अवस्थेंत मादाचें आयुष्य चाललें आहे. तोंच एके दिवशीं त्याला नोई कावळ्याचा 'काव काव स्वर ऐकूं आला! मादानें डबक्याबाहेर येऊन डोकावलें! समोरच्या एका उंच दगडावर नोई खरोखरीच बसून 'काव काव' करीत डबक्यांत सर्वत्र पाहात होता!— -मादा घाईघाईनें बाहेर आला. दोघे मित्र कडकडून भेटले. आनंदानें

व दुःखाने मादाला भडभडून आले. त्यानें नोईच्या गळा पडून आपली दुर्दशा कथन केली! नोईनें त्याला धीर देत म्हटले, "घाबरू नकोस. काढू काहीं तोड. तू अगदीं भलत्या स्थानी येऊन पडला आहेस. तू नाहींसा झाल्यापासून मी व भेरा तुला धुडीत भटकतो आहों. बरें झालें सापडलास. आता तुझ्या सुटकेचें पाहू कसें जमते?–भेराला एकदा इकडे आणतो. मग ठरवू काय ते" एवढे बोलून त्याने मादाला पुन्हा धीर दिला व तो उडून गेला!

आणि तितक्यात चाबूक कडकावीत कोगा तेथे प्राप्त झाला. मादा गागरलाच त्याला पाहून. कोगाच्या आज्ञेवाचून आपण नोईला भेटलों. याचीच त्याला धास्ती पडली! पण कोगा तसा धूर्त होता आणि या वेळी तो आलाही होता काहीं उद्देशानें. म्हणून त्यानें चाबूक बाजूला ठेवीत मादाच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें, "काय मादा, नोई भेटून गेला वाटत.!–आ हा! उगीच नाहीं म्हणून थाप देऊ नकोस! तुझी लबाडी आम्हीं ओळखली!—अरे, मित्रामित्रानी भेटलेच पाहिजे एकमेकाला! त्यात छपवाछपवी पाहिजे कशाला?—आपल्याला आनद वाटला या गोष्टीचा. बरें झाले, तुला तुझ्या घराकडील वार्ता कळली!–मला वाईट वाटतें एकाच गोष्टीचे. नोई मला न भेटता गेला. वेडया, मी त्याला ठेवून घेतलें असते. काही पाहुणचार केला असता. पण तू असा मूर्ख. त्याला तसा घालवून दिलास! छे, अगदींच चुकलास! अतिथि आला आणि रिक्तहस्तानें गेला; बरे नाहीं दिसत हें. पुन्हा असें करू नकोस. तुझ्या तिकडचे कोणी येवो, एक येवो, दहा येवोत, मला एकदम कळवायचें. माझ्या लौकिकाला साजेल असे मी त्याचें स्वागत करीन. काय समजले!—पुन्हा नोई व भेरा आले कीं कळव—" कोगाची ही आपुलकीची भाषा पाहून मादा थक्कच

झाला ! कोगा आपण समजतों तितका अधम नाहीं तर ? असेंही त्याच्या भाबड्या मनाला वाटलें.

त्याचें मनोगत ताडण्यात कोगा अगदीं वस्ताद बनला होता. तो पुढें म्हणाला, " आणि हें पाहा, नोई व भेरा पुन्हा आले, त्याच्या-बरोबर तू जाण्याचे ठरविलेंस, आपला नकार नाहीं हो त्याला. अगदीं खुश्शाल जा ! माझे तेवढेच श्रम वाचले. मला सागून मात्र गेले पाहिजे. उगीच लपवाछपवी खपणार नाहीं आपल्याला ! मैत्रीचा व्यवहार कसा साफ उघड्यावर पाहिजे. तुझी इथून सुटका करायची ती माझ्या लौकिकाला साजेशी व्हावी, एवढाच माझा आग्रह. "

या औदार्यात मांदा ठारच झाला !

कोगा पुढे म्हणाला, ' आता हा विषय आपण इतकाच ठेऊ आणि दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीकडे वळू. मांदा, जग मोठें वाईट आहे आणि त्यात माणूस तर असा वाईट आहे !—झाली काय मजा माझी प्रतिष्ठा आताशा अनेकाना बघवेनाशी झाली आहे. आपल्या पचक्रोशीच्या बाहेरचा एक पाजी मनुष्य तर माझ्या चागलाच डाई पडलाय् ! त्याचा काटा काढण्याचा माझा आहे विचार. तेव्हा तुझं सह्या पाहिजे. ते मिळेलच. पण तू जरा जास्त मनावर घेतले पाहिजेस—

मादानें काहींसे धीट होऊन विचारले, " याबद्दल मला बक्षीस काय ?—माझी सुटका करशील ? पोंचवशील मला मुकाट्यानें नोरागीकडे ?—

कोगा चपापला. त्यानें ओष्ठदश करीत मादाकडे पाहिले व बाजूला टाकलेला चाबूक हातात घेतला ! नतर तो हवेत उडवीत त्यानें म्हटलें, " मादा, तुझ्या आपलपोटेपणाला नमस्कार असो ! आपणा दोघात गाढ मैत्री ! बरोबरीचा मित्र म्हणून मी तुला आपलें सकट

सागायला आलो, सल्ला मागायला आलों. तो तू आपलाच स्वार्थ पाहू लागलास! भल्या माणसा, मनाची नाहीं, जनाची तरी लाज? धिक्कार असो तुझ्या हलक्या मनाचा! भलत्या वेळीं सौदा करीत बसतोस? पाजी!–पण जाऊ दे. एकवेळ क्षमा करतों तुला या धाडसाची! आणि ध्यानात ठेव. मी सागतों ते व तशा पद्धतीनें साह्य झालेच पाहिजे."

## ४

कोगाने जिंकली! त्याचा प्रतिस्पर्धी नामशेष झाला! मादानें अर्धपोटीं राहून आपल्या मोहक गाण्यानें त्याला हवे ते साह्य केले. कोगा यश मिळवून आला. त्याच्या कुटुंबात व गावात मोठा उत्सव झाला! त्या धादलीत कोगाची दोन कारटी मादाकडे धावत आली व म्हणाली, मादा, सर्वांना बक्षिसे वाटली. आता तुझी पाळी आलीय्. चल, बाबा तुला बोलावीत आहेत."

मादाचा जीव एवढा मोठा झाला तो घाईने निघणार, तो त्या पोरट्यानी त्याच्या पायाला चऱ्हाट बांधले व त्याला फरफटत नेले!

कोगाच्या पुढे नेऊन त्याला ठेवण्यात आले. त्याने मादाला प्रश्न केला, "मादा, तुझे बक्षिस पाहिजे?–" मादाने आपले दुर्दैव ओळखले! कोगाने सतापून म्हटले, "अधमाधमा! भलत्या वेळीं मला खिंडीत गाठणार होतास नव्हे! तुझ्याशीं ठेवलेल्या मैत्राची ही तुला आठवण?"–एवढे बोलून त्यानें त्याला यथास्थित बडवून काढले आणि नतर उलटे टागून ठेवलें!

दोन दिवसानी कोगानें त्याला सोडले आणि नतर प्रेमळपणें म्हटले, ' मादा, तू किती दुर्दैवी व मूर्ख आहेस! माझ्या आनदाच्या वेळी तुला दुर्बुद्धि सुचावी याचें मला वाईट वाटते. असो. आता

नीट ध्यानात ठेव. तुझ्या कल्याणाची जबाबदारी माझ्यावर आहे. ते वचन मी कधीच मोडणार नाहीं. संधि येताच तुझ्या सान्या इच्छा तृप्त होतील.

मादानें एक दीर्घ सुस्कारा टाकला !

* * *

कोगा त्या दिवशी धापा टाकीतच मादाकडे आला. त्यानें त्याला त्या डबक्याबाहेर काढलें. न्हाऊ माखू घातले, सुग्रास अन्न त्याच्यापुढें ठेवले. हा प्रकार पाहून मादाला या प्रेमाचा उलगडाच पडेना ! पण त्या आश्चर्यातून त्याची सुटका होण्याच्या आत कोगाने त्याला गच्च मिठी मारून म्हटले, " मादा, मादा तुझे भाग्य फळफळलें म्हणून समज. मी तुला तुझ्या घराकडे पाठवून देण्याचें नक्की ठरवून टाकले आहे— "

" केव्हा ? केव्हा " त्या आशाळभूत जीवानें विचारले.

" लौकर. तात्काळ. ताबडतोब. सुग्रास भोजन देऊन, वस्त्रालकार अर्पण करून, मोठ्या थाटानें तुला नोरागी सरोवराकडे पोचविणार "

" केव्हा ? केव्हा ? "

" शक्य तितक्या लौकर. अनुकूल संधि येताच. "

" म्हणजे !—तुझ्या इच्छेला येईल तेव्हा ? "

" मादा, असें टोंचून बोलू नकोस– " कोगा गहिवरून म्हणाला, " तुझ्या सुटकेचा प्रश्न आता माझ्या इच्छेवर अवलंबून राहिला नसून—जाऊ दे. माझ्या वचनाची मला चाड आहे, एवढेंच मी सागतों. "

मादा हसला व म्हणाला, " ठीक. सध्या तुझ्यावर सकट कोणते आलें आहे आणि माझे साहाय्य किती पाहिजे तेवढें साग— "

" मादा, माझ्या मित्रा ! उगाच का लाजवतोस ? पण निर्वाणीचें

सागतों, तुला मी तुझ्या घरी पोंचविणार ! माझे कांहीं नुकसान होवो त्यात, आता मी तुला पाठविणारच तुझ्या घरीं. माझे वचन— ”

मादा शातपणें म्हणाला, “ गड्या कोगा तुझ्या वचनाची तूं गोष्टच काढू नकोस. माझा विश्वास आहे तू म्हणशील त्याच्यावर !– तू चाबूक घेतल्यावाचून कसा आलास ? काम होण्याच्या आधीं बक्षीस मिळणार असल्यास माझी तयारी आहे ! साग, काय सकट आहे तुझे ?

“ सकट ? ” कोगा आढ्यतेनें म्हणाला, “ सकट कांहीं नाहीं. उलट मोठ्यात मोठे सौभाग्य माझ्याकडे चालून आले आहे. मादा, त्या तिकडे कडागी नावाचा देश असून तेथे डुगा नावाचा नृपति राज्य करतो आहे. त्याचे मला आमत्रण आले आहे. त्याला कोणी सागितलें आहे की, कोगाकडे कोणी एक टेऊटुक मादा आहे. तो फार सुदर गातो. डुगा राजाचा या गोष्टीवर विश्वास नाहीं. तेव्हा त्यानें आपले दूत मजकडे पाठविले. मादा—मी तुला राजदरबारी नेऊन तुझे गाणें राजाला ऐकविणार आहें ! गाणें अगदीं फक्कड झाले पाहिजे. ”

“ माझी तयारी आहे. ”

कोगा म्हणाला, “ ठीक ठीक. आता मी काय सागतीं ते नीट ध्यानात घे. आपल्याला काय करायचें आहे ? माहीत आहे ? राजाला फुकटाफुकटी गाणें नाहीं ऐकवावयाचें. चागली भरघोस बिदागी मागावयाची. मी अर्धे राज्य नी त्याची कन्या बायको म्हणून मागणार आहें ! ”

“ छान ! छान ! ”

“ राजानें हें मान्य केले. तरच तूं गायचेंस. ”

“ छान छान आणि त्यानतर— ”

" अन् त्यानतर तुला तसाच नोरागीकडे पोंचवायचा. "

" छान छान ? "

. " मी राजा झालो नी राजकन्या मिळाली मला कीं मग मला तुझ्या गाण्याची काय •गरज ? तुझी सुटका करणे मला भागच आहे. "

" छान छान " मादाचे हे शब्द कोगाच्या जिव्हारीं लागले. पण त्या वेळीं तो काहीं बोलला नाहीं. दुसऱ्या दिवशीं तो मोठ्या थाटानें डुगा राजाकडे निघाला. तो मनोराज्यात गुग होता. मादा विचारात दग होता.

## ६

डुंगा राजा महाप्रतापी ! सकल वैभव सपन्न. त्याचा दरबार त्याच थाटाचा होता. आज तो मुद्दाम राजवाड्यापुढील भव्य मैदानात भरविण्यात आला होता. कारण, कोणी न पाहिलेलें, ऐकलेलें असें एका कासवाचें गाणें त्या दरबारात होणार होतें. लोकाची ही राग लागून राहिली होती. ही सभा पाहून मादा गागरलाच; पण कोगासुद्धा हबकला ! त्यानें हळूच मादाला सुचविले, " मी म्हटल्याशिवाय गायचें नाहीं अन् अगदीं सुदर गायचे " मादानें इकडे तिकडे पाहत मान डोलावली आणि तीच दृष्टि त्यानें दूर टाकली, तों काय ? एका शिखरावर नोई बसला होता व एका आडोशाला भेरा डोकावत होता. मादाचें हृदय एकदम उसळ्या मारू लागले ! या वेळीं कोगाची दृष्टि कुठे आहे हें त्यानें हळूच पाहिलें. तो आपल्या मडळींत काहीं गुजगोष्टी करण्यात गुतला होता.

तितक्यात भालदाराची ललकारी झाली. सारी सभा उठली. राजाची स्वारी आली. सिंहासनावर अधिष्ठित झाली. राजातर्फे मुख्य

मत्र्यानें सभेचें व कोगाचे स्वागत केले. आणि त्याला गाणारे कासव पुढें आणण्यास आज्ञा केली. सभेच्या मध्यभागीं दोन आसनें माडली होती. कोगा मादाला घेऊन पुढें आला. दोघे त्या आसनावर अधिष्ठित झाले. राजानें गाणें सुरू होऊ द्या म्हणून स्वतः कोगास विनति केली !

कोगा ! मोठे वैभव व राजकन्या मिळविण्यास हपापलेला कोगा राजसभेत आपण काय बोलावें व कसें वागावें याचा त्यानें विचार केला नाहीं. तितके त्याला भानही राहिले नाहीं. मादाच्या साह्यानें त्याला त्याच्या योग्यतेबाहेर वैभव मिळत गेल्यामुळें तो अगदीं धुंद व उन्मत्त बनला होता. त्यान न कचरता आपली अट राजाला सागितली.

"अर्धे राज्य व राजकन्या पाहिजे म्हणता ?" राजानें गभीरपणें विचारले, "पुन्हा नीट उच्च स्वरात सागा पाहू—"

कोगाला तरी ही उमज पडला नाहीं. त्यानें आपल्या अटींचा जोरदार पुनरुच्चार केला. राजा सताप आत ठेवून हसला व म्हणाला, "कोगा, तुमची अट अचरटपणाची व अवज्ञा करणारी आहे. तरी मी ती एका अटीवर मान्य करीन. तुमचें कासव जर गायलें नाहीं तर तुमचें मुडके तिथल्या तिथें उतरेल ! आहे कबूल ?"

कोगाचे प्राण एकदम कासावीस झाले. त्यानें भयभीत मुद्रेनें मादाकडे पाहिले. तो शातपणें समोर पाहत होता.

राजा ओरडून म्हणाला—जल्लाद

एक राक्षसस्वरूपी खडगधारी पुढें आला.

राजा कोगाला म्हणाला, "ह कोगा तुझे कासव गाऊदे."

कोगानें कोरडे ओठ ओले करीत मादाला गाण्याची प्रार्थना केली.

त्याला डोळ्याचा धाक घातला. हळूच कानाशीं लागून प्राण घेण्याची धमकी दिली. मादा गागरला. तोंच शिखरावरून नोई ओरडला.

“ काव काव—मत गाव ! ”

भेऱ्यानें कुई केली, “ गुमशुम गुमशुम ”

मादानें ओठ आवळून घेतले. कोगानें सभोवार पाहिले. राजाकडे पाहिले. पाठीशीं खडग् उपसून उभ्या असलेल्या मारेकऱ्याकडे पाहिले. त्यानें बेफाम होऊन मादावर झडप घातली व त्यानें मानगूट पकडून निर्दयपणें ते दडपीत म्हटले, “ चाडाळा, गा गा गा— ” मादा मेलाच असता त्या अघोर कृतीनें. पण मारेकऱ्यानें कोगाच्या हाताला झटका मारून मादाला सोडविले

राजा ओरडून म्हणाला, “ जल्लाद, पाहतोस काय ? उडव मुडके कोगाचें ? ” क्षणार्धात कोगा दुभग झाला !

आणि काय नवल ! मादा एकदम गाऊ लागला. ‘ करावें तसें भरावें. कृतघ्नता महापातक आहे. त्याचें प्रायश्चित्त मिळाल्यावाचून राहत नाहीं. भगवताची लीला आहे ही. ’

त्याचे गाणें सपते न सपते तोंच चपल हरीण जोडलेला एक रथ घडघडत सभेच्या मध्यभागी आला. भेरा सारथी होता. नोई ध्वजावर बसला होता. मादानें राजास प्रणाम केला व तो उडी मारून रथात चढला ! राजा तटस्थ झाला. सारी सभा तटस्थ झाली. रथ वळून घडघडत जात असता राजासुद्धा सर्वांनी जयजयकार केला—

टेऊटुक मांदा तुझा विजय असो !

टेऊटुक मांदा तुझा विजय असो !!

## ३ इंपा ( छाप ) ब्रँडी !

सबंध जगात नव्हे, हिंदुस्थानातही नव्हे, तर केवळ महाराष्ट्रांत जे पांच लक्ष पन्चावन हजार पाचशे पन्चावन् बेकार आहेत—ही खानेसुमारी माझ्या अंदाजपत्रकातील आहे —त्यापैकीं मी एक आहे. माझे नाव बेकारदत्त.

असा हा बेकारदत्त पन्चविसावे वर्षी बी. ए. झाल्यानतर नोकरीच्या शोधार्थ अर्ज खरडीत राहीला व पुढें पोस्टेज पुरतेसुद्धां पैसे वडिलाजवळ मागण्याची लाज वाटू लागली म्हणून महाराष्ट्राचें आटपाट नगर जें पुणें येथें येता झाला. त्यानतर काहीं प्रसगानें त्याची व उद्योगदेव इ. पा. याची गाठ पडली. ते दोघे एका खोलीचे व खानावळीचे सदस्य झाले. दोघेहि पोटाकरिता काहीतरी करू लागले.

उद्योगदेव इ. पा.—

उद्योगदेव हें नाव असू शकेल. पण इं. पा. हें काय प्रकरण ? स्वतः उद्योगदेवानेंच हें नाव स्वतःला चिकटवून घेतलें होतें. लोक त्याला इ. पा. च म्हणत. मी त्याला त्याचें रहस्य विचारतांच तो

हंसला व म्हणाला इ. पा. म्हणजे इटर पास. माझ्या नावाला ते लाच्छन आहे.

मी नवलाने त्याच्या तोडाकडे पाहू लागताच तो म्हणाला, इटर पास हा काहीं पराक्रम नव्हे. पण तेवढी विद्या पोट भरण्यास अपुरी पडते असा अनुभव येताच मला मोठे वैषम्य वाटले. मी विचार करू लागलों-जाऊदे, माझ्या विचाराची कथा तुझ्यापुढें कशाला पसरू ?—बेकार, इसापनीतीतील लाड्या कोल्हयाची गोष्ट तुला माहीत आहेच त्या कोल्ह्याचें शेपूट तुटलें. त्याला मोठे वैषम्य वाटले. तेव्हा त्यानें तुटक्या शेपटाची तरफदारी करण्याचें योजून सभा भरविल्याची हकीकत तुला माहीत आहेच. आम्हा शिक्षिताना शेपट्या फुटतात. त्यानें आमच्या जीवनाचा प्रश्न सुलभ होण्या ऐवजी जास्त कठिणच नाहीं का होत ?—पण तें शेपूट तोडवतें ? नाहीं. नोकरीकरिता भीक मागताना आधी त्या शेपटाचा उल्लेख प्रामुख्यानें होईल असें करावें लागतें. भिकेचें भाडेच तें. कुणाचें ताब्याचें कुणाचे टिनाचें. मग ते लपविण्यात काय अर्थ ?—

त्याचें म्हणणें मला वर्मी लागले तरी फारसे पटले नाहीं. मी काहीं बोललों नाहीं. तेव्हा ती अनुमति समजून तो पुढें म्हणाला, हें पहा बेकार, मी इथ पुण्याला आलों. नोकरीकरिता पुष्कळ धडपडलो. शेवटीं ही वर्तमानपत्रे विकण्याची हमाली पत्करली. त्यात मला अनुभव काय आला, माहीत आहे ?—मी इ. पास आहे. नोकरी न करता स्वावलबनानें यशोमदिर का कायसेसे गाठणार आहे असे सागताच माझीं वर्तमानपत्रे थोड्या विशेष प्रमाणात खपू लागली. मी उद्योग-पुरुष ठरलों. लोकाना कौतुक वाटू लागले. मनातून मला यातील काहीं आवडत नाहीं. पण करणार काय ? तेव्हा स्वतःचीच घमेंड जिरविण्याकरिता मी उद्योगदेव इ. पा. नाव धारण केलें ! लोकाच्या

विनोदास एक जागा निर्माण करून दिली, गमत आहे कीं नाहीं ? त्यानें माझ्या पाठीवर थाप मारली.

तात्पर्य, उद्योगदेव इ. पा. हा मजप्रमाणेंच परिस्थितीच्या माड-वावर सुकत टाकलेला एक वयातीत तरुण होता. सुक्या केळ्याना दर येतो. सुक्या तरुणाना ?

माझ्यात व उद्योगदेव इपात फरक होता. मीं मूढ, उद्विग्न, निराश होतों. याच्या अगदीं उलट इपा होता. तो खूप हसे, धावपळ करीं, नव्या ओळखी काढी मानापमानाची पर्वा न करिता पुढे पुढे करी आणि टेसात वागे. इतक्या धडपडीच्या मानानें त्याची प्राप्ति बेता-चीच. द. म. पचविसाच्या आत असे. वर्तमानपत्रे विकणाऱ्याला आणखी काय मिळणार ?—पण तो आनदात होता.

मला या गोष्टीचें आश्चर्य वाटे. एकदा मीं चिडून म्हटलें, इपा, तुला परिस्थितीची--या खडतर जीवनाची--कधीं चीड येत नाहीं का रे ?

खोलीला हादरा बसेल एवढ्यानें इपा हसला व म्हणाला, दोस्त, तुझ हे विचारण खुळेपणाच आहे. विस्तव झेलण्याचा अभ्यास कर-ताना हात पोळत नाहीत म्हणण्यात अर्थ काय ?

मग तू सदा आनन्दात–उत्साहात–कसा असतोस ?

थोडं नशापाणी करतो—

आ ?—मी एकदम म्हणालो, नशापाणी ? तू तर विडी ओढ तानासुद्धा दिसला नाहींस—

हो. पण मधून मधून गमतीन ब्रॅडी घेतो —

ब्रॅडी ?—काय म्हणतोस इपा–इपा—या व्यसनात तू कसा सापडलास ? कोठून सापडलास ! साऱ्या जन्माची माती करणार हें दारूच व्यसन तुला दरिद्र्याला कस परवडणार रे हे !—इपा–मी भरात आलो.

पण इपानें मला रोधून म्हटलें, खामोश. उगीच तोंडची वाफ दवडू नकोस. दारिद्याची आग न समजावी म्हणून गरीबाला नशा-पाणी करण्याची आवश्यकता आहे. वडार, लोहार, गिरणीतील मजूर हा दारूला कवटाळतो तो उगीच नाहीं. विस्मृति-परिस्थितीची, काळवेळची, जीवनकलहाची-विस्मृति होण्यास गरीबानी काय कराव साग? बेकार; तुझ्या पोटात आग पडली असताना-भेसूर चितेची निरनिराळीं भुते भोवताली नाचताना तू काय करतोस? खिन्न होऊन चडफडत बसतोस! स्वत:शींच जळफळतोस. मला ते साधत नाहीं, म्हणून मी नशा करण्यास शिकलों आहे—

अरे, पण तुला तुझ्या मिळकतींत हे परवडतें कसे?—

तीच तर मजा आहे--असे म्हणत त्यानें आपल्या धद्याची पिशवी काखोटीली मारली व तो निघाला.

मी विचारात-बुचकळ्यात पडलों. इपा तसा सालस तरुण होता. सदा उद्योग, सदा भटकन्ती, सदा धावपळ असे त्याचे जीवन होते. मला त्याचें आश्चर्य वाटे, कौतुक वाटे, आणि असा उमदा तरुण दारू पितो?- आपण त्याच्या सगतीत आहों लोक आपल्यास काय म्हणतील दारू पीना हराम है! कबूल. पण--पण हृदयाच्या यातना थाबवायला—

आणि मला मधेच शका आली.-इपा खरेंच दारूडा असेल? त्याच्या सगतींत येऊन—खोलीत एकत्र राहून-चार महिने झाले. कधीं तो झिंगलेला आढळला नाहीं. त्याच्या तोंडाला कधी घाणहि आली नाहीं. दारूचें व्यसन अगदीं बेमालूम चालवणें, लोकाना न समजू देणें शक्य आहे?—

मी त्याच्यावर पाळत ठेवण्याचें ठरविलें.

माझा विचार त्याच्या लक्षात आला कीं काय कोण जाणे! एकदां

तो हसत म्हणाला, माझ्याशीं फार लगट करतोस, पण सावध ह ! दारुडा बनशील ! वाण नाहीं पण गुण लागेल ! काय समजल ?--

पण आश्चर्य असें की, आठ दिवस अगदीं बारीक नजर ठेवूनहि इपाचें मद्यपान माझ्या आढळात आले नाहीं. मग मला वाटले आपण मद्यपी आहों, हे सागून तो आपणास बनवीत असला पाहिजे. पण स्वतःला असे लाच्छन चिकटवून त्याला काय लाभ ?

एका सुट्टीच्या दिवशी आम्हीं फिरण्यास गेलो असता इपाला मी हेच सुनावले. त्याच्या सवयीप्रमाणें तो पुष्कळसा हसला व म्हणाला, तीहि मजाच आहे, नाही ?

इतक्यात आमच्या समोरून एक तरुण मुलगी सायकलीवरून आली व आम्हाजवळून गेली. इपाची व त्या मुलीची ओळख असावी. कारण ती होघेहि एकमेकाकडे पाहून हसली. मला ते थोडेसे कसेसेच वाटलें.

का बेकार ?—इपा मला कोपरखळी मारून म्हणाला, विचारात पडला ? ही मुलगी कोण, इपा ?--

जिमखान्यावर ते बॅकर नाहींत का, त्याची मुलगी. इटरमध्यें आहे सध्या. हुशार आहे प्रेमळ आहे. तिचें रूप कसें काय आवडले ?—इपानें प्रश्न केला.

त्या मुलीची व तुझी ओळख आहे वाटत ?

निःसशय. नुस्तीं ओळखच नाही, आम्ही जिवाभावाचे मित्र आहो !

इपा !–मी उद्गारलो.

अं ह–आश्चर्यांत पडू नकोस, शकाहि घेऊ नकोस; माझ तिच लगीन होणार आहे. खोट नाहीं सागत–मीं तिला मनान वरल आहे–

आणि तिन ?--

तें अद्याप समजायचय्! पण त्याची मला एवढी नाहीं काळजी. ती मुलगी मला मिळणार अशी माझी खात्री आहे-तो अगदी आत्मविश्वासानें म्हणाला.

इपा—मला तुझी कींव येते. मी कळवळ्यानें म्हणालों, आपली स्थिति विसरू नकोस इपा. भलत्या आशेच्या भरीं पडून आपल्या आयुष्याच मातेर करून घेशील.

ही मुलगी मिळण्याची मला बिलकूल आशा नाही म्हणतोस?—

कशी मिळणार रे! ती धनाढ्याची मुलगी आणि तू वर्तमानपत्रे विकत फिरणारा. कशास काहीं मेळ?—

पण मी इपा आहे, उद्योगदेव आहे, स्वावलंबनानें वर चढूं पाहातो आहे. धद्याच्या उणेपणावर प्रतिष्ठा अवलबून नसते—

अरे पण खुळ्या, तुमच्यातील आर्थिक अंतर—

इपा मध्येंच म्हणाला, बेकार, तू अलीकडच्या लघुकथा वाच-तोस? नाहीं वाचीत. वाचतास तर तुला माझ मनोराज्य इतक खोट वाटल नसत. बेकार. तू एकदा वाचच या गोष्टी न कादंबऱ्या—

काय असत त्यात?—

श्रीमताच्या अनेक सुदर मुलींचें माझ्यासारख्या भणग तरुणावर प्रेम बसल असल्याच त्यात वर्णन असत—

त्या गोष्टी तू खऱ्या मानतोस?

का बर? ते वास्तववादी लिखाण मानल जात ना? समाजातील खरी व जिवन्त चित्र त्यात दाखविली जातात, अस म्हणतात—

लोक पुष्कळ म्हणतात. तू असल्या अचरटपणाला खर का मानावस?

मग मी जगू कसा? असं मनोराज्य मी जर करू नको —तर काय करू?

मी बुचकळ्यात पडलों. तेव्हा इपाच पुढें म्हणाला, बेकार, गड्या, तू अगदीच अर्धवट आहेस. बाबारे, जीवन हें इतकं कष्टाच होऊन बसल आहे कीं, त्यात उद्योग, उत्साह, आत्मोन्नति याच्या बलावर नामवत, लक्षाधीश होण जवळजवळ अशक्य आहे, पण त्याचें पोवाडे गायले जातातच की नाही ?—तस माझ्या मनोराज्याचं आहे. तें कधीच खर होणार नाहीं हें मी पुरेंपूर जाणून आहे. श्रीमताची पोरगी मला भगगाला मिळणं अशक्य आहे. हे मी जाणतो. तरी पण रख-रखलेल्या जीवाच्या समाधानार्थ असा एखादा दारूचा पेला झोक-ल्याबाचून गत्यतर नाहीं.

दारूचा पेला—

हो, गरिबाच मनोराज्य दारूच्या तोडीच असतं. माझी ब्रँडी म्हणजे हे असल काही मनोगज्य, बेकार, गोंधळू नकोस. पण अनु-भवान ही ब्रँडी मी झोकण्यास शिकलों आहे. एखादी श्रीमताची तरुण सुस्वरूप मुलगी आपल्यास मिळेल, एवढ एकच मनोराज्य मी करीत नाहीं. दुसऱ्या पुष्कळ मोठमोठ्या कल्पना करतो. वर्तमानपत्रे विकत फिरत असता 'हा प्लाट विकणे आहे' अशी पाटी दिसताच मी क्षणभर थाबतों. आणि मनोराज्यात तो प्लॉट विकत घेऊन तेथें एक उत्कृष्ट चिरेबदी वाडा उठवतो!—एखादा म्हतारा पेन्शनर मजकडून पत्र घेत असता, मी त्याला तसाच जाऊ देत नाहीं. लाग-लीच त्याला निपुत्रिक व धनाढ्य मानून त्याच्या माडीवर दत्तक जाण्याचा समारभ उरकून घेतों. तुला हसू येते, मलाही येते, पण अशा मनोराज्यात हृदयाचा टाहो ऐक येत नाहीं. खरी ब्रँडी घेऊन मजा करण्याची आपली ताकद नाहीं, मग काय करायचें ?—असें काहीं मनाराज्य करायचे. का तुला कशी काय वाटते कल्पना !

मी त्याच्याकडे नुसता पाहात राहिलों

## ४ थोर मनाचा मनुष्य

सामान्य शाळामास्तरच्या आयुष्यात विलक्षण व अद्भुतरम्य असे प्रसंग तरी काय घडणार. पण मला चमत्कारिक वाटलेला एक सांगतो.

शाळामास्तर म्हणून एका गावी माझी नेमणूक झाली. अद्यापि विवाह व्हायचा होता. खाणावळींत जाण्यापेक्षा हाताने करून खाल्ल्यास खर्चाच्या दृष्टीने सोयीचे होईल म्हणून तसा संसार मांडला होता व आयुष्य कठीत होतो.

एके दिवशीं दिवे लागणीचे सुमारास बाहेरून फिरून येऊन भाड्याच्या खोलीकडे रेंगाळत चाललों होतो. मनात विचार चालले होते–विवाहासंबंधीं. एका व्यवसायबंधूनेच स्वतःच्या बहिणीबद्दल प्रश्न टाकला होता. आणखीहि दोन स्थळें आली होती व त्याची परस्पराशी तुलना करीत चाललो होतो. इतक्यात जवळून जाणाऱ्या एका माणसाला माझा धक्का लागला. दोघेहि थांबलों. मी त्याच्याकडे पाहिले. माझ्यापेक्षा आठ दहा वर्षांनी वडील, क्षीण अंगाचा, हजा-

मत वाढलेला, सामान्य कपडे घातलेला असा तो होता. त्याच्या हातात एक प्रवासी गाठोडे व एक काठी दिसत होती.

माझी त्याची दृष्टादृष्ट होताच तो म्हणाला, 'मला केवढ्या जोराने धक्का दिलात. मी कोलमडून पडलो असतो ना!'

'माफ करा अं. माझं लक्ष नव्हतं' मी उद्गारलो.

तो मान उडवीत म्हणाला, 'माफीची जरूर नाही. पण माणसानं रस्त्यानं जाताना जरा भानावर असावं. विवाहाचे किंवा बायको निवडण्याचे प्रश्न खोलीत बसून सोडवावे.'

मी चकितच झालो, थोडासा भांबावलोहि. तेव्हा तो म्हणाला, 'अं-हं. भांबाऊ नका. मी तसा मोठ्या थोर मनाचा मनुष्य आहे, मी तरुणांच्या भावना ओळखतो. बायकोची निवड करणं नि आपल्या मनासारखं प्रिय मनुष्य मिळवणं–मोठं कठीण आहे ते—'

हा कोणी वेडा मनुष्य तर नाही? अशी मला चटकन शंका आली. मी त्याला डावलून जाऊ लागलो. तेव्हा मला आडवून तो आर्जवाने म्हणाला, 'मला धिक्कारून असं मुकाट्यानं जाऊ नका बुवा! मी कोणी वेडा किंवा भ्रमिष्ट मनुष्य आहे असं का तुम्हाला वाटतं?—नाही हो तसा की नाही मी चांगला ताळ्यावर आहे. माझ्या जीवनात केवढी मोठी घडामोड झालीय याची तुम्हाला कल्पना नाही!—ऐकता ती जीवनकथा! नाहीं म्हणू नका. येऊ तुमच्या घरी? तुमच्या घरच्या माणसांना खपेल मी आलो तर?'

मला त्याची कींव आली. मी सहज म्हटले, 'मी इथं एकटाच आहे. माझं लग्न झालेलं नाही अजून.'

'असं आहे तर मी येतो तुमच्याबरोबर. माझ्या जेवणाखाण्याचा त्रास पडणार नाहीं तुम्हाला. मी तसाच निजेन.'

'तस काही नाही-मी हातान करतो. तुमच्याकरिता आणखी एक मुठीचा भात. चला तुम्ही. बोलून बसून घालवू एक रात्र.'

त्याला मोठा आनद झाला. तो म्हणाला, 'माझ्याप्रमाणेच तुम्ही थोर मनाचे दिसता अं. मोठ समाधान वाटते अशा गाठी पडल्या म्हणजे!'

आम्हीं घरीं आलो. मार्गात आमचे काहीच बोलणे झाले नाहीं. तो स्वतःशी मात्र काही तरी पुटपुटत असावा. हा मनुष्य पुरता वेडा किंवा डोके फिरलेला नसेल, पण त्याच्या डोक्यातील काही स्क्रू ढिले झाल्याचे स्पष्ट दिसत होते.

घरीं आल्यावर मी दिवा लावला व त्याला स्वस्थपणे बसण्यास सागून कामाला लागलो. पडेल ते साह्य करण्यास तो मनापासून उत्सुक होता. पण अवघड असे काही काम नव्हते. मी स्वयपाकात गुन्तलो व तो भिंतीला टेकून बसून राहिला. दिव्याच्या प्रकाशात त्याची मुद्रा स्पष्ट दिसत होती. मी मधूनमधून त्याच्याकडे पहात वावरत होतो. त्याच्या मनात काय चालले असेल देव जाणे. पण त्याची दृष्टि शून्य, मुद्रा उदास व शरीर निश्चल होते. मधून मधून तो स्वतःशी काहीं तरी पुटपुटत मात्र होता.

याच्या या सौम्य वेडाचे कारण काय बरे असेल?--मी विचार करू लागलो. इतक्यात तो म्हणाला, काय हो गडकऱ्यानी प्रेम आणि मरण नावाची एक कविता आहे. वाचलीत तुम्ही?--नाही. छान केलत. ती कविता की नाही आहे चागली पण आहे वाह्यात. वाह्यात म्हणजे काय तिच्यातील विचार बरोबर नाहींत. हे दोन चरण पहा—

क्षण एक पुरे प्रेमाचा।
वर्षाव घडो मरणांचा॥ मग पुढें—

दोनच ओळी पण पण त्या त्याने तन्मयतेने म्हटल्या. त्याचा कठहि मोठा मधुर वाटला. ओळी म्हटल्यावर तो काही क्षण स्तब्ध बसला. नतर म्हणाला, 'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव घडो मरणाचा–खर वाटत तुम्हाला हे? साफ खोटी गोष्ट आहे. एका क्षणभर झालेल्या प्रेमावर मनुष्य समाधान मानू लागला तर? एका शितान त्याच पोटहि भरल पाहिजे. जगातील एवढी मोठी घडामोड नि माणसाची धडपड केवळ कणाकरिता नी क्षणाकरिता नाही! प्रेम काय, पैसा काय, मान काय एवढा तेवढा मिळून भागत नाही. प्रत्येक गोष्ट समाधान होण्याइतकी भरपूर पाहिजे. समजला माझ्या बोलण्याचा अर्थ?––नाही? मग प्रेम करून पहा न् ते अपुर मिळाल्यास जिवाची कशी तगमग होते ती पहा. तुमच्या वयारूपास अनुरूप अशी बाला आहे. तुमची गाठ पडली, सघटन वाढल नी प्रेम निर्माण झाल. तुम्ही सर्वस्व वाहिल, तिनहि सर्वस्व परत दिल. आणि समजा पुढ तुम्ही उभयता विवाह बधनानी एकत्र नाही झाला तर? तिन लाजत दिलेला रुकार आठवूनच तुम्ही समाधान मानाल?–नाही. माणसाला हे शक्य नाही.––माझ्याकडे नवलान पाहता तुम्ही ही माझी करुणकथा आहे अस का वाटत तुम्हाला?––नाही हो, तसा मी थोर मनाचा मनुष्य आहे. मी स्वभावतः क्षमाशील आहे. क्षमा हे माझ सूडाच शस्त्र आहे. क्षमा हे माझ भूषण आहे. मी अजातशत्रु आहे. काय समजल?' तो एकदम स्तब्ध बसला!

मी काही खेदाने व काही नवलाने त्याची बडबड ऐकत होतो प्रेमभग कारण आहे का याच्या या स्थितीला? आणि तो केव्हा, कुठं कसा झाला?–मनात प्रश्न उठले! पण ते इन्धन त्याच्या मनाच्या खाईत टाकण्यास मी तयार नव्हतो. मी त्यास भोजन तयार झाल्याचे सागितले. तो मुकाट उठला.

आम्ही जेवणास बसलो. साधे भात पिठले, पण त्याचे भोजनाकडे लक्ष नव्हते. साडगे घालतात त्याप्रमाणे त्याने भाताचे घास पानात तयार केले. नतर त्याने ते मोजले. नतर न जेवता तो उकीडवा, गुडघ्याला हात बाधून बसला नि त्या घासाकडे एकटक पाहु लागला. कदाचित त्यावेळी त्याच्या डोळ्यात अश्रुही असावे.

'तुम्ही पोटभर जेवा ना आता–' मी सुचविले.

'पोटभर जेऊ म्हणता ?–अलबत, ज्याला मरायच नाही, त्यान जीव जगवण्यापुरत जेवल पाहिजे.'–तो भराभर घास गिळू लागला. जेवण सपेपर्यंत मग तो स्तब्धच होता. त्याचे जेवण अगदी थोडे दिसले. माझ्या आधीच तो उठला. आचवुन आल्यावर तो म्हणाला, 'हे पहा आता आपण थोडी श्रमविभागणी करू. तुम्ही स्वैपाक केलात मी आयता जेवलो, आता तुम्ही राजासारखे बसून रहा. मी उष्टखरकट करतो.

किती समजसपणाने तो हे बोलला अन् लागलीच तो प्रत्यक्ष कामाला लागला. त्याच्या या कृतीमुळे किंवा सौम्य वेडामुळे म्हणा मला त्याच्याविषयी थोडीशी आपुलकी वाटू लागली. हा कुठचा कोण असेल. याच्या घरची माणसे कोण कोण असतील. त्यानी याच्या प्रकृतीविषयी काही काळजी घ्यावयास नको होती काय ? इत्यादि प्रश्नाची उत्तरे मनाशी शोधीत व त्याचे थोडेसे साह्य स्वीकारून मी उष्टे खरकटे आटपले. नतर टोप्याकरता पथाऱ्या टाकल्या.

त्याच्याशी काहीतरी बोलावे व त्याची पूर्वकथा विचारून घ्यावी असे माझ्या मनात फार आले. पण लागलीच वाटले, न जाणो त्याच्या मागच्या आठवणी त्यास क्लेशकारक असल्या तर ! उगीच आगटी कशाला ढवळा. पण पुन्हा विचार आला, आपली जीवनकथा कोणाला तरी सागावी व ती कोणीतरी ऐकावी अशी त्याला उत्कठा

नाहीं का? भेटीच्या प्रारभी त्यान तेच नाही का सागितल? असा काही विचार करून मी तोंड उघडणार तोंच तो म्हणाला, "प्रेमाच्या बाबतीत फसवणूक झाल्यास सूडाचा विचार किती जोरान मनात येतो नाही? होय. एकदा त्या आगींन पेट घेसल्यावर वाटत आड आलेल्याच्या प्राणाची आहुति देऊन आत्मा शात करावा! पण ते साहसहि दुर्बल मनाच्या माणसाला करवत नाही. तो उगीचच झुरू लागतो व क्षमाशील बनतो! उपायच चालत नाही त्याचा. लोक त्याला दुबळा म्हणतात. तो स्वतःला थोर मनाचा समजतो. पण मी सागतो तुम्हाला. मी तसा नाही. मला सूड उगवायचा असता तर? मला ते शक्य होते, आजहि आहे. माझा शत्रु माझ्या हाताच्या टप्प्यात आहे आणि त्याची रग जिरविण्यावे सामर्थ्य माझ्या या मनगटात नक्की आहे पण-पण मी थोर मनाचा आहे. क्षमा हे माझ शस्त्र आहे, क्षमा हे माझ भूषण आहे! लोक मला दुबळा म्हणोत नाही तर वेडा म्हणोत मी माझ्या कातेला क्षमा करणार न ज्याच्याशीं ती आज विवाहबद्ध आहे त्यालाही क्षमा करणार!–'

हे बोलताना अडचणीच्या जागी सापडलेल्या माजराप्रमाण त्याची मुद्रा कावरीबावरी झाली होती व त्यात झडप घालण्याचे क्रौर्यहि दिसत होते! ते पाहून मला थोडे भयहि वाटले. मी काही निमित्ताने त्याच्या समोरून चटकन उठलों.

त्याबरोबर तो मोठ्यादा हसला. मी चपापून त्याच्याकडे पाहू लागताच तो म्हणाला, "घाबरलास तू!–घाबरलास?–जा. मी तुला क्षमा केली आहे!–माझ्याशी दगलबाजी करून माझी काता तू उपटलीस काहीं हरकत नाहीं. केव्हा केव्हा सिंहाचा घास कोल्हा उपटतो! सिंहाला निरुपायाने हा अन्याय सहन करावा लागतो! तस हा पुरुषसिंह गप्प बसला आहे! त्याने तुला क्षमा केलेली आहे

जा, सुखान ससार कर. पण ध्यानात ठेव, तुझ्या सगतींत माझ्या कातेला दुःख झाल तर? मी सारी क्षमा बाजूला ठेऊन तुझा प्राण घेईन. कधी सोडणार नाहीं घाबरू नकोस. आज मी तुझ्या केसाला धक्का लावीत नाही. पण तुझ्यामुळ दुःख पावून काता साधा सुस्कारा टाकू दे. तो कानी पडताच मी धावत येईन नी तुझा प्राण घेईन!— तू म्हणशील मी कुठ नी हा वेडा कुठ? पण लक्षात असू दे! रेडिओन पृथ्वीवरील या टोकाच गाण त्या टोकाला फेकल तसा माझ्या कातेचा सुस्कारा मला ऐकू आल्यावाचून राहणार नाही. ही गोष्ट तुला मनमोकळेपणान सागावी म्हणून मी इथ आलो. मला न ओळखल्यामुळच तू माझ स्वागत केलस!—पण तुझ अन्न मी फुकट खाऊ इच्छित नाही.—' •

इतके बोलून त्याने आपले कपडे चढवले नि कोटाच्या खिशातून एक पिशवी काढली. नतर त्यातून एक रुपया काढून माझ्यापुढे टाकला. मी निश्चल दृष्टीने,. आश्चर्याने त्याच्याकडे पहात राहिलो. काही वेळ तो तसाच उभा होता. त्याची दृष्टी भूमीकडे लागली होती. त्याचे वेड आततायींपणाचे नाही असे वाटत असताहि मी भयभीतच होतो. पण त्याबरोबरच त्याच्याविषयी एक प्रकारची करुणा व आपलेपणाही मला वाटत होता.

त्याने आपली काठी व गाठोडे उचलले व तो जाऊ लागला मी त्याला सहज म्हटले, आत्ता रात्रींच कुठ जाणार?

'कुठंही! दुर्दैवी जीवाना पृथ्वीचा पृष्ठभाग कमी पडत नाही. त्यात पृथ्वी वाटोळी आहे. माणसान सारख्या फेऱ्या मारीत रहाव! बरं येतो माझ्या कातेला बरा जपा अं—असे म्हणत तो दारातून बाहेर पडला व अंधारात दिसेनासा झाला.

# ५ पहिलें प्रेमपत्र नी पहिलीच कविता

बास ! त्या दिवशींच टपाल हातात पडल मात्र, मी एकदम सातव्या स्वर्गांत जाऊन पोंचलो ! आनदान ऊर फुटण्याची वेळ आली ! स्वतःला कुठ ठेऊ आन् कुठ न ठेऊ अस मला झालं ! शेवटीं मी टाळी देण्याइतकी जिकली होती.

मला सरकारदरबारीं नोकरी मिळाली होती !

तुच्छतेन हसू नका असे. जावें त्याच्या वशा तेव्हा कळे. बी. ए. नापास झाल्यानतर आज पाच सहा वर्षं मी, वडील, आमचे सासरे, मेहुणे, साडू व झाडून सारे आप्तलोक माझ्या नोकरीच्या शोधात होतों ! आईचा सत्यनारायण, बायकोची सकष्टी आणि अस्मादिकाचे सोमवार यापासून निर्माण झालेली पुण्याची पार्सल देवाघरी सारखीं रवाना होत होतीं. त्याच्या दुप्पट अर्जाचीं भेडोळीं धडाधड सुरू होतीं. वडिलाची अर्धी अधिक पेनशन टपाल खात्याला खर्ची पडत होतीं. बर एवढा खटाटोप करताना घराच्या सावलीला तरी बसून होतों ! मुळींच नाहीं. मिळतील त्या भुरट्या नोकऱ्या पत्करून

खाणावळीच अन्न खात बारागावची शीव पाहात भटकत होनों. खर्चाला सारखी गळती असल्यामुळ कुटुंबात माणसाची जमा वाढायला नको, म्हणून अर्वाचीन यक्ष एकीकडे व त्याची पत्नी दुसरीकडे अशी व्यवस्था केव्हाच ठरविण्यात आली होती!—आजचेच माझे हाल काहीं कमी नव्हते. सहा महिन्याच्या बोलीनें XXX गावच्या ॲ. व्ह. स्कूलमध्यें येऊन पडलों होतो. गावाला चागलीशी खाणावळ नव्हती, राहण्यास घर नव्हते, पाण्याची गैरसोय होती आणि पगार होता अवघा पचवीस. हातान हडी उकडावी म्हटल तर ती अक्कल नव्हती, सवड नव्हती, इच्छाहि नव्हती! आईच्या आडून वडिलाच्यावर स्वतत्र बिऱ्हाड करण्याच्या कल्पनेची गोळी झाडून पाहिली! पण तो वायबार टरला! मुकाट्यान शरणचिठ्ठी पत्करून घराबाहेर पडलों!

—आणि यावेळीं या नोकरीची मुदतहि सपत आली होती. उद्याचा दिवस डोळे वटारून पाहू लागला होता.

अशा स्थितींत टपालवाल्यानें ते अमरपत्र—नोकरीचा हुकूम—आणून दिला! तापलेल्या जिवावर अमृतवृष्टीच झाली!

टपाल हातांत पडल्यावर अर्ध्या तासात आमच्या शाळेच्या हेडमास्तरापासून तो खाणावळणीच्या मोलकरणीपर्यंत सर्वांच्या गाठी घेऊन सर्वांना तो शुभ सदेश ऐकविला! धन्य धन्य झालों! तरी मनाला झालेल्या आनदाच थैमान थाबेना! चहाची सवय नव्हती आणि विड्या ओढण्याचा अभ्यास अद्यापि व्हायचा होता!—खोलीवर येऊन घट्ट कडी लाऊन आपल्याशींच नाचत बसलों!

—आणि इतक्यांत डोक्यात झिणझिण्या आल्या! वाटलें बायकोला लिहावें एक प्रेमपत्र आणि करावी एखादी सुदर कविता!

स्वर्गापर्यंत उसळया मारणाऱ्या आनदाला त्यावाचून बाध बसण अशक्यच होत !

आधीं कविता केली कीं, आधीं प्रेमपत्र लिहिल ? आता नीटसं आठवत नाहीं. एवढ खर कीं, दोन्ही प्रयत्न पहिले वहिले असतां झकासच उतरले ! स्वतःचीच पाठ थोपटींत टपाल तयार केल !— कविता वाचताच सम्पादक खुश होणार आणि प्रेमपत्र पोचताच सौ०—

पुढच्या दोन वर्षांत एक नामांकित कवि झळकू लागणार !

आणि त्याच्या पुढच्या कालात प्रतिष्ठित अंमलदार होणार !

आईला किती आनद होईल. सौ. ला किती धन्य धन्य वाटेल !

खाड् खाड् खाड् !—खण्–खण्–खण्—

" अहो शिष्ट !—जेवायला येतायना !–का आजच्या आनदात थडा फराळ करणार आहात ! " सहकारी सोनोपत सोहनी याची हाक !

" चांडाळा " !–म्हणत भानावर आलों. पाकीटें बद करून खिशात कोंबली आणि मगच दार उघडलें ! सोनोपत आत येऊन ऐसपैस हसत म्हणाले, "दारें, खिडक्या लावून काय करीत होता ?– प्रेमपत्र लिहीत होता वाटत. बाकी आज तसं टपाल रवाना झाल पाहिजे अं !–कॉंग्रॅटस् !—

मी चपापलोंच. या कावळयाला कस कळल आपल गुपित ?— कळेना का ? तो काय करणार ?—बर झाल त्यान प्रत्यक्ष काहीं पाहिल नाहीं.

× × ×

दुसरं कांहीं बोलणं काढून खानावळ गाठली आणि नतर घंटा होण्याच्या आत शाळा गाठली ! मधल्या सुट्टींत टपाल रवाना केल ! जिभेवर स्वरचित काव्यच इच्छा नसताना घोळत होत ! मनोराज्यांत भव्य राजवाडे उठत होते.

अशा स्थितींत शाळेंत एक भूकंप झाला! शाळेच्या कारकुनानं काल परवाच्या टपालात एक गाढवपणा करून ठेवला होता! काहीं महत्त्वाच्या पत्राची अदलाबदल होऊन ती रवाना झाली होतीं! रावसाहेबाना लिहिलेलं पत्र गोम्याला, व गोम्याला खडसावून लिहिलेलं पत्र रावसाहेबाच्या चरणी सादर झालं होतं! यामुळ हेडमास्तर लालबुंद झाले होते व त्याच्या संतापाचा प्रसाद सर्वांना वाटला जात होता. जो तो कारकूनाचा फूटबॉल बनवीत होता!— मी मनाशीं हसत म्हणत होतों, आपली नोकरीच संपलीय. चालू दे गोंधळः—कारकून लोक तरी काय गाढव असतात? दोन चार पत्रं तीं काय आणि तीं रवाना करताना इतका गाढवपणा—

—आणि इतक्यात माझ्या कानाशीं कोणीतरी म्हणाले, "आणि तुम्ही तरी असे काय शहाणे आहां!—आजच्या तुमच्या टपालाची आठवण कराना!—काय झालं माहीत आहे? प्रेमपत्र गेलय सम्पादक-महाशयाना आणि कविता गेली आहे सौ. प्रमीलाबाईंना! तो सोनोपंत सोहनी आलाना एकदम; त्यामुळ झाला हा घोटाळा!"

"अरे बापरे!" माझ्या अंगाला घाम सुटू लागला!

मी ऐटीन स्वतःची समजूत केली छट! असं होणंच शक्य नाहीं. मला पक्कं आठवतं—शंका मला थाबवून म्हणाली, काय, काय आठवतं: सोनोपंताला आपलं टपाल कळू नये म्हणून तू घाईघाईन पत्ते लिहिलेला आणि हिंच पत्र त्याला व त्याची कविता हिला असं करून बसलास. मला पक्कं वाटतं!

झालं! जों जों मी शंकेला धुडकाऊं लागलो, तों तों ती मला जास्तच मिठ्या मारू लागली. माझा पाडाव झाला. मी पागल बनलों! शाळा केव्हा सुटते व मी खोलीवर केव्हा पळतों, असं मला झालं! खोलीवर जाऊन मी झालेल्या घोटाळ्याची दुरुस्ती काहींच

करणार नव्हतों, करू शकणार नव्हतों ! पण मनाची चलबिचल बाहेर पडू नये व स्वस्थपणें विचार करता यावा एवढीच इच्छा होती !

पुढचा शाळेचा वेळ कसा सपला हें माझे मलाच माहीत. घटा पडताच कांहीं तरी निमित्त करून सर्वांआधी पळ काढला. खोलीवर आलों. दार लावून घेतलें आणि ध्यानस्थ बसलो. एकेक गोष्ट बारकाईनें आठवली. कविता रचताना फिरत होतों की बसलों होतों ? आधीं कोणतें पत्र लिहिले, सोनोपतानें हाक केव्हा दिली, आपलीं पत्त्याचीं पाकिटे त्या सुमारास तयार होती का ?–असे प्रश्नावर प्रश्न विचारास घेतले. पण, स्मरणशक्ति अशी मिस्कील कांहींच आठवेना ! एकदा असे वाटे न् दुसऱ्यादा तसे वाटे. सकाळीं घडलेला प्रकार वर्षा दोन वर्षांखाली घडल्याइतका प्राचीन वाटू लागला ! खरेच काहींच आठवेना.

मी—तरी पण पत्राची अदलाबदल होणच शक्य नाहीं.

शका—झालेली आहेच आहे.

मी—मला आठवत–पक्क वाटत कीं,—

शका—तुझ्या आटवणींच झालय कादेवाग्याच भरीत.

मी—(चिडून) बर झाली तर झाली अदलाबदल, काय कोणाचा गळा कापला नाहीं की चोरी केली नाहीं.

शका—( हसत ) ते तर खरच ! पण सम्पादकाला गेलेल प्रेमपत्र काय उजेडात येण्यासारख आहे !—कविता हटकून प्रसिद्ध व्हावी म्हणून तू त्या टारगट साप्ताहिकाची निवड केलीस. तुला माहीत नाहीं, तो सपादक काय किंमतीचा आहे ? तुझ ते अगदीं मोकळे-पणानें लिहिलेल, प्रेमाच्या पाकात भरपूर बुडवलेल, शृगारिक चेष्टानीं ओथबलेल पत्र तो कुचेष्टाप्रिय सपादक काय वाचून बाजूला फेकील म्हणतोस ?–नाहीं. वानराच्या हातात कोलीत गेले आहे तें. तो त्याचा

भरपूर फायदा घेणार. पुढच्या अंकात ते समग्र छापलें जाणार !— आणि मग तें वडिलाना कळणार, सासरे वाचणार, मेहुणे वाचणार! तुझी ती अक्कल पाहून—

मी घाईला येऊन कपाळावर हात मारून घेतला! छे, अनर्थ झाला! आता! मी स्वतःवर चिडलों. सोनोपत अवेळीं आल्याबद्दल त्यास लाखोली मोजली आणि जगास लाथा दिल्या!—पण एवढें करूनही झालेला गाढवपणा निस्तरायचा कसा हे ध्यानात येईना. सकाळीं ज्या प्रणयानें मी धुन्द झालों होतो, जीं वाक्यें लिहिताना माझ्या मला गुदगुल्या झाल्या होत्या आणि जे प्रेमपत्र मला पताका-स्थान झालें होतें, तें आता साऱ्या खोलीभर ठळक अक्षरात लिहिलेलें दिसू लागलें !—आणि इतका आचरट मजकूर आपण कागदावर प्रत्यक्ष बायकोला लिहू कसा शकलों? याचें आश्चर्य वाटू लागले.

हा सारा आचरटपणा चार दिवसाच्या, आठ दिवसाच्या आत चवाठ्यावर येणार! आपल्या ओळखींतील ज्याच्या त्याच्या तोंडीं हा विषय होणार! बिनओळखीच्या लोकापैकीं अनेकजण तो आपल्याच नजरेला आणणार! अशा स्थितींत आपली कोण फजिती! आणि प्रमिला! छे ती तर बायकोची जात! लज्जेनें प्राणच देईल!—

× × ×

हताश जिवाला एकदम एक कल्पना सुचली. पोस्टातून पत्रे काढून घेतलीं तर!—विजेच्या धक्क्यानें उठलों. कपडे केले आणि पळू लागलों. आजूबाजूला, समोर, कशाकडेहि लक्ष दिलें नाहीं. पोस्ट गांठलें!—आणि मास्तराची विनवणी केली! त्यानीं डाक बंद होऊन स्टेशनकडे रवाना झाल्याचें वृत्त सांगितले!—आणि मग माझ्या ध्यानात आलें कीं, दिवेलावणी झाली आहे!

तें पत्र चवाठ्यावर आलें तर? या विचारानें इतका पिसाळून

गेलों कीं, त्या पत्राच्या मागोमाग धावून तें वाटेल त्या उपायानी हस्तगत केलेंच पाहिजे असा ध्यास लागला. मेललाच निघण्याचें ठरविलें !

पुन्हा साऱ्या जन्मात नाहीं कविता लिहिणार किंवा प्रेमपत्रे पाठविणार ! निदान दोन्ही गोष्टी एकदम तर नाहींच करणार !

तें पुढे जमेल पण आजच्या गाढवपणावरच उपाय ?

रात्री दहाला मेल गाठली !

पत्र हस्तगत करण्यास काय युक्ति करावी ?–याचा व्यूह रचू लागलो. डाक अमूक वेळा पोचते. बटवडा अमूक वेळ होत असावा. सपादकाच्या घरीं पत्रे जात असतील कीं, ऑफिसात, कीं त्याचा शिपाई पोष्टात जात असेल. पाळतीवर राहिले पाहिजे. शिपायाला फितूर करता येईल. तेव्हा पोस्टमनकडून त्याला टपाल मिळाल्यावर त्याच्यावर तोफा डागाव्या ! एक रुपया चिरीमिरीच्या आत तो घायाळ झालाच पाहिजे ! बस्स. ही युक्ति नाहीं फसणार !—ते पत्र सपादकापर्यंत नाहींच जाऊ देत.

पण ती कवटाळीण शका ! ती होतीच पाठोपाठ. ती म्हणाली, "समजा सम्पादकाला शिपाई नसला तर ते समक्ष येऊनच आपलें टपाल नेत असलें तर ?"

मेल धावत होती. जागेच्या अभावी अवघडलेला देह कष्टी झाला होता, त्यात मनातील ही लढत !–वाटले, आपण कुठून या भानगडींत पडलों ! पण पत्र मधल्या मध्यें हस्तगत करण्याचा विचार मनातून जाईना !—खटपट—लटपट—गटपट–काहीं तरी करून ते सम्पादकाच्या हातीं जाऊ द्यायचें नाहीं, असें वरचेवर मनाशीं ठरविलें !

पत्राबरोबरच अपेक्षित स्थानी पोचलो !

× × ×

नव्या दिवशीं नव्या मोहिमेला सुरुवात झाली !

प्रश्न आला, सपादकाची पत्रे कोठून वाटलीं जात असतील ? शोध घेतला इकडे धावलों. तिकडे पळालों ! एकानें एक सागितलें—दुसऱ्यानें दुसरें, एकानें थाप दिली. ते साप्ताहिक प्रसिद्ध इथे होतें. परतु त्याचा संपादक असतो सिमल्याला ! ही वार्ता सागणाराचा गळा दाबण्याची इच्छा झाली; पण तो खून करून पत्र मिळण्याचा सभव नसल्यामुळें विचार रहीत केला. पुन्हा इकडे तिकडे धावू लागलों.

त्यात सपादक आताच टपाल घेऊन गेल्याचें कळलें ! जागच्या जागीं पक्षघात होतो कीं काय असें वाटलें ! कसे तरी अवसान धरून पत्ता काढीत चाललों.

मनात एक चित्र रगत होते. सम्पादक चार टारगट मित्रासह बसले आहेत. प्रथमतः आपलेंच पाकिट फोडले गेलें आहे——आणि——हास्याचे तारनळे उडत आहेत !

संपादकाच्या घरीं गेलों. ते आपल्या बाहेरच्या खोलीतच होते.

" आत या– " दणक्या आवाज आला.

वधस्थलीं चाललेल्या मेंढराप्रमाणें आत गेलों. एका मोठ्या टेबलाजवळ टेबलावर मोठमोठ्या दोन तगड्या दिसल्या. नतर एक ऐसपैस पसरलेल्या——समोर पडद्याप्रमाणें धरलेल्या वर्तमानपत्राचा पडदा हटला. आणि सपादकाची मूर्ती पाहताच थबकलों ! दोन हत्ती, तीन गेंडे, दोन चार वाघ आपसात लढता लढतां मेले असता, त्याची गल्लत परमेश्वराच्या कारखान्यांत रवाना झाली व त्यातून एक प्राणी बाहेर पडला तो हा संपादक !

साहित्याच्या प्रातात काव्यवधूशीं धिंगाणा घालणारा संपादक इतका ऐसपैस असेल अशी माझी कल्पनाच नव्हती.

गडगडाट झाला—" काय ? " ( अध्यहृत वाक्य—कारे चोरा, इथ का आलास ? )

मी नोकरी मागण्यास गेलेल्या कारकुनाची लाचारी दाखवीत म्हटलें,

' मी—मी—एक कवि आहे !— '

' ते दिसतच आहे !–पुढ — "

' आजच्या डाकेन माझी एक कविता आपल्याकडे आली आहे— '

' या अंकात स्थळ मिळणार नाहीं— '

' ती केव्हाच प्रसिद्ध होऊ नये अशी माझी इच्छा आहे–– '

' मग ती पाठवायला कोणत्या गाढ्यानें सांगितल होत— '

' चुकून–फसून– ' मनात १०८ सत्यनारायणाचा नवस बोलता मी माझे पाकीट परत मागितले.

टपाल टेबलावर पडलेच होते. संपादकानी तगड्या बाजूल घेतल्या व सारीं पत्रे गोळा करून माझ्या अंगावर फेकली. " घ्या हुडकून — "

माझें पाकीट——अगदीं तसेच बंद असलेलें पाकीट––ताबडतोब ओळखलें !––पेगाच्या खडीसाखरेने देव पावला असता तिथे १०८ सत्यनारायण बोलून गेल्याचा खेद वाटला !––पण पुढें ते सत्य-नारायण केडगावाला जाऊन परस्पर फेडण्याचें ठरवून आपलें पाकीट हस्तगत केलें आणि संपादकाचा निरोप घेतला !

पण पाकीट हातात येताच मला ते चाचपून कळलें कीं, त्यांत कविताच होती ! पत्रांतील अदलाबदल झालीच नव्हती ! हरे राम !

पहिलें प्रेमपत्र न् पहिलीच कविता. पहिल्या वहिल्यात किती मजा आहे ! !

## ६ उपद्व्यापी

ठराविक मार्गानें नि ठराविक स्थानाकडे आमची रीघ चालू झाली होती. आमची म्हणजे फिरण्यास निघालेल्या व्यक्तींची बर का ! मी तसा एकटाच होतों.

सायंकाल. उन्हाळा जवळ आलेला. अशा स्थितीत उन्नट व कुन्नट नागरिक जीवनास त्रासलेले जीव मोकळ्या थंड वाऱ्याकरिता किती उत्सुक असतात ! आमची माळ त्या पैकीं एक होती. एकएकटे, जोडीजोडीनें किंवा टोळीनें आम्ही जात येत होतो. मुद्रेतील व वस्त्राभरणातील वैचित्र्य प्रत्येकाच्या गतींततहि दिसत होतें.

मी मागे पुढें पाहात चाललों होतों. मनात एक विचार प्रामुख्यानें घोळत होता. या घोळक्यामध्यें किती तरी जीव खरे खुरे सुखी असतील बर ?—कष्टी मुद्रा फारशी कोणाची दिसत नव्हती. पण प्रत्येक वेळीं मुद्रा मनाचा आरसा थोडाच असू शकतो ! या कृत्रिम आनंदाखालीं दुःखानें भारावलेली मनें काय थोडीं असतील ? आणि इत-

क्यात माझ्या कानी शब्द आले—ते समोरून येणारे जोडपे पाहिलेंस का? मोठें प्रेमळ न् सुखी आहे बर का!

मी चपापलों. भानावर आलों. माझ्या पुढे आठ दहा पावलावरून एक जोडपे उभयतामध्यें एक हातगाडी ढकलीत चालले होते. गाडींत एक साधारण गोजिरवाणे मूल होते. ते जोडपे पाठमोरे असल्यामुळें त्याच्या तारुण्यापलीकडे मला त्याच्यासबधी विशेष अटकळ बाधता आली नाही. वस्त्रप्रावर्णावरून त्याची आर्थिक स्थिति तोलणेहि कठिणच होते. कारण जगात येताना थोड ठाक टीक होऊन याव लागत हा नागरिक दडक आता सर्वमान्य झालेला आहे.

हे पुढचें जोडपे सुखी आणि प्रेमळ असेल?—मी स्वतःला प्रश्न केला. पण त्याना उद्देशून बोलले कोण?—तितक्यात माझी शका निवारण झाली. त्यापैकीं पुरुष म्हणाला, 'पहा दोघहि किती आनदात येत आहेत.'

मग माझे लक्ष फार पुढे गेलें. तिकडून एक जोडपे येत होते.

माझ्या पुढच्या जोडीपैकीं स्त्रीनें विचारलें—'नवराबायकोच आहेत ना?'

पुरुष नवल दर्शवीत म्हणाला, 'नाहींतर दुसर कोण असणार? आपल्या समाजात तरी नवराबायकोच अशीं फिरायला जाऊ शकतात.'

'होय ना'—स्त्री म्हणाली, 'मग त्यात नवल करण्यासारख काय आहे. नवराबायकोनी आपसात प्रेमळ असायच नाही तर मग कुणी असायच? पण मी समजले, मला एवढ अगत्यान तें जोडप का दाखवल तें.'

पुरुष हबकलेला दिसला. मी स्वतःशीं हसलों.

स्त्री पुढें म्हणाली, ' पण मला हा असला वस्तुपाठ नको आहे. बरं, नवराबायकोंत प्रेम असायला तसं काहीं असावं लागतं. '

पुरुषाने गाडीवरून हात काढून घेतला आणि थोडेसें चपापून मागे पुढें पाहिले. मी चटकन् चालण्याचा पवित्रा बदलला व पुढें झटकलो.

श्लील कीं अश्लील मला सांगता येत नाहीं पण मनात विचार आला-मग त्या जोडप्याच्या पुढ्यात जी गाडी आहे नि त्यात जें बाळ आहे ते द्योतक कशाचें ?

बाबागाडी ढकलणारें जोडपे पुढें गेलें व समोरून प्रेमळ व सुखी जोडपे माझ्या अगदीं समोर-जवळ-आले. मी काहींशा शोधक दृष्टीनें त्याच्याकडे पाहिले आणि नंतर जणू काय मागून कोणीतरी येत आहे व मी त्याची वाट पाहातो आहें अशा बहाण्यानें मी थाबलों. तें जोडपें माझ्या अंगावरून पुढें गेले. त्याच्यामध्ये मला विशेष असे काहींच दिसले नाहीं. साधारणपणे पुरुष पस्तीस चाळीस वर्षापर्यंत नि स्त्री तीसाच्या आत बाहेर. दोघांचे रूपहि सामान्य. वस्त्रेभरणेंहि सामान्य ! दोघांच्या मुद्रा मात्र प्रसन्न होत्या; पण त्याच्या सौख्याचा किंवा परस्परावरील प्रेमाचा तो पुरावा मानणें थोडें धोक्याचेंच होते. हातगाडी घेऊन चाललेले जोडपें रडतमुख थोडेंच होतें. तें पहा, आताही तें परस्पराशीं गुल्गुल् बोलत चाललें आहेच.

आणि त्याच वेळीं मला वाटलें, आत्तां माझ्या जवळून गेलेल्या जोडप्याचे मनोभाव--निदान या वेळचे--मला कळतील का ?-- अहा ! तें पहा--किती उत्सुकतेनें तीं दोघे हातगाडी घेऊन चाल- लेल्या जोडप्याकडे पाहात आहेत ! हा देखावा पाहून त्याना असेंच वाटत असेल नाहीं, कीं किती सुखी व प्रेमळ जोडपें आहे !

आणि त्याच्या त्या दांपत्यप्रेमाचा एक चुटका मी आत्ताच ऐकला होता. मनाशीं हसलो, पुटपुटलों, काय लपडाव सुरू आहे पहा. यानें म्हणायचें तो सुखी असेल आणि त्यानें म्हणायचें हा सुखी असेल. जगाच्या बाजारात—जीवन कलहाच्या धादलीत—खोट्या नाण्याचाच सुळसुळाट आहे का?—माझी स्वतःची साक्ष तीच होती. बायको दुर्भापणें करून माहेरीं निघून गेली होती आणि मीहि वैतागून रजा काढून कुठेतरी आलों होतों.

ससार! ससार!! कुठे आहे तें सौख्य, प्रेम, शाति, समाधान!

मग हे सारे जग असे ससारबद्ध का आहे?

हातगाडी घेऊन चाललेलें ते जोडपे मजकडे पूर्ण दुर्लक्ष करून माझ्या अगावरून केव्हाच निघून गेलें. आणि दुसरे ते प्रेमळ व सुखी मानले गेलेले जोडपेहि मागे खूप दूर गेलेले दिसून आले. मनात आलं: त्या दाम्पत्याचे प्रेम व सौख्य एकदा घासून पाहावे. मी परत फिरलो व त्याचा पाठलाग केला दहा मिनिटात मी त्याच्यापासून दहा पावलावर आलो आणि त्याच्या नकळत मागोमाग चालू लागलो. त्याचा हा सवाद ऐकण्याविषयीं मी भारी उत्सुक होतो. मघाचे शीत मी चाचपून पाहिलें होते. आताचें हें ताजें भाडेहि अजमाऊन पाहण्याची इच्छा होती. म्हणून त्याना कसलाहि संशय न येईल अशा बेताने मी त्याच्या पावलावर पाऊल टाकून चाललों. माझी अटकळ आहे कीं, अर्धा पाऊण मैल तरी आम्ही चाललों. आणि एवढ्याला बाईच्या चालीमुळे अर्धा तास तरी सहज लागला. पण आश्चर्य हें कीं, त्या दोघात एका शब्दाचीहि देवघेव झाली नाहीं. तीं दोघे पतिपत्नी होतीं याविषयीं शका नव्हती. कारण गावात शिरल्यावर त्या दोघाच्या परिचयाचीं स्त्री पुरुष माणसें भेटली. त्यावेळीं कधीं नुसतें हास्य कधीं नुसताच हुकार नी कधीं एखादा

कुशल शब्द झाला. पण तो परक्यात. तें जोडपे आपसात एक शब्दहि बोललें नाहीं.

हा अबोला कशाचा द्योतक !

तितक्यात ते जोडपे एका मोठ्या वाड्यात शिरलें नि दृष्टिआड झाले. मी काहीं क्षण त्या वाड्याच्या तोंडाशीं घोटाळलो, आत डोकावून पाहिले, कानोसा घेतला. चाळवजा तो वाडा असावा. तेथे अनेक बिऱ्हाडे असावी. पाण्याच्या नळावरील गडबड, भांड्याचें आवाज, पोराचा कलकलाट, हाका मारणें, ओ देणे, कडकडून आपसात बोलणे खो खो किंवा फिदी फिदी हसणे आणि काहीं मुलांचे केकावणें इत्यादि गोंधळानें तो वाडा म्हणजे शहरीं मडईचा एक छोटासा नमुना होता. आणि अशा बकाल वस्तींत म्हणे एक सुखी व प्रेमळ जोडपे रहात होतें !!!

आता अंधार पडू लागला. सर्वत्र दीपज्योति उजळूं लागल्या. उदास वृत्तीनें मी त्या वाड्याकडे पाहिले नि आपल्या मकाणाकडे निघालों. माझ्यासारखाच एक भिकार व एकाकी काळ कठणारा जोडीदार मी पाहिला होता. एका दरिद्री खानावळींत जेवावे नी भिकार जागेत जाऊन पडावे हा इथे आल्यापासूनचा क्रम. तेंच कोष्टक भरून काढलें आणि मठींत जाऊन पोंचलों.

आमचे सहकारी आधींच येऊन पसरले होते. मुद्रीच्या झिगमिग प्रकाशात विडीच्या धुराचें छत टागलें होतें. हवेला इथें मज्जाव होता.

मी पथारी पसरीत म्हटलें, " पाडबा, आज मी एक चमत्कार पाहिला. "

पाडबानी नुसता हुकार भरला.

" पाडबा, आज मी एक प्रेमळ नि सुखी जोडप बघितल. "

" हू--"

" आणि दुसरहि एक तसलच जोडप पाहिल. "

" हू--"

" हू काय लेका ?—जरा जिज्ञासा दाखीव ना-- "

" हू--"

मी चिडलों व त्यास पायानें डवचलें. पण तो स्थितप्रद पुढच्या क्षणाला घोरू लागला. यात त्याच्याकडे काहींच दोष नव्हता. वयाला चाळीस वर्षे होऊन गेलेलीं. पगार किंवा मिळकत जीव जगवण्या-पुरती. अशा स्थितींत तो ससारात पडण्याची किंवा त्याच्या गळ्यांत ससार पडण्याची आशा किवा धास्ती राहिलेली नव्हती. तसा तो सुखी होता.

शक्य आहे. एकटा जीव सुखी होणें शक्य आहे. पण संसारात पडलेला दुकटा जीव—प्रेमळ ? सुखी ?—थोताड आहे नुसते !

पाच मिनिटात मी पक्का कम्युनिस्ट बनलों. मी ससाराला, देवा-धर्माला, दैवाला दैववानाना सर्वांना यथास्थित शिव्या हासडल्या आणि या अंदाधुदीमध्यें क्राति झालीच पाहिजे असा निर्णय करून टाकला.

आणि अशा स्थितींतच मी त्या प्रेमळ व सुखी जोडप्यावर घस-रलों. लोकाना ते जोडंप सुखी वाटत असेल. पण ती त्या दोघाची हातचलाखी. तींत खरेंपणा असणें शक्यच नाहीं. ससारी जोडपे सुखी अं !

नाहीं. हा नाटकी आविर्भाव आपण नाहीं चालू देणार. त्याचे बेंड बाहेर फोडलेंच पाहिजे. सुखी म्हणजे सुखी !!

आणि त्या प्रश्नाचा मी अगदीं जिव्हाळ्यानें विचार करू लागलो.

सकाळीं उठताच त्या वाड्यात जायचें, ओळख पाडायची, प्रत्यक्ष

त्या जोडप्याशीं परिचय करून घ्यायचा, आणि मग?--एखादे दिवशीं तरी त्याची आपसांतील खेटराखेटरी पाहायला मिळेल. मग त्याना साग्रसगीत पकडून नमस्कार करायचा!-या बाबतीत दहावीस रुपये खर्च झाले तरी हरकत नाहीं.

मी उठलों व स्वतःची शिल्लक तपासली. सुमारे बारातेरा रुपये होते. काहीं हरकत नाहीं. आणखी पाचदहा लागले तर सासरोबा-कडून मागवू. लेकाने फसवून रेडकू माझ्या गळयात बाधलेन्. त्याला थोडी अद्दल घडवलीच पाहिजे.

खर्चाची व्यवस्था झाली. मग मी त्या वाड्यात घुसायचें कसे याचा विचार करू लागलों. थोड्या वेळात तेंही कोडे सुटलें. स्वतःचीच पाठ थोपटली नी मग झोंपेकडे वळलों.

केव्हा झोप लागली कळलेसुद्धा नाहीं.

त्या प्रेमळ व सुखी जोडप्याची आपसातील जोडापट्टी पाहण्याची सुसंधि मला इतक्या लौकर लाभेल असे मला स्वप्नातहि वाटलें नव्हतें. पण देवाची कृपा. माझी एक दिडकीहि खर्ची न पडता, त्याच्या भाडणाचा सुखसोहळा मला पाहण्यास मिळाला. कसें कुणाला माहीत पण माझ्या समोरच त्या दोघात बोलाचाल सुरू झाली. शब्दानें शब्द वाढला. पुरुषानें होळीपुनव गाजविण्यास प्रारभ केला. स्त्रीनें बोटें मोडून रडतओरडत शिव्याशाप दिले. त्याचा सताप अनावर झाला व त्यानें काठी हातात घेतली. तिला केरसुणी सापडली! —सुखी नी प्रेमळ जोडपे अं! मी खो खो हसत सुटलों. भले बहाद्दर! मी त्या दोघाना प्रोत्साहन दिलें. वहिनी—वहिनी जपून अ!—दादा—दादा—ह उडवा टोला! आपण पुरुष आहोंत ह—चालू द्या!—'

आणि इतक्यात माझ्या पेकटात कुणाची तरी लाथ बसली. मी खडबडून जागा झालों. डोळे चोळीत उठून बसलों. पाडबानें

केरसुणीचे फटकारे लगावीत माझ्या अंगावरचा केर व डोळ्यातील झोप उडवली.

अस्तु ! स्वप्नात का होईना पण त्या प्रेमळ जोडप्याची जोडापर्ट मी पाहिली. आनद वाटला. पाडव्यानें मारलेली लाथ व केलेल अपमान मी विसरून गेलों. पहाटे पडलेली स्वप्नें बहुश: खरीं ठरतात मनाला मोठा आधार वाटला. घाईनें मुखमार्जनादि आटपत असताच कल्पना स्फुरली: समजा, रात्रीं ठरविल्याप्रमाणें आपण गेलों त्य वाड्यात अन् त्याच वेळीं त्या जोडप्याचे मारे कडाक्याचे भाडण चालले आहे. वाड्यातील माणसे एकत्र जमली आहेत, खूप आरडा ओरडा चालला आहे. त्यात पोलिसला बोलवा अशी आरोळी ऐक येत आहे, असा देखावा दिसला तर ?—अहा ! किती बहार होईल असेल भाग्यात तर होईलहि तसे. कोणी सागावे ?

मी त्या वाड्याकडे निघालों. जाता जाता वाटेत एका स्टेशनरी दुकानातून एक रुपया दीड रुपयाचे फौंटन विकत घेतलें मनाल नुसत्या गुदगुल्या होत होत्या. विवाहित जोडपे प्रेमळ आणि सुखी अं

वाड्याजवळ येऊन पोंचलों. आत आरडाओरड चालल्याचा भा झाला. स्वप्न खर ठरणार की काय ? कानोसा घेत आत शिरल नित्याचीच धादल चालू होती. चौकसदृष्टीनें इकडे तिकडे पा लागलों. ते जोडपे कोठे बरें राहात असेल ?

इतक्यात घोगऱ्या आवाजात प्रश्न आला, ' का हो कोण पाहिजे ? मीं चपापून पाहिलें. ठेगणी, ठुसकी, विपुल शरीराची नेसत्या वस्त्र सहित एक मूर्ति शेंडी उडवीत आमच्यापुढें आली. शकून चागल वाटला नाहीं.

मी चाचरत भोंवताली नजर टाकीत म्हणालों, " काय बर त्या नांव. याच वाड्यात राहतात—"

" काय काम आहे पण ? "

" त्याच फौंटन हरवलय् अस मला वाटत."

" तुम्हाला सापडल वाटत ? "

" हो–हात पुढें आला. मी नकार दर्शवीत म्हटलें, अं ह ओळख टवली पाहिजे. खूण सागा—"

इतक्यात आणखी चार जिज्ञासू जमले. स्थूल देहानें माझ्या आगमनाचें कारण व्यक्त केलें. तेव्हा एक सज्जन एकदम म्हणाले, 'फौटन ना ?–मग आमचेच तें. चार दिवस हुडकतो आहें मी. बर झाल बुवा–आणा–यॅक्स !' प्रासव्या आधी आभार देण्याची त्याची घाई पाहून मला कौतुक वाटलें. त्याचें सरळ कोवळें मन दुखवण्याचें माझ्या जिवावर आलें. पण करणार काय ! मला तें फौटन काल सापडले (!) होतें ! मी तें सांगताच तो हरिश्चंद्र म्हणाला, " हो का ! मग तें माझें नव्हे. आपण लोकाची वस्तु कशाला आपली म्हणावी.'

पण तितक्यात त्याला आठवलें. तो ओरडत म्हणाला, 'आपले बंडोपत कालच आपल कायस हरवल्याच म्हणत होते. त्याना विचारल पाहिजे.'

तो महात्मा जवळच्या एका जिन्यात अदृश्य झाला.

मी मडळीशीं व मडळी माझ्याशीं भाषणाचा खेळ खेळू लागलों. त्या वाड्यात कुणाचें तरी फौंटन हरवलें असल्याची प्रत्येकासच खात्री होती.

इतक्यात वरील राजे हरिश्चंद्र बंडोपतासह उपस्थित झाले.

बंडोपत एकदम माझ्याजवळ येऊन म्हणाले, " आमच फौंटन तुम्हाला सापडलय् म्हणे. चला, तें दुरून दाखवा. आमच असल तर होय म्हणू— "

" मेकर सागाल का ?–स्वान कीं पार्कर—"

बडोपत म्हणाले, "तें आमच्या भावान विकत घेतलय्. स्वान असाव. कदाचित् पार्करहि असेल. दाखवा पाहू—"

"मग तुमच नाहीं ते. तें स्वान नाहीं नी पार्करहि नाहीं. एक आपल साध–हें पाहिलत—" मी हात वर करून सर्वांना कोरे फौटन दाखविलें. सारी मडळी टकमका पाहात राहिली.

इतक्यात ज्याच्या प्रत्यक्ष दर्शनार्थ मी एवढा उपद्व्याप केला ते गृहस्थ पिशवी घेऊन बाहेर पडताना दिसले. मला आनद झाला. मी म्हटलें, "ते पहा गृहस्थ. त्याचे हे फौटन असावें, मी त्याना शोधीत होतों.

"कोण गोविंदराव ?––ते फौटन कधींच वापरीत नाहींत." कोणीसे म्हणालें. पण मला आता या माहितीची आवश्यकता नव्हती.

पण नितक्यात गोविंदरावाना एका पोऱ्यानें हटकून फौटनची वार्ता सागितली. ते नवलानें दरवाज्यातच थाबले. मी त्याच्याजवळ गेलों. नमस्कार केला. त्यानाहि फौंटन न देता बनविण्याचा माझा विचार होता.

"मला काहीं बोलायच आहे तुमच्याशीं––" मी प्रारभ केला.

फौटनसबधीं ना ? चला ना. मी मडईत निघालोंय्. वाटेन बोलू. या तमासगीर लोकात वाच्यता नको. त्यानी माझा हात धरला. आम्ही चालू लागलों. गोविंदराव–माझा हीरो-मोठा मुत्सद्दी दिसला.

वाड्यापासून दूर गेल्यावर आम्ही एका बोळातून दुसऱ्या मोठ्या सडकेवर आलों. तोंपर्यंत गोविंदराव एक अक्षर बोलला नाहीं नतर तो थाबला व त्यानें शातपणें म्हटले, "ह काढा पाहू तें फौंटन."

मी का सरदलों. मला सागता येणार नाही. पण मी फौंटन काढून त्याच्या हातात दिलें. त्यानें ते पाहिल्याप्रमाणे करून खिशात खोंचलें आणि नतर म्हटलें, "मी फौंटनबिंटन खर म्हणजे काही वापरत

नाही. पण तुम्ही आणून दिलत हे माझच आहे. फार चागलीं गोष्ट केलीत ही. असल्या नसत्या वस्तु हरवण्याच मला बाळकडूच आहे म्हणा ना. मला वाटत काल तुम्हाला हे त्या रस्त्याला सापडल असेल नाही ?––"

मीं थडच होत चाललों.

तो पुढें म्हणाला, " दुसऱ्याची साडलेली वस्तु सापडली तर कोणी कोणाला आणून देत नाहीं. पण तुमची सचोटी वाखाणण्यासारखी आहे. मी हे सार वर्तमानपत्रात प्रसिद्ध करीन—"

मी मनातून त्याला शिव्याची लाखोली वाहण्यास प्रारभ केला. " पण तो फौटनच्या लाभात मस्त होता. तो म्हणाला, " पण काय हो मिस्टर, मला एका गोष्टीच कोड आहे. "

मी प्रश्नार्थक मुद्रा केली. आता पळ कसा काढायचा एवढा एकच विचार माझ्या डोक्यात घोळू लागला.

गोविदराव म्हणाला, " काल तुम्ही आमचा पाठलाग करीत आमच्या वाड्यापर्यंत आला ते का ?––"

मी पळच काढला ! फौटन जावें आणि वर शालजोडींतील आहेर मिळावा, अशी माझी अपेक्षा नव्हती. मी किती निराळा व्यूह रचला होता !––

गोविंदरावाच्या सर्व पिढ्याचा उद्धार करीत मीं खोलीवर आलों. पाड्या विडी फुकीत पसरला होता. त्याच्या मुखाचा, स्वस्थपणाचा मला हेवा वाटला. मी त्यास उगीचच ओरडून म्हणालो, " पाड्या, कालच ते जोडप––"

" मेल कीं काय ? "

" नाहीं गाढवा. ते असाव तितक प्रेमळ न् सुखी नाही––"

" अस्सं ?––देव त्याच भल करो. "

" पाड्या, तुला लेका काहीं अक्कल नाहीं--"

" हे मला केव्हाच माहीत आहे. त्यात नवल करण्यासारख काय आहे? तुझ्यासारख्या अकलेच्या खदकाशीं माझा स्नेह जमला हें भाग्य काय थोड आहे?--ह ही विडी घे. जरा शात हो. मागाहून आपण जगाची उठाठेव करू."

## ७ खं. क. देवाचीं पत्रें

— १ —

" श्रीयुत संपादक यास, वि. वि.

माझा व आपला अर्धामुर्धा परिचय आहे, म्हणजे असे की आपण मला ओळखीत नाहीं, पण मी आपल्याला ओळखतों. माझी व आपली कुठें व केव्हा गाठ पडली होती व आपल्या दोघात काय बोलणें झालें याचा इतिहास मी पुढें केव्हां तरी सागेन. आजच्या पत्राचा हेतु थोडा वेगळा आहे. आपल्या पत्राचा दिवाळी खास अंक निघणार आहे, ही गोष्ट आता जगजाहीर झालेली आहे. त्या अंकास लागणाऱ्या लघुकथा इत्यादि लेखाची मागणी आपण ठराविक लेखकाकडे केली असली पाहिजे. कारण, आमच्या येथील एका फडतूस लेखकाला आलेलें आपलें पत्र माझ्या पाहण्यात आलें. मला कोणाची निंदा करावयाची नाहीं. पण प्राजल बोलावयाचें म्हणून सागतों. आमच्या येथील ××× हे लेखक नाममात्र साहित्यिक आहेत; त्याची एवढी पत्रास कां ठेवली जावी हें मोटे कोडें आहे.

विचारातीं वाटते की चागले लेखक मागेमागे राहिल्यामुळेच भडभुजाचे फावते. साहित्यसवर्धनाच्या दृष्टीनें हीं गोष्ट बरी नाहीं, म्हणून मी पुढें सरसावून माझी माहिती देत आहे. मी फारसा प्रसिद्ध नसलो, तरी अल्पावधींत खदा लेखक म्हणून पुढे येण्यास सर्वस्वी योग्य आहे अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. आमच्या मित्रमडळींना ही समजूत मान्य असून आमच्या बायकोचाही तिला पाठिंबा आहे. आतापर्यंत मी पचवीस नाटके, वीस कादबऱ्या, पधरा चरित्रे, दहा इतिहासग्रथ इत्यादि लेखन करण्याचे आराखडे मनाशीं आखले असून कविता, नाट्यछटा व लघुकथा, याच्या कल्पनाची मोजदाद करणे सर्वस्वी कठीण आहे, मराठीचा एडगर वॉलेसच म्हणानात मी! यावरून माझी प्रतिभा किती उच्च दर्जाची, सर्वसचारी व सर्वसग्राहक आहे हें आपल्या ध्यानी येईलच. नुसत्या माझ्या टोपण नावाकडे लक्ष दिलेत तरी हा लेखक काही और आहे. अशी आपली खात्री होईल. माझें नाव आहे—खडो कमलाकर देव. पण मी टोपण नाव धारण केलें आहे–खंकदेव! गाधीजींनी दरिद्रीनारायण म्हणून जे सबोधन सर्वसामान्य जनतेला उद्देशून वापरलें आहे, ते त्याना खकदेव या नावावरून सुचले असलें पाहिजे असा माझा अदाज आहे. यावरून टोपण नाव निवडण्यात माझ्या प्रतिभेने केवढी उच्च भरारी मारली आहे हें सहज दिसून येईल. आत्मप्रौढीनें मी हें लिहीत नाहीं. कीर्तीप्रमाणेच आत्मप्रशसेचाहीं मला मनापासून कटाळा आहे. म्हणून जास्त लिहीत नाहीं, मुख्य गोष्टीकडे वळतों.

तुमच्या खास अंकात माझी एक लघुकथा, दोन कविता, दोन नाट्यछटा व एक लघुनिबध एवढा मजकूर यावा अशी माझी इच्छा आहे. एवढ्या लेखनास मला पचवीस ते पन्नास कॉलम जागा

लागेल. आणि हा सारा मजकूर इतका नितातसुदर असेल, कीं इतर मजकूर कितीही रद्दी असो, त्याचें वैगुण्य सहज झाकले जाईल. खकदेवाची एक लघुकथा म्हणजे हजारोंनी वाचक वाढण्याची गॅरटी ! अकाची पहिली आवृत्ति बाहेर जाते न जाते तों दुसऱ्या आवृत्तीची तयारी करावी लागेल ! यापेक्षा मी कोणती खात्री देऊ ? तुम्ही अनुभव घेतला पाहिजे.

यावरून मी फुकट लिखाण देईन असें मात्र समजू नये. भरपूर मोबदला घेतल्यावाचून मी एक ओळही देऊ इच्छित नाहीं. वर जें लेखन देण्याचें अभिवचन मी देत आहे, त्याचा मोबदला रोख शभर रुपये होईल यात एक पैही कमी करण्याची माझी इच्छा नाही. भलती भीड आपण घालू नये. पन्नास कॉलम मजकूराला शभर रुपये मोबदला काहींच नव्हे, हे आपणसुद्धा कबूल कराल. प्रसिद्ध आग्ल लेखक रुडियार्ड किपलिंग एका शब्दाला अडीच-तीन रुपये घेत होता. तसाच अर्नोल्ड बेनेट. तात्पर्य, माझे लेखन मी जवळ जवळ फुकटात देत आहे असें म्हणण्यास काहींच हरकत नाहीं. हिदुस्थानचें दारिद्य व व साहित्याला लोकाश्रयाचा अभाव, या दोन गोष्टी ध्यानीं घेऊनच हा स्वार्थत्याग मी करीत आहें. आपण त्याचें चीज करावे आणि शभर रुपये तात्रडतोब म. आ. ने पाठवून माझे लेखन हस्तगत करण्याची सुवर्णसधि साधावी. आपली म. आ. उलट डाकेनें आल्यास माझे लेखही उलट डाकेनें रवाना होतील ही खात्री बाळगावी. कळावें.

आपला,
खं. क. देव ”

**ताजा कलम**

“ पत्र पोस्टात टाकण्यापूर्वी मनात एक कल्पना आली. आपला

व आमचा संबंध नव्यानेंच जुळवून आणावयाचा असल्यामुळें मोब-दल्याच्या बाबतींत उगीच जास्त ओढून धरू नये असे मनाला वाटूं लागलें. आमच्या सौ.चेही म्हणणें तेच पडले. म्हणून सुचवितों की, पाऊणशें रुपये पाठवावे. पंचवीसाची सूट मी आनंदाने देत आहें. बस्स! यापेक्षा एक दिडकी कमी घेण्याची इच्छा नाही. मात्र ही सवलत उलट डाकेने व्यवहार घडला तरच. पुढें शंभरानेही मी ऐकणार नाहीं. योजलेल्या लघुकथेचे नुस्ते नाव मी कळविले, तर आपण पाऊणशे रुपये सहज पाठवाल! सांगू नाव?–पण या पत्रात नकोच. म. आ. ची वाट पाहत आहें.

आपला,
खं. क. देव"

— २ —

"श्रीयुत सम्पादक यास, वि. वि.

आपल्यास पहिले पत्र पाठवून आठ दिवस होऊन गेले. म. आ. नाहींच, पण साधे उत्तर नाही. सखेदा आश्चर्य वाटलें. आपल्या-इकडील साहित्य भिकार असण्याचें व नियतकालिके धड न चाल-ण्याचें हे एक प्रबल कारण आहे हे आता मला चक्क कळून चुकले. नियमित पत्रव्यवहार सुद्धा नाहीं अं! दुर्दैव आपल्या भारताचें!

एक शंका येते. माझी ओळख आपल्याला पटली नाहीं का? संभव तोच दिसतो. म्हणून आपल्या 'त्या' भेटीचे मी आपल्यास स्मरण देतो वर्षा-दोन वर्षांखालची गोष्ट आहे. आपण त्या गाडींतून पुण्याहून मुंबईकडे चालला होता. डब्याचा न. मला वाटतें. २०२३ असावा. मी सहसा प्रवास करीत नाहीं, आणि केला तर थर्ड क्लासनें

मुळींच करीत नाहीं. पण त्या वेळीं एका लघुकथेची माडणी करण्या करिता मला थर्ड क्लासातील प्रवासाचे वर्णन हवे होते. म्हणून थर्ड क्लासातून अगदीं एखाद्या भणगाला शोभेल अशा वेशाने निघालो. माझ्यामध्यें हाच विशेष आहे, पात्राच्या परिस्थितीचें नीट आकलन व्हावे म्हणून स्वतः त्या त्या आचरून अनुभव घ्यावयाचा व मगच लेखणी उचलायची. माझ्या लेखणीत जाज्वल्य जिवतपणा आहे तो त्यामुळे. या बाबतीतील माझे अनुभवही मोठे ऐकण्यामारखे आहेत. पुढेंमागे तशी एखादी लेखमाला मी आपल्या पत्राकरिता आवश्य लिहीन. हें वचनच समजावे. देण्याघेण्याचें मागाहून ठरवू. असो.

आपल्या उभयताच्या भेटीच्या प्रसगाचे पाहू.

त्या थर्डक्लासमध्यें आपण त्या बाकावर बसला होता व मी या बाकावर बसलो होतो. वरचेवर आपण एकमेकाकडे काहीं कौतुकाने व काहीं जिज्ञासेनें पाहात होतो. आपण त्या याचे सपादक आहा हे मी तात्काळ ओळखले व माझ्याकडे पाहून आपल्यालाही पण हा कोणी तगडा लेखक असावा अशी जबरदस्त शका आली असावी. त्यावाचून आपण इतके औत्सुक्यानें मजकडे का पाहात असाल ? गाडी धावत होती. उतारूची चढउतार होत होती आणि स्टेशने येत-जात होतीं. आपल्याला माझा परिचय व्हावा म्हणून उत्कठा लागलेली. मीही तो व्हावा म्हणून उतावीळ. पण काय आश्चर्य ! कल्याण आलें तरी दोघाचाही हेतु अपूर्णच राहिला ! कारण, मी स्वभावतः विनयशील व आपण पराकाष्ठेचे मितभाषी !—शेवटीं आपल्या मनाची माझ्याशीं परिचय करून घेण्याची धडपड मला पाहवेना. म्हणून मी काय केलें, आपल्या पुढच्या बाकावर येऊन बसलो. व खिशातून सिगारेटची पेटी काढीत काड्यांची पेटी मागितली !—आठवतें !—माझ्या डोळ्यापुढें तो प्रसग आजही ढळढळीत

उभा आहे!—मी आपल्याला सिगरेटच ऑफर करणार होतों. पण खरं सागायचें म्हणजे ती एकच होती! आणि तीही मला सहजीं लाभली होती! कल्याणवर चहा घेण्यास उतरलो असता एका पजाबीनें ती पेटी तींत काहीं नसावें या समजुतीनें बाजूला फेकली! पण तिच्या पडण्याच्या आवाजावरून तींत एखादी सिगरेट असलीच पाहिजे अशी माझी अटकळ होती. अर्थात् ती पेटी झाडूवाला येण्याच्या आत आस्मादिकानी लबे केली! आणि नवल असे कीं, त्यात एक सिगरेट मिळालीच! योगायोग म्हणतात तो असा! कारण त्यामुळे आपल्याशीं दोन शब्द बोलण्याचा मोका मला मिळणार होता! या सिगरेटप्राप्तीवरून माझ्या निरीक्षणशक्तीची व अटकळ बाधण्याच्या चातुर्याची आपणास थोडी तरी कल्पना येईल. माझी मित्रमडळी या एका गुणावरच माझी व कॉननडाइलची नेहमी तुलना करतात आणि मी सरस असल्याचे मान्य करतात. मी लघुकथाचा मोबदला भरपूर मागतों त्याला हे एक प्रबळ कारण आहे. माझी निरीक्षणशक्ति जबरच आहे. असो.

मी सिगरेटकरिता, आपणाजवळ काडी मागितली. त्या वेळीं आपण मी सिगरेट ओढीत नाहीं व म्हणून काडी नाहीं असें खेदपूर्वक सागितलेत!—मी त्या वेळीं आपल्या मनाच्या हालचालीचें सूक्ष्म निरीक्षण करीत होतो. एका महान् लेखकानें परिचय घडवून आणण्याच्या मिषानें काडी मागावी व ती आपल्यास देता येऊ नये याचें आपल्यास मनापासून वाईट वाटले असावे असें स्पष्ट दिसले; म्हणून आपण माझ्याकडील दृष्टि काढून खिडकीबाहेर पाहू लागला. आणि आपलें हें सौजन्य पाहून मलाही गहिंवरून आलें. लागलीच मीं एक भावगीत त्या प्रसगावर तयार केलें. पुढेमागे प्रत्यक्ष भेटींत सदर भावगीत मी म्हणून दाखवीन! त्यातील

भावनोद्रेक पाहून आपण चकितच व्हाल ! डायरींत ही गोष्ट स्मरणार्थ टिपून ठेवावी.

पुन्हा आपण आंत दृष्टि वळवली. मी हातात सिगरेट खेळवीत पुन्हा बोलण्याला कशी कलाटणी द्यावी या विचारात होतों. त्या वेळींही आपल्या मुद्रेवर मला कांहीं निश्चयाची छटा दिसली. आपल्या मनात त्या वेळीं असेंच आले कीं, आजच्या जमान्यात लोकसंग्रह करावयाचा म्हणजे थोडेंफार मद्यपानासारखे व्यसनसुद्धा मनुष्यास असणे इष्ट व आवश्यक. आणि आपण तर सिगरेट पानालाही पारखे. या वेडेपणाला काय म्हणावें ! छे, निदान पक्षी सिगारेट ओढण्यास तरी आपण शिकलेच पाहिजे असा आपण निश्चय केला असल्याचे दिसले. मला धन्यता वाटली व मींही मनाशीं निश्चय केला की केवळ मोबदल्यावर दृष्टि न ठेवता आपल्या पत्राला लेखनसाह्य करावयाचेंच.

एवढ्यावरून आता माझी ओळख आपणास पटली असेलच. तेव्हा आता उगीच दिरगाई न करिता पन्नासची म. आ. तात्बडतोब धाडावी. माझे लेख तयार आहेत. मजकडून दिरगाई होणार नाहीं. कळावें.

आपला

खं. क. देव ”

ताजा कलम—

“ मी गेल्या पत्रात पाऊणशेचा आकडा कळवला. व आता लेखणीच्या फसगतीनें पन्नास पडला ! जाऊ दे शब्द माघारीं घेण्यात स्वारस्य नाहीं. पन्नास सही ! उद्या याची कसर सहज भरून निघेल. म. आ. उलट डाकेनें पाठवावीच. लेखकालाही नड असते हें मीं सांगायला पाहिजे असे नाहीं. माझ्या लघुकथेचें नाव सांगूच का ? फोडतोंच गुपित ! बावरी प्रीत काय नाव आहे ! पन्नास रुपये

नुस्ते नावावर ओवाळून टाकावे ! म. आ. ची आतुरतेनें वाट पहात आहे.

आपला,
खं. क. देव "

ता. क. दोन

"मनिआर्डरीचा फॉर्म इकडूनच भरून पाठविला आहे. आपल्यामागे सारखी कामाची धादल. कारकून ठेवण्याइतकी आपल्याला ऐपत नसणार हे स्पष्टच आहे. मग आपल्याला त्रास तरी कितो द्यायचा ! तेव्हा विचार केला व म. आ. फार्म इकडून भरून पाठविण्याची युक्ति सुचली ! फार्म पाठवावयाचा असल्यामुळें पत्राचें वजन वाढले. तेव्हा ते नॉटपेडच टाकण्याचे ठरविले. पत्र हरवण्याची भीति नाही. आपल्याला नेमके मिळेल. म. आ. ची वाट पाहू ना ? आता माझा हक्कच आहे म्हणा.

आपला,
खं. क. देव "

—३—

" श्रीयुत सपादक यास

माझ्या दुसऱ्या पत्राप्रमाणें म. आ. येण्याचा दिवस टळलेला आहे. पण आता मी थोडे दमानें घेण्याचें ठरविलें आहे. एकदा आपलें म्हटल्यानंतर उगीच घाई काय कामाची ? आपण बहुशः म. आ. पाठविण्याच्या तजवीजीत असाल अशी मला खात्री वाटते. मी पाठवलेल्या म. आ. फॉर्मातच मीं एक खुबी केली ! रकमेचा आकडा एकदम चाळीस केला ! मी शभरावरून घसरत एकदम

चाळीसावर आलो ही भानगड तरी काय आहे ?—केवळ मनाचें औदार्य ! माझ्यामध्यें तो एक ठळक गुण आहे. आपला व्यवहार कोणालाच डोईजड होऊ द्यावयाचा नाहीं असें माझें ब्रीद आहे. नाहींतर मी मोबदला ठरविण्यात व तो चापून घेण्यात मोठा हट्टवादी आहे बरें का ! एकदां आकडा तोडातून पडला कीं पडला ! पण आपल्याविषयीं मी अगदीं निराळा विचार केला. स्पष्टच सागतो. मी आपल्यास लाजवीत आहे. लेखाच्या योग्यतेच्या मानानें मोबदला इतका कमी मागायचा की, संपादकाला कसेंसेंच वाटावें व त्यानें ताबडतोब म. आ. च करावी. शभराचा माल चाळीसाला ! शिकस्तच केली आहे मीं ! आमच्या सौ. ला ही गोष्ट फारशी पसत नाहीं. ती फुरंगटून म्हणाली सुद्धा, 'आपण भोळे साब आहा. एखाद्याला सवलत द्यायला, लागला म्हणजे अगदीं तें टोंक गाठता !' मीं तिला हसत म्हटलें, 'बाई ग, बावऱ्या प्रीतीची गोष्ट अशीच आहे !' काय बहारीची कोटि केलीय् मीं !!"

या पत्राचीच बाब पहा ना. पुन्हा या पत्राची आवश्यकता काय ? —खरें म्हणजे म. आ. येताच लेख धाडून मोकळे व्हायचें. पण नाहीं. **बावरी प्रीत** कागदावर उतरण्यास बसलों व माझ्या प्रतिभेचा विलास सुरू झाला ! कल्पनाचा तो नाच पाहताच माझा मी थक्क झालों ! वाटले, त्याचीच थोडी चुणुक संपादकाना कळवावीच. त्यावरून लाख मोलाचें साहित्य केवळ चाळीस रुपयांत मिळतें ही गोष्ट ठळठळीतपणें त्याच्या ध्यानीं येईल. आता आपल्याकडून म. आ. येणार याला आणखी कोणता सबळ पुरावा पाहिजे ?

**बावरी प्रीत** गोष्टीचें नावच किती सुटसुटीत नी दिलखेचक आहे नाहीं ? दोन शब्द नी पाच अक्षरें ! पण केवढी करामत कर-णार आहे माझी प्रतिभा ! बासरीला भोकें किती थोडीं असतात ?

पण खरा कलावंत तिला कशी बोलकी करतो!—मी माझ्या लघुकथेंत तोच चमत्कार करणार आहे. पाहा,—पेच—प्रसंगाची गुंफण पाहा.

१—तो तिच्यावर प्रेम करतो, पण ती त्याच्यावर करीत नाहीं.

२—ती त्याच्यावर लुब्ध आहे, पण तो तिच्याकडे ढुंकून पाहत नाहीं.

३—दोघेही एकमेकावर लुब्ध आहेत, पण परिस्थिति आडवी येते. आईबाप-पालक आडवे येतात, धर्म आडवा येतो.

४—यातूनही काहीं तोड निघते. पण पुढें दोघांपैकीं एकाला टी. बी. नी दुसऱ्याला ॲनिमिया जडतो!

५—कोणी कोणाकरिता जगायचें नी कोणी कोणाकरिता मरायचें? कोणी कोणाकरिता किती स्वार्थत्याग करायचा, नी कोणी मागे राहून बावरी प्रीत कायम ठेवायची!

६—अरेरे!—उसासे! अश्रूंची माळ!

जास्त लिहिणें अशक्य आहे. लेखकाचा कंठ भरून आलेला आहे. डोळ्यांत अश्रु तरंगत आहेत. हात थरथर कांपतो आहे! कल्पनांची खळबळ अनावर झाली आहे!—भावनांचा उद्रेक—जाऊं दे! गोष्टींत ते सारें येणार आहेच. संपादकमहाशय, प्रत्येक रसिकाचें हृदय गदगदां हालवून सोडणारी ही बावरी प्रीत अवघी चाळीस रुपड्यांवारी फुकली जात आहे! शिवाय नाट्यछटा नी कविता नी प्रबंध मिळणारच! तुम्हाला इतकी सवलत देण्याची दारुण इच्छा मला कां व्हावी, काहीं कळत नाहीं. अशी संधि पुन्हा येणार नाहीं हो!—डोळे मिटून म. आ. करा. कळावें

आपला

खं. क. देव"

ता० क०—

" एकदा पचवीस नी एकदा पधरा अशा दोन म. आ. एक–दोन दिवसाच्या अंतरानें पाठविल्या तरी चालतील ! माझी त्यामुळें थोडीशी गैरसोय होणार आहे; पण साभाळून घेतलें पाहिजे.' मात्र चेक पाठविण्याची भानगड करूं नका अं ! माफ करा. तसे मी काहीं ऐकणार नाहीं. म. आ. च आली पाहिजे.

खं. क. देव "

पोस्टात जाताना वाटेंत ता० क० २

" चाळीसचा चेक घेण्यापेक्षा फक्त पचवीसाचीच म. आ. पत्करणे मी श्रेयस्कर समजतों. पचवीसाची म. आ. करा. आता मात्र माझ्या सौजन्याला जास्त ताण देण्याची बात बोलू नका. सवलत देण्याची मी सरहद्द गाठली आहे !

खं. क. देव "

पेटींत टाकताना ता० क० ३

" साधा ता. क. लिहितानाही चाळीसचा चेक सवलतींची सरहद्द इत्यादि अनुप्रास मी किती हातोहात साधतो, इकडे मी आपलें लक्ष वेधू इच्छितों.

खं. क. देव "

— ४ —

" श्रीयुत सपादक यास,

म. आ. नाहीं ! एकेक दिवस वाया जात आहे. मागाहून घाई कराल, तर त्याचा परिणाम लेखनावर होईल ! मग मी कसें तरी खरडीन ! तें होईल उत्कृष्ट, पण बजावतों. पत्र अर्जंट समजावें आणि

तारेनें पधरा रुपये तरी धाडावे. वाण्याला उद्याचा वायदा केला असून दूधवाला परवापासून हेलपाटे घालतो आहे. घरभाडे तीन महिन्याचें थकले आहे. या घरगुती गोष्टी. आपल्याला हे सारे प्रसग आले असतीलच. म्हणून विनती करतों कीं, माझ्या पत्राचा तातडीनें विचार व्हावा. सध्याकाळपर्यंत तारेनें म. आ. यावी. माझा हक्क आहे. कळावे.

खं. क. देव"

घराबाहेर पडताना ता. क.

"पाकिट मिळाले. आताच पोस्टमननें हातात दिलें. गाढव! सकाळीं द्यायला विसरला म्हणे. असो. पण आपण ज्या अर्थी पाकीट धाडलेंत, त्या अर्थी त्यात दहाची नोट असलीच पाहिजे. शभर काय नी दहा काय? शून्याचाच फरक! शून्यांत परार्धेभरलीं— कन्हय्या बजाव बजाव मुरली!

खं. क. देव"

खोलीत येऊन पत्र पाहिल्यावर ता. क. २

पाकिट फोडलें! नोट नाहीं. आश्चर्य वाटलें. आणि पत्र पाहिल्यावर ते हजार पटीनें वाढलें! हें पत्र माझे दिसत नाहीं. मजकूर थोडाच आहे तो असा—

'आपली पत्रे वाचून करमणूक झाली. आपला मेदु एकदा डॉक्टराना दाखवावा काहीं स्क्रू ढिले झाले असावेत असा संशय वाटतो. आधी प्रकृति संभाळावी.

सपादक महाशय, काहीं गफलतीनें पत्राची अदलाबदल तर झाली नाहीं ना? माझे पत्र व म. आ. दुसऱ्याला व त्याचा हा शालजोडीतील आहेर मला असा घोटाळा झाला काय!—घाईत असें

होणें शक्य आहे. तरी ताबडतोब चौकशी करावी. वरील चुकलेलें पत्र परत पाठवीत आहे.

खं. क. देव ”

पुन्हा रस्त्यातून जाता जातां ता० क०

“ तुमचा त्या पत्राचा उलगडा ध्यानात आला. ज्याला कवडीची अक्कल नाहीं व एक ओळ धड लिहिता येत नाही अशा एखाद्या गाढव, मूर्ख वेड्या लेखकानें ‘माझे लेख घ्या’ म्हणून तुमचा पाठपुरावा केला असला पाहिजे. आणि वर ऐटींत मोबदला मागितला असला पाहिजे, होय ना ? अशींच काहीं भानगड असली पाहिजे. त्या दृष्टीनें आपलें पत्र मार्मिक आहे बरें का ! अगदी थॅक्स !—पण खरे म्हणजे त्या लेकाची चागली खरड काढायला हवी होतीत तुम्ही ! मूर्ख लेकाचे ! अक्कल नाहीं दमडीची नीं, म्हणे साहित्यसेवा करतात !

खं. क. देव ”

अगदीं पोस्टांत टाकताना ता. क. ४

“ वरील मूर्ख लेखकाचा पत्ता कळवाल काय ? मी चागलें सणसणीत लिहितों त्याला. तुमचें दोन ओळींचें पत्र त्याला कळायचें सुद्धा नाहीं धड. टोणप्याला लगुडप्रहारच पाहिजे. म्हणून म्हणतों, माझ्याकडे सोंपवा ते काम. अगदीं निरपेक्ष करतों.

खं. क. देव ”

— ५ —

“ श्रीयुत संपादक यास वि. वि.

तुमच्या दिरंगाईपुढें हात जोडायची वेळ आली. दिवाळी आठ दिवसांवर आली; पन्नास कॉलम मजकुराला मीं अवघे दहा रुपये

मागितले ! समजा, आली तुमची म. आ. तर, मी काय करणार बरे ? मी लेख लिहिणार केव्हा–पाठविणार केव्हा, नी ते छापून अक वेळेवर निघणार केव्हा ? छे छे छे ! तुम्ही भारीच हलगर्जीपणा चालविला आहे. मेहेरबानी करा. दहा रुपये पाठविण्यास सवड नाहीं का ?— चला या खेपेला तसे लेख घ्या ! सोंगट्याच्या खेळात पहिला डाव देवाला नाहीं का देत ! तसेंच समजेन. पण कसेही करून माझे लेखन स्वीकारा. नाहीं म्हणू नका. माझ्या लेखाला स्थळ दिलेत तर पंचवीस वर्गणीदार मिळवून देण्याची गॅरंटी देतों. इतकी अर्जीजी मी का करतो ?—माझ्या अब्रूचा प्रश्न आहे व आपल्याही थोरपणाला बट्टा लागणार आहे ! कसा म्हणून नाहीं विचारलेंत ? त्याचे असें झाले. तुमच्या पत्राचा खास दिवाळी अंक माझ्या देखरेखीखालीं निघणार आहे ही साधी व सहज होणारी गोष्ट मी आपल्या–म्हणजे माझ्या सौभाग्यवतीजवळ बोलून गेलों आणि तिला बजावले की, ही गोष्ट अगदीं गुप्त राखायची. पण बायकाची जात. तिला राहवले नाहीं नी तिनें ती बितबातमी माझे सन्मान्य मित्र महाकवि लीलाधर काव्यकल्पद्रुम याच्या सौ.जवळ सागितली. अर्थात् तिनें आपल्या कविराजाना माहिती दिली ! तात्पर्य, गोष्ट षट्कर्णी झाली ! गावात बोभाटा झाला ! मग मलाही आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्याकरिता नी तुमच्या पत्राची वाढ वाढविण्याकरिता थोडे तिखट-मीठ लावून ती बातमी विस्तृत करावी लागली ! परिणाम असा झाला कीं गावात प्रच्छन्न निंदकाचा व मनमोकळया मित्राचा असे दोन तट निर्माण झाले. त्यात मित्रपक्षानें ठरविले कीं, माझ्या लेखानी सजविलेला दिवाळी अंक बाहेर पडताच संपादकाना मुद्दाम पाचारण करावयाचें व मोठ्या थाटामाटात लेखक व संपादक याचा जाहीर सत्कार करायचा ! आपल्या गावात ही तयारी चाललेली

याहून मला काय वाटले असेल याची कल्पना करा. मी जों पत्रावर पत्रे धाडून तुम्हाला भरमसाट सवलती देत गेलों, त्याचे कारण हें असें आहे पैसा काय, येतो-जातो. पण प्रतिष्ठेचा प्रश्न तितका सोपा नाही. म्हणून म्हणतों की, माझ्या पत्रमालेकडे दुर्लक्ष करून तुम्हीं फार मोठा मोका घालविता आहा. पण मी म्हणतों अजून वेळ गेली नाहीं. ताबडतोब कळवा. पैसे मागाहून द्या. पण माझी बावरी प्रीत एवढी लघुकथा चट्कन् येण्याची व्यवस्था करा. पाठवू गोष्ट?— कळावें.

आपला,

खं. क. देव"

सा० क०—१

"पत्र समाप्त केलें नी एक कल्पना सुचली. यापुढे आपले पत्र यायचें, मग मी गोष्ट पाठवायची नी मग अंक तयार व्हायचा. इतकी सवड आहे कुठें? अंक तर वेळेवर तयार झाला पाहिजे, माझे नाव आलें पाहिजे, तुमच्या पत्राची प्रतिष्ठा वाढली पाहिजे!-- मी म्हणतो, या साऱ्या चुका सुधारायच्या म्हणजे एकच युक्ति योजता येईल. अंकाच्या मलपृष्ठावर ठळक अक्षरात असा मजकूर छापला तर—

**या दिवाळी अंकाची सारी सजावट, संपादन, लेख-निवडन ( नवीन शब्द ! ) साहित्यसम्राट खंकदेव यांच्या देखरेखीखालीं झालें आहे. वाचकांना ही मेजवानी रुचल्यास पुढील वर्षी खंकदेवांचे आणखी साह्य मिळेल !**

**—संपादक**

आमच्या सौ. ला सुद्धा ही योजना फारच पसत पडली !– आपण म्हणाल, वाचकाशीं अशी लबाडी कशी करावी ?–पण मी म्हणतो काय हरकत आहे ? मीं पन्नास कॉलम मजकूर देण्याचें मान्य केलें होते व आपल्याही मनात तो घ्यावयाचा होता. एवढ्या सत्य गोष्टीवर थोड्याशा खोटे बोलण्याचा इमला उठवायला हरकत का असावी ?

खं. क. देव"

ता. क. जागच्या जागींच. न. २ चा.

आता पैसे पाठविण्याची भानगड मीं ठेवली नसल्यामुळें वरील युक्ति अमलात आणून वेळ निभावून नेणें आपल्यास सहज शक्य आहे. अंकाच्या तूर्त दोन प्रति पाठवाव्या. आणखी दहावीस लागतील. तेवढ्या स्मरणानें बाजूला काढून ठेवाव्या. मागाहून त्याची व्यवस्था कशी करावयाची ते कळवींन. अकावर सुचविलेली सूचना अवश्य छापा अ ! तिला फार महत्त्व आहे.

खं. क. देव"

पोस्टाकडे निघालों ता. क. न. ३

"एक शका आली. मला वाटतें, आपण खास अंक काढण्याची योजना रहित तर नाही केली ?–शक्य आहे. लढाईमुळें छपाईच्या सार्‍याच जिनसाना विलक्षण महागाई आलेली. कसला खास अंक नीं कसलें काय ! त्यावाचून माझ्या पत्राचे एकही उत्तर यायचें नाहीं असें व्हायचेंच नाहीं. तथास्तु ! परिस्थितीपुढें कोणाचाच इलाज नाहीं. भावी कालाकडे आपण आशेनें पाहू या. माझ्या मनाची तयारी आहे. पण आपण मला थोडा उत्साह दिला पाहिजे. मी म्हणतों एवींतेवीं अंक काढण्याचा बेत तुम्ही रहित केलाच आहे. म्हणजे खर्चाच्या बाबी काहीच राहिल्या नाहींत. मग माझ्या नावें पाचपन्नास रुपयाची मनिऑर्डर करण्याला हरकत कोणती ?—मीं

फॉर्म पाठविल्याप्रमाणें तूर्त चाळीस रु. धाडलेत तरी पुष्कळ आहे. आयता फॉर्म लिहून ठेवला आहे. वाया जायला नको. काटकसर सहजच घडेल. पाहतो म. आ. ची वाट.

खं. क. देव "

मार्गात जाता जातां ता. क. न. ४

" हें मी काय पाहतो ?–आपला खास अंक निघालाही ? माझ्या लेखावाचून कसे घडलें हे ?–छे, काहीं तरी चूकभूल वाटते; नाहीं, अंक तोच आहे. आमच्या प्रच्छन्न निंदकाने तो मला मुद्दाम दाखविला ! दाताड विचकून विचारतों कसा ?–पाजी ! संपादक, तुम्ही माझा असा विश्वासघात कराल असे नव्हते वाटले ! छान ! छान !! सभ्य माणसाला शोभण्यासारखी कृति केलीत !

खं. क. देव "

ता. क. न. ५

" सामान्य संपादका ! अंक किती गचाळ काढला आहेस ? अरे काहीं जनाची नाहीं पण मनाची तरी ? छे छे, साऱ्या गावात तुझी छीः थूः चालू आहे. बरें झालें मीं लेख पाठवले नाहींत. असल्या सामान्य अंकामध्यें इतक्या रद्दी भिकार, टाकाऊ अंकामध्यें माझे लिखाण आले नाहीं याचा आनंद वाटतों. नाहीं–संपादका, यापुढें तू जग जंग पछाडलेंस तरी एक ओळ देणार नाहीं तुला !–काय समजलास ?—आणि ध्यानात ठेव ! माझ्याशीं गाठ आहे. असा खराटा फिरवीन. संधि मिळू दे ! मग तू आहेस नी मी आहे !

खं—क—दे—व "

## ८ डाकिणीचा चौक

संन्याश्याचा वेश घेऊन मी वनोपवनें भटकत होतों. मनुष्यवस्तींत येण्याचा मी कटाळाच करी. कंदमुळे खावीं. निर्झराचें पाणी प्यावें आणि वृक्षाच्या छायेला पडून रहावें. मनात आलें प्रवास करावा. नाहीं तर जेथे मन रमेल तेथे वास करावा. असें प्रवास-सौख्य उपभोगीत मी फिरत असता एक चमत्कार माझ्या अवलोकनात आला.

तो प्रदेश कोणता होता हें मला आतां आठवत नाहीं. एवढें खरें की, भटकत भटकत मी त्या प्रदेशात आलो आणि तेथें एका विशाल नगराचे पसरलेले अवशेष पाहून विस्मयात पडलो. एखाद्या माजलेल्या खोंडानें चारा खाऊन त्याची चिपाडें ज्याप्रमाणें सर्वत्र पसरून द्यावीं, त्याप्रमाणें सर्वभक्षक कालानें त्या नगराची व्यवस्था केली होती. मोठमोठे प्रासाद व रमणीय जनमदिरें उध्वस्त होऊन गेलीं होतीं. एखादें देऊळ दैन्यावस्थेंत उभे होतें. एके काळीं त्या नगराचें संरक्षण करणारा तटही नामशेष होत आला होता. एखादी

भिंत, एखादे महाद्वार, एखादाच स्तंभ मधून मधून आकाशाकडे डोळे लावून उभा होता. कोठे कोठे महाकाय प्रस्तरमूर्ति भग्नावदशेंत उभ्या होत्या. कोठे पडक्या बावींचीं तोंडे भयप्रद वाटत होतीं. आणि या सर्व नाशावर काटेरी झुडपें, गवत आणि वेली यांचें रान माजले होते. कोणत्या काळीं, कोणत्या नृपतीच्या राज्यात ही नगरी भरभराटीस आली होती देव जाणे. तें स्थान पाहून मला भय वाटले व विषादहि वाटला. तरी पण त्या निर्जन प्रदेशात एक दोन दिवस राहावे अशी मला प्रबळ इच्छा झाली. मला मागे कसलाच पाश नव्हता. शरीराचा किंवा प्राणाचा मोहही नव्हता. अर्थात् त्या साहसात मजवर काही संकट येईल की काय या शंकेने मला त्रास दिला नाहीं. एक निवाऱ्याचे स्थान पाहून मी तळ दिला.

त्या रात्रीच्या पहिल्या प्रहरात तेथे राहण्याची मला गमत वाटली.

त्या वेळीं चांदण्याचे दिवस होते. रात्रीं जिकडे तिकडे लख्ख चांदणें पडल्यावर भयाणपणानें आपला ध्वज तेथे उभारला. अशा स्थानास दिवसासुद्धा भेसुरता असते. मग रात्रीं तर काय? वर थोड्याशा तारकानीं खिळलेले आणि चंद्रिकेनें खुललेलें आकाश पसरलें होते. खाली त्या नगराची गोधडी पडली होती. मी एकटा प्रेक्षक होतो. घूकाचें घुत्कार व भालुकाचे ओरडणें सुरू झाले होते. रातकिड्याचा वीणाझंकार केव्हापासूनच सुरू झाला होता.

हवेंत गारठा नव्हता. तरी मला कसेसें वाटत होतें. ज्या शिलातलावर मी पडलों होतों ती दिवसभरच्या उन्हानें तापली असली तरी आता गार वाटूं लागली होती. चंद्राकडे पाहात पाहतच मला निद्रादेवीनें प्रसाद दिला!

मी जेव्हा जागा झालों त्या वेळीं आकाशात चंद्र नव्हता. भोंवतालीं अंधार होता. सर्वच दिशा सारख्या भासत होत्या माझे

सर्व अंग बधिर झालें होतें. पडल्यापडल्याच मी वर व भोंवतालीं पाहिलें. मला गारठा वाटू लागला. अंगावरची कांबळी घट्ट लपेटून घेतली. विचार आला ' मी कुठे आहे ? ' थोड्या वेळानें भान आलें. मी उठून बसलो. मला एकान्त प्रिय असताहि मला चालू स्थिति तितकीशी प्रिय झाली नाहीं.

माझ्या मनाशीं मी बोलू लागलो, ' वेड्या, ही तुझी उदासीनता की भीति ? पण दोनी तुला किंवा तुझ्या वेशाला शोभत नाहींत. ' मनाचा धिक्कार करून मी तेथून उठलो. ताऱ्याकडे पाहिले. तीन प्रहर रात्र होऊन गेली असावी, असा तर्क केला. लौकरच प्रभात होईल. तोपर्यंत बसण्यापेक्षा ओंकाराचा गजर करीत भटकण्यास काय हरकत आहे ? असा विचार करून मी चालू लागलो.

लौकरच मी एका प्रशस्त राजमार्गावर आलो. मार्गाच्या दोनी बाजूला गृहांचे अवशेष उभे होते. त्याचेकडे पाहात मी जाऊ लागलो. मनात त्या नगरीच्या वैभवकालासबधीं विचार सुरू झाले. मी मनात म्हटले, " एथील एखाद्या फत्तराला किंवा एखाद्या भग्न मूर्तीला जर वाचा फुटली, तर ती किती विलक्षण इतिहास सांगूं शकेल नाहीं ? मानवी स्वभावाचे किती नमुने येथे होऊन गेले असतील. आनदाचे किंवा दुःखाचे कितीतरी प्रकार येथे घडले असतील, किती उलथापालथी या नगरानें पाहिल्या असतील, कालानें ते सर्व लुप्त झाले !—आज हीं हाडे राहिली आहेत-—"

इतक्यात माझ्या पायानें काहींतरी ठोकरलें गेले. मी आश्चर्यानें चपापून खालीं पाहिलें. प्रकाश आपला साधारणच. पण तेवढ्या त्या उजेडातच मला तो पदार्थ दिसला. ते एक नरकपाल होतें ! डोळ्याच्या खाचा, भेसूर जबडा, विकृत स्थितींत असलेली नाकाची भोकें पाहतांच माझ्या अंगावर भीतीचा काटा आला ! भयभीत

दृष्टीनें त्या अस्थीच्या गोळ्याकडे पाहात मीं मागे पाय घेऊन पळ काढणार तोच त्या नरकपालाच्या नेत्राच्या खाचात मला दोन अग्नी-स्फुलिंग दिसले आणि दांतावर विकट हास्य उमटले ! तो प्रकार पाहताच माझे धैर्य पळाले ! माझी गात्रे विकल झाली ! मी डाबून ठेवल्याप्रमाणे उभा राहिलो !

" वारे सन्यासी ! " त्या जबड्यातून उद्‌गार आले.

माझ्या अंगाला भीतीचा कंप सुटला होता तरी त्या कवटींतून निघालेल्या त्या उद्‌गारानीं माझ्या भ्याडपणाची मला लाज वाटली. मी तसाच नेटानें उभा राहिलो. माझी दृष्टी त्या कवटीवरच खिळली होती. आपल्या विचित्र दृष्टीनें माझ्या मुद्रेकडे पाहात ती पुनः म्हणाली, " पळून जा ना इथून. "

मी चाचरत म्हटले, " भिण्याच्या सवयीमुळें मला प्रथमतः पळावेसें वाटलें पण आता मी इथून हालणार नाहीं. तुला काहीं बोलावयाचें आहे का ? "

कवटीच्या दाताडावर पुनः हास्य दिसले. ती म्हणाली, " हो. कितीतरी बोलावेसे वाटतें. या नगरीच्या इतिहासातील काहीं प्रसंग तुला कळले तर हवे आहेत ना ? मी तुला तशी एक कथा सागते, पण माझी एक अट आहे. "

" काय ? "

" माझी ही कवटी तू गगेत नेऊन टाकली पाहिजेस. तेवढ्यानें माझ्या नरक यातना चुकतील किंवा चित्ताला शाति मिळेल असें नाहीं, परंतु वाटतें कीं, जिवतपणीं दुष्टविकार व विचार याच्या थैमानानें भ्रष्ट झालेल्या डोक्याची ही कवटी गगेच्या उदरात पडून रहावी. करशील एवढे काम ? "

मी तें मान्य केलें. त्यावर ती म्हणाली, ' आतां मी तुला एक

अद्‌भुत कथा सांगतों. पण हे पहा, सगळी कथा होईपर्यंत ताठकळत उभे राहणें बरें नाहीं. तर मला घेऊन त्या जवळच्या शिलाखंडावर चल. मला आपल्या समोर ठेव. नंतर मी सांगेन ते लक्ष देऊन ऐक.'

मी तिचे तेही म्हणणें मान्य केलें. तिच्या स्पर्शानें मला फारसें सुख झालें नाहीं. माझी ती अप्रियता तिनें जाणली असावी. कारण, तिच्या भेसूर हाडकी मुद्रेवर हास्य दिसलें. नवल करीत मी तिच्या-सह त्या शिलातलावर बसलों.

अद्यापिही भोंवताली अंधार होता. माझ्या उजव्या हाताची एक दिशा किंचित् पांढुरकी दिसू लागली होती. यावरून ती पूर्व असावी, असा मी तर्क केला. आकाशातून तारासमूहाचा क्षीण प्रकाश खालीं येत होता. पण मला त्या कवटीकडे पहाण्यास पुष्कळ साह्य होत होतें. मी खालीवर व भोंवताली पाहिलें व एक सुस्कारा टाकला.

दोन राजमार्गांनी फुली केलेल्या एका चौकात आम्ही बसलों होतों.

कवटीनें मध्येंच म्हटलें, ' श्याम, या वेळीं आपण ज्या भागात बसलों आहों, त्यास माधुरीकंचनीचा चौक असे पूर्वी म्हणत असत. पुढें त्यास डाकिणीचा चौक असें नाव मिळालें. हें नामांतर कसें घडून आलें, याचीच कथा मी तुला सांगणार आहे. श्याम, ज्या उध्वस्त नगरींत तू आला आहेस, तिचें नाव पुष्पधारा. एकेकाळीं ती किती वैभवशाली आणि सौंदर्यसंपन्न होती, याची तुला कल्पनाही करता येणार नाहीं. एखादी अत्यंत सुंदर तरुणी रक्तपितीच्या रोगानें पछाडल्यावर तिची जी अवस्था होते, तशीच आज या नगरीची झाली आहे. माझ्या डोळयाच्या खाचा झाल्या असल्या आणि इथे नांदणारें वैभव मातींत मिळाल्यास अनेकानेक वर्षें झाली असलीं तरी आमच्या पुष्पधारेचें तें नयनाल्हादक रूप आजही

अगदीं जसेंच्यातसें माझ्या दृष्टीपुढें उभेंराहिलें आहे. श्याम, डोळे मीट आणि .मी सागतें त्या प्रमाणें एक चित्रपट आपल्या मनावर काढू लाग. ही पहा हिरण्मयी नावाची सरिता अर्धचन्द्राकृतीनें वाहात आहे. तिचें विशाल पात्र, स्वच्छ अमृततुल्य जल, पलीकडचें शुभ्र वालुकामय वाळवट, त्या तलीकडचीं तीं रम्यपुष्पोद्यानें लक्षात घे. अहाहा ! आमची ही हिरण्मयी स्वर्गंगेप्रमाणेंच शोभायमान व चित्ताला शाती देणारी नाहीं काय ? श्याम, या नदीच्या काठचा सर्वच प्रदेश अत्यंत सुपीक होता. येथील धरित्रीमाता इतकी शस्यशालिनी होती कीं, गोकुळच्या भूमीनें लाजावे. या स्थानीं रघुकुलाची एक शाखा आली आणि तिनें आपलें राज्य स्थापिलें. पुढें त्याच कुळातील एका सद्गुणमडित राजानें या पुष्पधारा नगरीची स्थापना केली. हिरण्मयीला विस्तृत घाट बाधण्यात आले आणि ते नगरीच्या उच्च प्राकाराला नेऊन भिडवले. नगरीच्या भोंवतीं कोट व त्या भोंवतीं खदक काढला. ”

“ एखाद्या रत्नजडित अलकाराप्रमाणें पुष्पधारा हिरण्मयीच्या काठीं शोभावी अशी रचना करण्यात आली. या रचनेकरिता दूरदूरचे उत्कृष्ट कारागीर बोलावण्यात आले होते. मुख्य राजप्रासाद नगरीच्या मध्यभागीं बाधण्यात आला आणि नतर पटाप्रमाणें लाबरुद राजमार्ग आखण्यात आले. जनमदिराची मांडणी अशी केली कीं जणू काय स्वर्गातील एकेक देवमदीर आणून तेथें ठेवलें आहे. श्याम, मी किती वर्णन करूं ? थोडक्यात सागावयाचें म्हणजे एवढेंच सागता येईल कीं, कुबेराच्या अलकावतीचें नाव मागें पडलें. साऱ्या भूतलावर पुष्पधारा नगरी आपल्या वैभवानें व सौंदर्यानें नामांकित झाली. अहाहा ! तें वैभव पुनः या नगरीला येईल काय ? ”

कवटीनें एक दीर्घ सुस्कारा टाकला. ती पुढें म्हणाली, “ काल-

प्रवाहाबरोबर पुष्पधारेचें तारुण्य विकसित होत गेलें. त्या वेळीं तिला भूषणास्पद अशा ज्या काहीं अनेक गोष्टी येथें होत्या, त्यातच दोन तरुणांचा समावेश होत होता. हे दोघे एकमेकाचे धर्मबधू व जिवलग मित्र होते. एकाचे नाव नीलमणी व एकाचे नाव मयक. मणी काळासावळा तर मयक गोरापान. मणी मोठा व मयक त्याच्या-पेक्षा एक वर्षाने छोटा, यापेक्षा त्याच्यामध्यें कोणताच फरक नव्हता. त्याच्या वयातील एक वर्षाचे अतरही ओळखू येण्यासारखे नव्हतें. दोघेहि सारख्या बुद्धीचे व हाडापेराचे होते. त्याचा संबंधहि मोठ्या गमतीने जुळून आला होता. पुष्पधारेमध्यें त्यावेळीं सुबंधु नावाचा एक लक्षाधीश श्रेष्ठी रहात असे. त्याची पत्नी चारुशीला. ही एका पर्वणीला प्रभात समयीं हिरण्मयीच्या घाटावर स्नानास गेली असतां नदीच्या पात्रातून वाहात आलेलें एक बालक तिला सापडले. तिला आतापर्यंत मूलबाळ झाले नव्हतें. त्यामुळें तें देवाचें देणें मानून तिनें त्या मुलास घरीं आणलें आणि त्याच्या घनःश्यामवर्णावरून त्याचें नाव नीलमणी असें ठेविलें. तो तिला शोभण्यासारखाच सुदर पुत्र होता. नीलमणी आल्यानतर वर्षानेंच तिला स्वतःला पुत्रलाभ झाला. हा मयक होय. या दोनी मुलाना तिनें सारख्याच प्रेमानें साभाळले, त्याचें संगोपन केलें, त्याना वाढविलें.

" अशी एकवीस वर्षे लोटली. या एवढ्या दीर्घकालांत ते दोघे एकाच ठिकाणीं वाढल्यामुळें त्याच्यामध्यें गाढ बधुप्रेम व अनिर्वच-नीय मित्रता निर्माण झाली ! दोघानाहि एकमेकावाचून क्षणभरहि करमत नसे. एकाला घाव लागला तर दुसऱ्याला रक्त येईल इतकी त्याच्यांत एकरूपता–एकतानता–होती. साऱ्या नगरीला त्याचें हें प्रेम वेड लावणारें होतें. "

" इतर अनेक ठिकाणाप्रमाणें पुष्पधारेंमध्यें वसंत ऋतूंमध्यें

काम देवाचा उत्सव करण्याची प्रथा होती. हिरण्यमयीच्या परतीरा-वर एक मोठें अरण्य होतें. तेथें हा मेळा भरे. या दिवशीं अगदीं प्रभात काळापासून उची प्रावरणें परिधान करून नरनारी जमू लागत. अठरा पगड जातीचे लोक येथें एकत्र होत. त्या वेळीं मोठी देवघेव व्हावयाची फुलाची. फुलमाळयाना ही पर्वणी असे. संक्रातीला तिळगुळ देतो त्याप्रमाणें सर्वांनीं एकमेकाला पुष्पमाला, पुष्पगुच्छ अर्पण करावयाचे आणि फुलाप्रमाणेंच मन निर्मळ, कोमळ, सुप्रसन्न व सुगधित असो असा भाव दर्शविला जाई. या महोत्सवात खरा आनद प्रेमीजनाना होई. तशा जोडप्याची इथें गर्दी जमत असे. काहीं काहीं दोन हृदयातील प्रेमहि याच वेळीं पेरले जाई."

"त्या वर्षी त्या उत्सवाला नीलमणी व मयक हेहि आनदानें आपल्या आपल्या अश्वावर बसून गेले, इतक्या जनसमूहात ते आले असताहि एखाद्या उज्वल ताऱ्याप्रमाणें ते उठून दिसत होते. याच वेळीं त्याच्या मागोमाग काहीं अंतरावरून एक मेणा येत होता. पुष्पधारेचें मूर्तिमत सौन्दर्यच मानवी देहानें अवतरलें असावें, अशी एक सुदर रमणी त्या मेण्यात होती. हिचें नाव माधुरी कचनी. हिचें रूप अलौकिक होतें असें म्हणतात, मला तिच्याविषयीं जास्त काहीं सागता येत नाहीं ?"

कवटी किती वेळ तरी स्तब्ध राहिली. तिच्या कथेनें मी मूढ बनलों होतों. मला इतर कशाचेंहि भान नव्हतें. ती बोलण्याची बद झालेली पाहून मी म्हटलें, "पुढें काय झालें."

कवटी म्हणाली, "त्या तिघांच्या नजरा जमल्या! माधुरीनें त्या दोघाकडे पाहिलें. आणि त्या दोघानीं तिच्याकडे पाहिलें! तिघेहि प्रेमवश झाली! तिघांनाहि धुदी चढली! माधुरीला ते दोघे तरुण आवडले आणि त्या दोघांना ती आवडली! तिघांनींहि एकमेकाच्या

न कळत नेत्रसकेत करून भेटीची आतुरता दर्शविली ! भावी अनर्थाचें बीज येथेंच पेरलें गेलें.

" नीलमणीनें कांहीं मिषानें दुसरीकडे जाऊन मदनबाणाचा एक मोठा हार माधुरीला भेट म्हणून पाठविला ! मयकानेंही पण तसेंच केले. त्याची माला मधुमालतीची होती. एवढाच फरक ! माधुरीनें पण आपल्या दोन दासीकरवी दोन पुष्पमाला दोघानाही न कळतील अशी माया रचून धाडिल्या ! साऱ्या आयुष्यात एकमेकाला चुकवून आपल्या मनाचा भाव कळू न देण्याचा प्रयत्न नीलमणी व मयक या दोघानीं याच वेळीं केला.

दोघेही परतले. एकत्र होऊन निघाले. दोघानींही माधुरीनें पाठविलेल्या माला मोठ्या डौलानें धारण केल्या होत्या. दोघानाही आपली मालाच काय ती माधुरीनें पाठविलेली आहे असा भ्रम होता. मात्र आता त्याच्यात अबोला होता व त्याच्या मुद्रा गभीर होत्या. दोघानही एकमेकाची संगत आता तरी नको असें वाटत होतें. आपल्या मनात केवढें स्थित्यतर घडून आलें आहे याची त्या दोघानाही कल्पना नव्हती !

कांहीं वेळ त्यांनीं मुकाटयानें प्रवास केला. त्याच्या आजुबाजूनें इतरहि अनेक लोकाची जा ये सुरू होती; पण तिकडे त्या दोघाचेही लक्ष नव्हतें. कांहीं वेळानें मयकास राहवेना. त्यानें मणीस प्रश्न केला, ' मणी तू कोणाचे, कसले चिंतन करतो आहेस ? '

' तू कोणाचें चालविले आहेस ' मणीनें उलट विचारिलें.

मयकानें आपल्या मालेचा वास घेत सफाईनें म्हटलें, ' मी ?— कुणाचें नाहीं बुवा ? मी आश्चर्य करतो आहे तुझ्या मुग्धपणाचें ! '

मणीनें कठोर स्वरात म्हटलें, " किती खोटें बोलतोस मयक. मी सागतों. तू त्या माधुरीचें चिंतन चालविलें आहेस ? होय कीं नाहीं."

"छट्! अगदींच खोटें." मयंक म्हणाला, "आणि समजा मी करीत असलों तर बिघडलें कुठें? ज्याला तिचें मनोहर दर्शन घडलें, त्याच्या मनात तिची मूर्ति ठसायचीच. त्यांतून ती मला इतकी अनुरूप वाटली—"

नीलमणीच्या कपाळावर आठी पडली, तो त्याच्याकडे न पाहता आपली माळ सावरीत म्हणाला, "पण असलें वेड तू घेऊ नयेस मला वाटतें—"

मयकानें गर्वभरित स्वरानें विचारिलें, "तुला?–का?–तूं कोण?"

नीलमणीनें ओठ चावला व म्हटलें, "मी कोण?"

मयकानें त्याचा क्रोध ओळखला. त्यानें नमते घेऊन म्हटलें, "मणी, तुला राग कां आला माझ्या बोलण्याचा! मग जाऊ दे. आपण हें बोलणेंच सोडून देऊं.

पुनः दोघांत अबोला निर्माण झाला! त्याच्या मुद्रेवर एवढें गांभीर्य पसरलें कीं, हास्यविनोद करणें त्याना जन्मजन्मातरी माहीत नसावें असें दिसलें. आपल्या घरीं येईपर्यंत त्याच्यामध्यें एका शब्दाचेंहि बोलणें झालें नाहीं. पुढें दोघेहि खिन्नातःकरणानें आपआपल्या निवासस्थानीं जाऊन एकान्तात बसले. दोघानाहि वाटलें, "त्यानें असें करायला नको होतें."

साऱ्या नगरीला कौतुकास्पद झालेलें त्याचें प्रेम व बन्धुता निर्माण होण्यास जवळ जवळ दोन तपें लागलीं होतीं. परतु त्याचा भग होण्यास किती अवसर लागला!

संघटनेपेक्षा विघटना इतकी सुलभ का बरें असावी?

त्या दिवसापासून त्यांचा प्रेमबध ढिला झाला. दोघानाही परस्पराचा सहवास नकोसा वाटू लागला. दोघाचेही मानसिक स्वास्थ्य नष्ट

झालें. दोघाच्याहि मुद्रेवरील प्रसन्नता मावळली. विघटनेच्या त्या पहिल्या रात्रीं दोघे एकास्थानीं निजले असताही, त्याचें भाषण झाले नाहीं. नाहींतर एखादे रात्रीं त्याना झोप आली नाहीं तर ते पहाटे-पर्यंत गप्पागोष्टी करीत बसत. त्यानाच आज एक शब्दही बोलण्याची इच्छा होईना. दोघेही अस्वस्थ मनानें तळमळत व सुस्कारे टाकीत पडले. दोघानाही एकमेकाची अस्वस्थता समजली होती. असो.

दोन दिवसातच त्याचा अबोला पहिल्यादा त्याच्या मातेस, नतर पित्यास, नतर घरातील दासदासींना कळून आला. सर्वांना त्याचें नवल वाटलें. त्याच्या मातापित्यानी त्याचें कारण विचारता दोघानींही खरे कारण सागण्याची टाळाटाळ केली आणि आपला अबोला नाहीं, 'असें दर्शविण्याचा त्यानीं प्रयत्न केला.

आणखी दोन दिवस गेले. त्याचा अबोला नुस्ता पोकळ नसून त्यात कडवटपणा आहे असे त्याच्या मातेला दिसून येतांच तिनें दोघांनाही आपल्याजवळ बसवून बंधूप्रेमाचें महत्त्व सागितलें. आणि तुमच्या मनात काय किंतु आहे तो काढून टाका असें बजावलें पण तिच्या समोर वादविवाद करण्यासारखा आपला विषय नाहीं, एवढें त्याना कळत होतें. म्हणून त्यानीं तिची कशीतरी समजूत केली आणि आम्हीं आपसात समजूत करून घेतों असें सागून ते तिच्या-जवळून दुसरीकडे गेले. या अबोल्याचा किंवा मनांतील खतीचा कांहींतरी निकाल लावलाच पाहिजे. नाहींतर लोकात भलतीच चर्चा सुरू होईल. असें त्याना भय पडलें. म्हणून ते दोघेहि तसा संकेत करून एका पुष्पोद्यानांत गेले. त्यानीं एक एकात स्थळ पाहून आपलें बोलणें काढलें.

नीलमणी म्हणाला, " माझी व तुझी माता एक नसली तरी मी तुझा ज्येष्ट बधु आहे हें तू विसरतां कामा नये. "

मयक म्हणाला, "पण ज्येष्ठ भ्रात्यानें जास्त समजूतदारपणा दाखवला पाहिजे हें तुला मान्य असेलच."

अगदीं सामोपचारानें बोलावयाचा उपक्रम करावयाचा, असा त्यानीं निश्चय केला होता; परतु मनातील विकल्पानें जिभेला निराळें वळण दिलें. दोघानींहि कटु शब्दातच बोलण्यास प्रारभ केला.

नीलमणी म्हणाला, "मी आतापर्यंत समजसपणानेंच वागत आलों आहे. आणि म्हणूनच मी तुला त्या दिवशीं सागितलें कीं, माधुरीचें चिंतन करणें तुला शोभत नाहीं. आणि आजहि पण तेंच सागतो कीं, तिचा नाद--"

मयंक उपाहासानें हसला व म्हणाला, "सोडणें मला शक्य नाहीं. मणी, तुला खिजवावें म्हणून बोलत नाही. पण खरी गोष्ट काय आहे तें सागतो. माधुरीवर माझें प्रेम जडलें असून तिचेंहि मजवर जडलें आहे—"

नीलमणी उसळून म्हणाला, "अगदीं खोटे. अगदीं असत्य बोलतों आहेस. तिचें खरें प्रेम मजवर जडलें आहे. वेड्या, तूं अगदीं भ्रमात आहेस. ही पाहिलीस तिनें मला प्रेम पुष्पमाला घाडून आपला अनुराग प्रकट केला आहे." असें म्हणून त्यानें एक सुकलेली माला खिशातून काढून मयकापुढें धरली.

मयक पुनः उपरोधिकपणें हसून म्हणाला, "काय थाप देतो आहेस. हें शठत्व तुला शोभण्यासारखे आहे म्हणा, पण हे पहा, तिला जाऊन प्रत्यक्षच विचार म्हणजे तुझा संशय फिटेल. माधुरीसारखी रूपगुणसुदर कचनी वाटेल त्याच्यावर मोहित होईल अशी का तुझी समजूत आहे ?—"

नीलमणी हात उगारून म्हणाला, "ज्यास्त बोलशील तर--"

मयक ताडकन् उठला आणि गुरगुरून म्हणाला, " मणी, जीभ सभाळून बोल. तू आमचा पोष्य आहेस हे विसरू नकोस—"

नीलमणी संतापानें लाल झाला! तो ओठ चावून म्हणाला, " मी तुमचा पोष्य--मी तुमचा--ठीक आहे आजपासून तुमच्या अन्नावर थुकलों! पण ध्यानात ठेव, माधुरीच्या बाबतींत माझ्या आड आलास तर--तर काय? अन्नाला न जागता मी माझा मार्ग निष्कटक करीन!--" तो मुकाट्यानें तेथून झपकन निघून गेला. मयकाचें विकट हास्य हवेंत किती वेळ खेळत होते.

* * *

नीलमणी तेथून उठला तो थेट माधुरीकडे गेला.

ती आपल्या राव्याशीं खेळत बसली होती.

नीलमणी तिच्यापुढें जाऊन उभा राहिला. त्यानें तिनें धाडलेली पुष्पमाला तिला दाखवीत आपलें प्रेम निवेदन केलें. आणि म्हटलें, ' माधुरी, तुझें प्रेम मला पाहिजे. ते मला मिळेल का? माझा बधु मयक म्हणतो कीं, तू त्याच्यावर अनुरक्त आहेस. माधुरी, खरे काय तें साग. ही तुझी पुष्पमाला मला काहीं निराळें सागते. पण तुझ्या तोंडातून--"

माधुरीनें पुढें होऊन त्याचा हात धरला! नीलमणीच्या नसानसातून आनदाच्या लहरी उठू लागल्या! तिनें त्यास आदरानें आपल्या जवळच्या आसनावर बसवून हास्यमुखानें म्हटले, ' नीलमणी, पण्यात होणारी साधी देवघेवही इतक्या घाईनें होत नाहीं. आणि आपण तर अंतःकरणाचाच ठाव मागतां! नवल नव्हे का?

--बसा ताबूल खा. स्वस्थ व्हा. मग आपण बोलू. माझ्या घरीं

आपण होऊन येऊन आपण हा केवढा अनुग्रह केला! आपल्या सौजन्याला हें शोभण्यासारखेच आहे. आपण इतके अवचित आला आहा कीं, आपलें स्वागत कसें करावें हें मला कळत नाहीं. तेव्हा काहीं चूकभूल झाली तर क्षमा होईलना?'––

इत्यादि मधुर बोलानीं तिनें आपल्या नावाचें सार्थक केले आणि नीलमणीची बुद्धि मारून टाकली! तिनें त्याचें यथोचित स्वागत केलें व ताबूल देऊन कांहीं निश्चित उत्तर न देताच त्याची बोळवण केली! असें असताही नीलमणीस तेंच उत्तर वाटले. तो आनदानें व अभिमानानें निघून आपल्या नेहमीच्याच घरीं गेला. आनदातिशयाने त्यास मयकापुढें बोललेल्या शब्दाचें भान राहिलें नाहीं.

इकडे तो माधुरीपुढून गेला आणि मयक तेथे प्राप्त झाला.

त्यानें आपण होऊनच तिच्याजवळ स्थान घेतलें आणि प्रेमभरिते नेत्रानीं तिच्या प्रफुल्लित लाजऱ्या मुद्रेकडे पाहात म्हटलें, "बाण मारून विद्ध केल्यानतर पारधी त्या घायाळ हरिणाची कींव करतो. तितकीही अनुकपा माझ्या वाटणीला येऊ नये का? अचूक शरसधान करण्यात आपण पटाईत आहा; पण यानतर––माधुरी, सलगीची क्षमा कर. पण खरेंच साग, त्या दिवसानतर एक प्रेमाचा निरोप नाहीं–"

माधुरीनें मदस्मित करीत म्हटलें, "थोराच्या कानापर्यंत साद पोचेल कीं नाहीं या शकेनें विव्हल असलेल्या हृदयाला या टोमण्यावर काय उत्तर देतां येणार?"

ती ताबूल करू लागली.

मयकानें तिच्या हस्तकौशल्याकडे पाहात म्हटलें, "माधुरी तुला एक खुळेपणा कळला का?––आमचा तो नीलमणी––आमचा आश्रित आहे तो. माझा भाऊ नव्हे अं तो. असाच आमच्या वडिलांचा पोष्य पुत्र. त्याला वाटतें तू म्हणे त्याच्यावर अनुरक्त

आहेस. मी त्याला त्याचा खुळेपणा समजावून दिला आहे. पण सागतों त्यानें येऊन जर तुला उगीच त्रास दिला तर मला तात्काळ कळव. त्यानें आपली पायरी पाहून वागलें पाहिजे असा उपाय मी करीन—"

माधुरीनें हास्यमुद्रेनें त्यास ताबूल दिला व त्याचीही बोळवण केली. त्यासही तिचें खरें हृदय कळलें नाहीं. खरें उत्तर मिळाले नाहीं.

माधुरीनें असा मायावीपणा का केला? नगरातील एका श्रेष्ठ कुळातील दोन सुदर तरुण आपल्या रूपावर मोहित झाले आहेत या जाणिवेनें तिच्या मनात स्वसौंदर्याचा दुराभिमान जागृत झाला कीं, दोघांपैकीं आपल्यास खरा प्रिय कोण आहे, याचा निर्णय तिला झाला नाहीं?—स्त्रीहृदयाचा ठाव कोणाला लागला आहे?

मयक घरीं गेला तों नीलमणी त्यास तेथे उपस्थित झालेला दिसला. त्याचे शब्द त्यास आठवले. कुचेष्टेचें हास्य त्याच्या मुद्रेवर उमटलें त्यानें खाकरून मणीचें लक्ष आपल्याकडे खेचलें. आणि पुनः उपरोधिकपणानें हसून व डोळे मिचकावून 'पुनः आपण इथें का?' असा भाव त्यानें मुद्रेवर दर्शविला. मणीनें आपला ओठ चावला आणि तोंडातल्या तोंडात म्हटलें, "दाताची सबध कवळी काढून हातात देईन, तेव्हा समजेल सौख्य.'

अगोदर सपाटून धूर व मागून प्रचड भडका हा अग्नीचा स्वभाव वैरभावातही आढळून येतो. नीलमणी व मयक याच्या मधील बधुप्रेम नाहींसें झाले व त्याची जागा वैरानें घेतली. दोघेहि अविवेकानें अंध झाले व धुमसू लागले. हळू हळूं या कडू धुराची घाण कुटुंबांत कुटुबातून आळींत व आळींतून सबंध नगरांत पसरली. कोणी आश्चर्य दाखविलें, कोणी हें असें व्हायचेंच असा निर्वाळा दिला, कोणी पुढें काय होतें, इकडे लक्ष देऊन बसले, आणि कोणी

नारदाची भूमिका घेतली. त्याच्या पित्यानीं घरातल्या घरात त्याची समजुत घालण्याचा जो प्रयत्न केला, तो विफल झाला. ज्यानीं आपल्या गुरुजनासमोर अवज्ञेचा एक शब्द उच्चारला नाहीं, त्यांनीं या गोष्टींत दात ओठ खाऊन दुरुत्तरें केली आणि आपल्या वैभवाचें खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडलें. त्याना दूर कसे करावें आणि कोणाला कुठें ठेवावें, ही मोठीच पचाईत त्याच्या मातापित्यास पडली.

नीलमणीला या विषयीं समजून सागताच तो उलटून म्हणाला, "तुम्हाला तुमच्या मुलाचें वागणें पसत पडणार व बोलणें खरे वाटणार. मी कोण?—तुम्ही पाळलेलें पोर. अशा पाळीव मनुष्यास कुत्र्याइतकाच मान मिळणार हें मी काय ओळखून नाहीं. मला वनवासी व्हावे लागणार हें दिसतेंच आहे; पण हा माझ्याशी अन्याय होतो आहे. मी तुमच्याशीं कोणतीही प्रतारणा केली नसताना तुम्ही मला दूर लोटणार दुर्दैव माझे!'

त्याची ही तऱ्हा तर मयकानें आपल्या मातेला म्हटले, "आई, तूं माझी जन्मदात्री आहेस एवढेंच. तुझे खरें प्रेम नीलमणीवर आहे, हें मी काय ओळखून नाहीं! त्याची कपटविद्या तुला दिसत नाहीं. नाहींतर तू त्यास केव्हाच हाकलून दिलें असतेस. अगदीं–अगदीं कृतघ्न मनुष्य आहे तो—"

दोघाच्याहि असल्या आडमुठ्या भाषणानें ती माऊली किंकर्तव्य-मूढ होऊन गप्प बसली. या वैरापासून काहींतरी अनर्थ होणार असें तिला भय पडलें.

त्यांचेकडे धर्मदास नांवाचा एक पिढीजाद सेवक होता, त्यास हा वैराग्नी कळताच त्यानेंहि त्या दोघास अलग अलग गाठून थोडा उपदेश केला; पण त्याचाही काहीं उपयोग झाला नाहीं. उलट, या प्रयत्नानें त्याच्या वैराग्नीस चेवच आला!

नीलमणी व मयक दोघानाहि वाटू लागलें कीं, दोघापैकीं कोणी-तरी एक जगातून नाहींसा झाल्याखेरीज हे वैर मपणार नाहीं आणि ते ते बोलून दाखवू लागले. त्याना त्याची खत वाटेना व आपण काहीं भयकर चूक करतों आहों हें त्याच्या लक्षात येईना. त्याच्या या भाडणात आणखी एक चमत्कार घडून आला. तो म्हणजे त्याच्या वैराचें कारण काय ? याचा फारसा कोणी शोध घेतला नाहीं. बहुशः सर्व वैरामध्यें असेच होतें. तें तिऱ्हाइताच्या नजरेला येत नाहीं.

वैर करणाऱ्या व्यक्ती आपल्यावर दोषारोप येऊ नये म्हणून मुख्य कारण कोणासहि समजू नये म्हणून जपतात. त्यामुळे भाडण तोड-ण्यास तयार झालेले मध्यस्थ अनुमानानें समजुती पाडण्यास जातात. त्याचा परिणाम विपरीतच होतो.

वास्तविक या वैराग्नीच्या जन्माचा बराच मोठा दोष माधुरीकडे होता. तिनें जर दोनी दरडीवर हात ठेवण्याचा अमानुषपणा दाख-विला नसता तर हा प्रसग ओढवला नसता. परतु तिला विपरीत बुद्धि सुचली. तिने दोघानाहि उत्तेजन दिले व इरेला घातलें. आपल्या अभिलाषाने त्या दोघामध्यें निर्माण झालेली चुरस तिला मोहक वाटली. मीनाक्षी नांवाची तिची एक मैत्रिण होती. तिला हा प्रकार कळताच तिनें तिचा निषेध करून हें वैर तू लौकर शमविलें नाहींस तर त्याचें प्रायश्चित तुला सुद्धा भोगावें लागेल, असें बजावलें. त्यावर ती दुष्ट कचनी हसून म्हणाली, "त्यानी आपसात भाडावे असें मला मुळींच वाटत नाहीं; पण मी तरी काय करणार ? माझे प्रेम दोघात वाटलें गेलें आहे. नीलमणीची हत्तीप्रमाणें असणारी विशालता मला जितकी रुचते, तितकीच मयकाची सिंहाच्या जातीची चपलता मला आवडते. दोघांचें बल, दोघाचे गुण परस्पर भिन्न

आहेत. पण ते मला आवडतात. त्यानीं तें समजून गुण्यागोविंदानें राहण्यास काय हरकत आहे ? ”

मीनाक्षी खिन्नतेनें म्हणाली, “ पण हें बरें नाहीं. कोणातरी एका-लाच तूं जवळ कर आणि दुसऱ्यास स्पष्ट साग कीं, तू मला प्रिय नाहींस. ते दोघेही कुलीन घराण्यातील आहेत. राजमार्गावर फिरणारीं श्वानें नव्हेत. त्याना तू आपल्या हृदयाची, आपल्या प्रेमाची स्पष्ट ओळख दिलीस तर त्याची समजूत पटेल व एक दुसऱ्याच्या आड येणार नाहीं. तू स्पष्ट बोलेपर्यंत त्याना दुसऱ्याचा सशय येत राहील. माधुरी सावध हो आणि आपला हा आसुरीपणा आवर. ”

माधुरीला तिचा तो बुद्धिवाद उपहासास्पद वाटला. पण त्याच दिवशीं ती उद्यानात फिरण्यास गेली असता धर्मदासानें तिला गाठलें. आपल्या स्वामीच्या तरुण मुलामध्यें भाडण कसे उपस्थित झालें याची त्यानें बारकाईनें चौकशी केली. माधुरीसारख्या एका कचनीच्या नादानें नीलमणी व मयक कर्तव्यच्युत झालेले पाहून त्यास सखेदा-श्चर्य वाटले ! त्यास माधुरीचा राग आला म्हणून त्यानें तिला गाठलें व क्रोधानें म्हटलें, ‘ का ग दिवटे ! आमच्या मुलात भाडणें लावतेस काय ?—महाराजापुढें नेऊन उभी करू काय ? मुकाट्यानें आपली माया आवरून घे. नाहींतर पहा मग. धाय धाय रडवीन, दोघात भांडणें लावून दूर राहून गम्मत पाहणाऱ्याचे डोळे लौकरच फुटतात हे विसरू नकोस बर का ? ’

माधुरीनें उद्धटपणानें म्हटलें, “ त्या दोघांना मी का आमत्रण दिलें होतें ? बुड्ढेबाबा, त्यांनाच थोडें शहाणपण शिकवा जा. ’

धर्मदास अनुभवी वृद्ध खरा; पण त्याला सुद्धा तिच्याशीं कसें बोलावें हें समजेना. तो मुकाटयानें निघून गेला. माधुरी वेड्यासारखी

हंसली. आपण किती प्रभावशाली आहों. आज आपल्यास काय महत्त्व आहे या विचारानें तिला आकाशही ठेगणें झालें. पुढें काय गमत होते ती पाहण्यास ती आतुर झाली.

अशा मनःस्थितीत ती असताच नीलमणी तिच्यापुढें येऊन उभा राहिला. त्यानें उतावीळपणें विचारलें, " तो वृद्ध जबूक आता तुला काय म्हणत होता ? "

माधुरी दुःखी मुद्रा करून म्हणाली, ' त्यानी माझा छळच माडला आहे. '

नीलमणी उसळून म्हणाला, ' तुझा छळ ? कसला ?—काय म्हणत होता तो ? साग, लाडके, नुस्ते निश्वास टाकू नकोस. तुझ्या दुःखाचे कारण साग. काय म्हणत होता तो जबूक ?—पण तुला विचारायला कशाला पाहिजे. मी त्याला ओळखून आहे. त्याचे प्रेम मयकावर आहे. त्याचीच कड घेऊन तो तुझी समजूत करायला आला होता ना ? तसेच असले पाहिजे. तो त्याची स्तुति करील न माझी निदा. पण त्या थेरड्याला म्हणावें याद राखून ऐस. नको, माधुरी, आपल्या हास्यमधुर मुद्रेला कष्टी करू नकोस. तुझ्या हृदयाचा हा लाल जिवत असता, तुला कष्टी करण्याची कोणाची प्राज्ञा आहे. मयकाला सुद्धा मी खडे चारीन. प्रसग येऊं दे. बोल, माधुरी, तुझे काय प्रिय करू तें साग ? '

' मणी, मयकाच्या रागाची मला भीति वाटते. ' माधुरीनें जवळच्या झाडाचे पान कुरतडत म्हटलें, ' आम्हा बायकांचा जन्म मोठा वाईट असतो. '

नीलमणीनें तिचे दोन्ही हात चटकन् धरले आणि तिच्या नतदृष्टीला दृष्टी देऊन म्हटलें, " तुझ्यासारख्या भाग्यवतीनें असे उद्गार

काढणें हे मला लांच्छनास्पद आहे. मयकाला या जगातून नाहींसा करू का ?"

"नको-नको-नको—" माधुरीनें कापत कापत म्हटले, त्याच्या नाशानें मला समाधान होणार नाहीं. नीलमणी, तुम्ही मला जितके प्रिय आहा—"

नीलमणीनें तिला अलिंगन देऊन म्हटलें, "बस्स, तुझे ईप्सीत कळलें. जास्त बोल नकोस तुला कसलाहि त्रास न होईल अशीच मी व्यवस्था करीन—"

तो एकदम तिच्यापुढून निघून गेला. माधुरीला पुढे काय बोलायचें होते, तें त्यानें ऐकलें नाहीं. आपल्यावर ती अनुरक्त आहे याचा अर्थच मयक तिला नको आहे. असा गृहित धरला, पण तो नगरातील एका धनवानाचा पुत्र तेव्हा त्याची अवकृपा न होईल हेंही तिला हवे आहे. म्हणून मी दुःखमग्न आहे. तेव्हा त्यासंबधीं काहींतरी वाट लावली पाहिजे.

तो धावत घरीं आला व त्याने मयकास एकातात गाठून म्हटलें, "पुरुष असशील तर मी सागतो तेथें येशील. आपल्या वैराग्नीच्या धुरानें आपल्या वडिलाच्या डोळयास अश्रुधारा लागल्या आहेत. त्याचा शेवट लाविला पाहिजे."

"हो हो बंधुराया, माझी पण तीच इच्छा आहे." मयकानें काहींसें हसतच उत्तर दिलें तें नीलमणीला झोंबल्यावाचून राहिलें नाहीं. तरी पण त्यानी मोजक्या शब्दात नगरा शेजारच्या एका अरण्यात एक संकेत स्थान ठरविलें. भेटीची वेळ दुसरे दिवशींचा प्रातःकाळ होता."

कवटी बोलता बोलता स्तब्ध झाली. मी तिच्याकडे अनिमिष नेत्रानीं पाहातच होतो. ती थांबताच मी किंचित् भानावर येऊन

भोंवताली पाहिले; पूर्वेकडे अरुणाच्या ध्वजेचें टोंक दिसू लागलें होते. मी मनात म्हटले, " पूर्वी एका काली अशाच एका प्रभात काली त्या दोघा बधूनीं एकमेकाचा प्राण घेण्याचा हेतु धरून आपल्या सकेत स्थानाकडे गमन केले असेल नाहीं? आणि तेहि एका वेसवेच्या मोहानें मोहित होऊन. "

कवटीनें माझे मनोगत ओळखले असावे. ती पुनः बोलू लागली अरुणाच्या ध्वजेकडे असलेली माझी दृष्टी तिने ' श्याम ' अशी हाक मारून आपल्याकडे वळवली. ती म्हणाली, " तुझा विचार बरोबर आहे श्याम. ही गोष्ट सागताना माझ्याहि जिवाचा थरकाप होतो आहे. परतु काय करू? माझी वासना तेवढ्यात अडकली आहे. श्याम, पुढचा इतिहास फार थोडा आहे. तो लक्ष देऊन ऐक. "

' दुसरे दिवशीं प्रभातकाली कोणालाही न कळवता ते दोघे बधु —बधु कसले एकमेकाचे हाडवैरी शस्त्रास्त्रानीं सज्ज होऊन घराबाहेर पडले. दोघेहि एकमेकाची सगत व मार्ग टाळून निघाले. सूर्योदयाच्या सुमारास दोघेहि एकमेकापुढें येऊन ठाकले. दोघेही ज्वालामुखी-पर्वताप्रमाणें आतून भडकलेले असले तरी प्रभातकाळानें आपली छाप याच्यावर पाडली. दोघानाही आपलें पूर्वप्रेम आठवलें. नीलमणीनें म्हटलें, " मयक, आपलें वैर उग्र होऊं लागलें आहे. साऱ्या नगरांत त्याचा बोभाटा झाला आहे. जग दोघानाही दोष देत आहे. आपण ह्याचा विचार केला पाहिजे. '

अगदीं माझ्या मनासारखे बोललात माझी ही पण तीच सूचना आहे.

' तुझ्या या कुजक्या बोलण्याचा मला वीट येऊ लागला आहे ' नीलमणीनें तिरस्कार दर्शवीत म्हटले, ' तुझ्याशीं जास्त वाच्यता करून वेळ मोडण्यापेक्षा काहीं सोक्षमोक्ष केलेला बरा. '

मयंकानें मध्येंच म्हटलें, ' माझे सुद्धा तेच म्हणणें. तुमच्या जागीं मी असतो तर पुनः घरचें तोंड घेतलें नसते. माधुरीच्या घरीं हेलपाटे घालून अपमान सहन करणें आणि आमच्या घरचे तुकडे मोडून—

' नीच—' नीलमणीनें तरवार खणकावीत म्हटलें, " असल्या कुत्सित भाषणानें माझा हृदयभेद करतोस. शरम नाहीं वाटत. मयक, नीट ऐक. माधुरीचा नाद सोडून तू माझा मार्ग आडवीत नसशील तर तुझ्या या बकवादाची मी तुला क्षमा करीन. माधुरीकडे तुला थोडासाही मान नाहीं. तुझे स्मरण करताच तिच्या कपाळाला आठी चढते, दुसऱ्यानें तुझे नाव तिच्या समोर काढले तर ते सुद्धा तिला अप्रिय होते. '

' असे ?—' मयकाने उपहासानें म्हटलें, ' तिला मी किंवा माझे नाव इतके अप्रिय होण्याचें कारण काय बुवा ? मी असे काय तिचे घोडें मारले आहे ? '

' तू तिच्या प्रियकराचे आड येत आहेस ? '

' म्हणजे तुम्हीच ना ?—इतकी कशाने भाळली ती तुमच्यावर ? '

नीलमणी चिडून म्हणाला, " तुझ्या रक्ताने माझे हात रगणारच का ? मयक, मी तडजोड करण्याकरता आलो असता तूं मला निर्वाणीचे प्रसगाकडे ओढीत आहेस. '

' मग त्यास माझी तयारी कुठें नाहीं, पण हें पहा तडजोड करायची तर शहाणपणानें करू या. आपले भाडण कशाबद्दल ? माधुरीचें खरे प्रेम कोणावर आहे याबद्दलच की नाहीं ? मग त्याचा निकाल इथें कसा होईल ? आपण तिच्याकडे जाऊ आणि तिला स्पष्ट विचारूं ज्याच्यावर तिचें प्रेम असेल, त्यानें राहावें. दुसऱ्यानें बाजूला व्हावें. '

‘ तेच मी तुला सागतो. तू मुकाट्यानें बाजूला हो—’

‘ तुमच्या धमकावणीनें नाहीं होणार—’

‘ मग मी तरवारीचा—’ नीलमणीचा पुढचा शब्द तसाच राहिला.

दोघानीही तरवारी पाजळल्या आणि एकमेकावर चाल केली! त्याच्या भोंवतालची सृष्टी सवित्याच्या स्वागतात रगली असताना ते दोघे एकमेकाच्या रक्ताचा रग उडविण्यास उद्युक्त झाले!

दोघेही एकमेकाम पुरून असल्यामुळे व दोघानाहि असियुद्ध चागलेच माहीत असल्यामुळे कोणी कोणास हार जाईना. मात्र या झटापटीत नीलमणीच्या विशालतेपेक्षा मयकाची चपलता त्यास विशेष उपयुक्त होऊ लागली. त्यास नीलमणीचा एकही वार अजून लागला नव्हता; पण त्यानें नीलमणीवर दोन वार केले होते. त्याची चीड नीलमणीस आली व त्यास वाटले, मयक अधर्मानें लढत आहे. म्हणून त्याने दात ओठ खात ओरडून म्हटलें, “ अधर्माने लढतोस! नीच–नराधम—” इतक्यात त्यास मयकाचा तिसरा वार बसला! तो बसताच त्यानें तलवार फेकून दिली आणि बाहु युद्धाकरिता गर्जना करून मयकाच्या अंगावर चाल केली. मयक सावध होताच. पण नीलमणी क्रोधानें आंधळा झाला होता. कोणीकडून मयकाचा घात केला पाहिजे एवढेंच त्याचें धोरण. म्हणून त्यानें त्याचें नाकावर मुष्टी प्रहार केला! त्यानें मयक हटला! त्याचा घोणा फुटला व त्याची मुद्रा रक्तानें माखली! आपल्या तोंडावरील रक्त पुशीत तो ओरडून म्हणाला, “ मणी–मणी हे धर्मयुद्धच कारे?”

“ सागतों—” असें म्हणत नीलमणी त्याचे नरडे पकडण्यास धांवला. मयकानें अत्यत चपळाईनें त्याची झडप चुकवून त्यानें त्याच्या मानगुटीस हात घातला. त्या बरोबर आपण हरणार या भीतीनें व चिडीनें नीलमणीनें त्याच्या पोटावर अत्यत बलपूर्वक

मुष्टी मारली ! मयक कोलमडून खाली पडला ! तेवढी संधि गाठून नीलमणीनें जवळच पडलेली तरवार उचलली आणी त्याच्या अंगावर उडी घेतली. निःसहाय्य व हतबल होऊन पडलेल्या मयकाच्या त्यानें पोटावर अत्यंत क्रूरतेनें एक पाय रोवला आणि हातातील शस्त्र त्याच्या छातींत खुपसलें ! त्या घावानें मयकाच्या अंगातून रक्ताचें कारजें नीलमणीच्या तोंडापर्यंत उडालें ! तो नखशिखान्त रक्तानें रंगला !-- मयकाचे प्राण कुडी सोडून निघून गेले !

नीलमणीला उन्माद झाला ! त्यानें विजयोत्साहानें गर्जना करून शड्डू ठोकला आणि मोठ्यादा म्हटले, माधुरी--माधुरी ! आता तू माझी आहेस व मी तुझा आहे. अरे आमच्या वरमाला कुठे आहेत ? आणा—आणा ! त्यानें लालेलाल सूर्याकडे पाहिले आणि विकट हास्य करून म्हटलें, " कारे असा टवकारून काय पाहतोस ?—-तुझ्या प्रमाणेंच मी लाल दिसतो— अरे पण मी इथेंच काय घुटमळतो आहे. या अशा वेशातच मी माधुरी पुढें जाऊन उभा राहिलों तर ? तिचे सुखकारक अलिंगन मला नाही का मिळणार ?----" पुनः तो हसला आणि नगराकडे धावत सुटला !

नगराच्या वेशी नुकत्याच पूर्ण उघडल्या होत्या आणि थोडीशी जा ये सुरू झाली होती. तोंच राक्षसाप्रमाणें भासणारा व रक्तानें मढलेला नीलमणी नाचत व हातवारे करीत नगरात घुसला ! त्याचें तें भयंकर स्वरूप पाहताच नागरिक लोकात खळबळ उडाली ! जो तो त्याच्या मार्गातून दूर झाला. त्याच्या भेसूर स्वरूपामुळें त्यास कोणीही ओळखले नाहीं. त्यानेंहि जगाकडे पाहिलें नाहीं. त्यानें नाचत व गर्जना करीत माधुरीचे मंदिर गाठलें !

माधुरी नुक्तीच ऊठून मुखप्रक्षालनाच्या तयारीत होती. तोंच

तिनें कोलाहल ऐकला. काय काय म्हणता म्हणतां तिच्या मंदिरातच गडबड उडाली! ती भांबावून पुढें येते तों नीलमणीचा झोटिंग तिच्यापुढें उभा राहिला! तिची बोबडीच वळली!

नीलमणी कमरेवर हात ठेवून थाटानें उभा राहिला आणि म्हणाला, " माधुरी प्राणप्रिये! पहा, आता आपल्या या प्रियकराकडे निर्भयतेनें पहा! माधुरी, तुझ्या छळकाला यमसदनाला पाठवून दिले. "

" तुम्ही कोण? नीलमणी—"

" हो. तुझा तन्मणी–नीलमणी––"

माधुरीला धैर्य आले. ती खेकसून म्हणाली, " भावाच्या रक्तानें रंगलेल्या राक्षसा, तुझ्यावर माझें प्रेम आहे हें तुला कोणी सांगितलें?—जा—जा—माझ्या पुढून तू चालता हो!—आ कोण आहेरे तिकडे या नराधमाला चौकीवर न्या—'

" माधुरी–––"

मयक घातक्या, आपल्या स्वामीपुत्राचें रक्त पिणाऱ्या वृका! माझ्या दृष्टी पुढून दूर हो पाहू! चांडाला! तुझ्या या पैशाचिक कृतीने–'

तिचा तो तिटकारा पाहताच नीलमणीच्या साऱ्या शरीरात एक निराळीच वीज चमकली! तो पुनः तेथून पळत सुटला!

' माधुरी माझी नव्हे. माधुरी मयकाची नव्हे. मग कोणाची?—सांगा हो—सांगा. माधुरी कोणाची?—माधुरी माझी नव्हे—'

पुनः तो धावतच मयकाच्या प्रेताजवळ आला! त्यानें त्याच्याकडे स्तिमित दृष्टीनें पाहिले! त्यानें त्याच्या हृदयातील शस्त्र काढून आपल्या हृदयात खुपसून घेतलें! त्याचा देह उन्मळून मयकाच्या

देहावर पडला ! मरतां मरता त्याने मयकाच्या गळ्यात हात टाकला ? श्याम ? एका नीच कचनी करिता त्या नगरातील दोन तरुण असे बळीं पडले !——

मी एकदम विचारिले, ' आणि ती राक्षसी तशीच राहिली ? '

' नाही–नाहीं ! ती सुखी कशी राहील ? आपल्या मनोरजनार्थ तिनें कलह पेटविला. त्याचा असा अनर्थ झाला ! ती सुखी कशी राहील. साऱ्या नगरीला या अनर्थाची वार्ता कळली. तिचे कारणही उघडकीस आले ! त्याबरोबर साऱ्या जनतेच्या क्रोधास उफाण आले ! राजदूत कचनीच्या घराकडे धावले ? त्यानीं तिच्या तारुण्याचा विचार केला नाहीं कीं सौदर्याचा केला नाहीं. त्यानीं तिच्या वेणीला धरून फरफटत तिला बाहेर काढले ! पुढें तिचें नाक कान कापून तिची धिंड काढली आणि तिला कुत्र्याच्या मोतीने मरू दिलें ! हा न्याय झाला तरी त्या अनर्थानें पुष्पधारा नगरीला कायमची दृष्ट लागली !

नीलमणी-मयक याच्यामध्यें निर्माण झालेला बधुद्रोह त्याच्या मरणाबरोबर नाहीसा न होता, त्याचे पिशाच्च साऱ्या नगरीभर नाचू लागलें ! कलह कलागती सर्वत्र होऊ लागल्या ! सर्वांचीं मने क्षुल्लक कारणाकरिताही एकमेकाविषयीं दूषित होऊ लागली. आणि त्याचा परिणाम एकमेकाच्या घातात होऊ लागला !

' एका पिढींत पुष्पधारेला रक्तपिति भरली ! श्याम तिचें हे आताचे रूप पहा. त्याचा पूर्वइतिहास असा आहे. कोणताही देश, कोणतीही नगरी, कोणताही समाज, कोणतेंही कुटुब असें मातीमोल होतें. याला कारण बन्धुद्रोह–बन्धुद्रोह ! यादवाचा नाश असाच झाला ! पुष्पधारेचा नाश असा झाला ! '

कवटी पुनः गप्प बसली! मीही स्तब्ध बसलों. माझी दृष्टी एकवार सभोवती फिरली! उजाड पुष्पधारेचे स्वरूप प्रातःकालच्या शोभेने ही खुलत नव्हते. मी खिन्नातःकरणानें कवटीला सहज विचारिले, 'हा भीषण इतिहास पाहणारी व्यक्ति तू कोण?

कवटीनें चाचरत उत्तर दिले, 'माधुरी! श्याम मला आणखी दोन लाथा मार. पण मला गंगेत नेऊन टाक. माझ्या तोंडावर हजारदा थुक. पण मला गंगेत नेऊन टाक! श्याम, मला मुक्ति देरे!—मला गंगेत नेऊन टाक–'

१ 

# बबनशेट

**तो**—औलिया जडीबुट्टी पारदाश्रम फार्मास्युटिकल वर्क्स, जालन्दर पजाब या प्रख्यात औषधी कारखान्याचा स्वयमन्य एजन्ट, डॉक्टर, जडीबुट्टी म्हणून ओळख देणारा. अनेक भाषाविशारद. बोलण्यात अघळपघळ. अभिनय व आवेश एकवार पाहाण्यायोग्य. मिजास व रहाणी शिलेदाराची. वय अदमासाने ठरवाल ते.

**मी**—सिने ब्यूटी प्रॉडक्टस लिमिटेड, मुबई, या सुगधी कारखान्याचा पगारी फिरता प्रचारक. तिशीच्या आतील तरुण. नोकरी मिळत नाहीं हे निश्चित झाल्यानतर स्वतत्र उद्योगाची आवड निर्माण झालेला महाराष्ट्रीय. कपनीच्या कृपेनें सुटाबुटात वावरणारा व शिकविलेल्या जाहिराती तोंडपाठ म्हणणारा व्यापारी प्रतिनिधि.

**बबनशेट**—सराफ कट्टयावरील एका दुकानातील कारकून. दुकानात पुरा हिशेबी. इतरत्र गलथन. म्हणूनच सर्वांच्या हास्य विनोदाचें भांडार.

**गानकोकिला मिस् चंद्रा**—नावात सर्व काहीं आलें आहे.

मुळात चंद्री कोल्हाटीण. पुढे तिरंगी सामना लढविणारी चंद्रा मुंबई-वाली. यानंतर गायनाचे जलसे करणारी गानकोकिला! उद्या तुमचे आमचे मुजरे घेणारी सिनेमा सम्राज्ञी! आणि यानंतर एखाद्या धनिकाची सौभाग्यवती.

## प्रसंग—

सराफ कट्टयावरील सार्वजनिक गणपतीपुढे आज गानकोकिलेचा खास जलसा होता. रात्रीं दहाच्यापुढें किटसनच्या झगझगत्या प्रकाशात सभा थाटू लागली. मंडपात खेंचाखेंच झाली. रस्ता भरून गेला. टवाळ—मवाळ—गचाळ यांची हुल्लड उडाली. गानकोकिलेच्या आगमनाकडे सर्वांचे लक्ष लागले. केवळ योगायोगानें मी या वर्दळींत सापडलों. कारण नसता मला बहुमान देण्यात आला व गायिकेच्या बैठकीला लागून उजव्या हातास बसविण्यात आलें. तितक्यात डॉ. जडीबुट्टी आले. अनेकाशीं आदब करीत स्वारीनें गणरायाकरिता मांडलेल्या फलाटाचा आश्रय घेतला. माझ्यावर प्रसन्न दृष्टि टाकीत अभिनयात माझी खुशाली विचारली!

अकराच्या सुमारास पैंजणाचा—( घुंगुराचा ) झणकारा ऐकवीत मिस् चंद्रा आपल्या साथीदारासह आल्या. राणीच्या बहुमानात त्यांनी बैठक मारली व आपल्या मादक दृष्टीनें सभेला पुनित केलें. आणि याच गडबडींत कोण जाणे कोणी बबनशेटना माझ्या शेजारीं आणून बसवलें. गायिकेला ते माझ्या पेक्षा एका फुटानें जवळ झाले! बबनशेटनें हातालगतच्या झगझगीत—ठमठमीत—सौंदर्य पताकेकडे कसें पाहिले असेल आणि तिनें त्याच्याकडे कशी दृष्टि रोखली असेल हें तुम्हीं ओळखा. त्यात विशेष झाले ते असें—बबनशेट गानकलेत मुरब्बी असल्याची खास ओळख मिस चंद्राला करून देण्यात आली.

तिनें तीन ठिकाणीं लचकत व दंतावली दाखवीत बब्रनशेटना मुजरा केला ! त्यांच्या मुखमंडळावर धर्मबिंदू चमकू लागले ! लौकरच पेटी तबला बोलू लागला ! सभा शांत तटस्थ होत गेली ! हावभावासह चंद्रा गाऊं लागली !–तिच्या पहिल्या पल्लेदार तानेंतच मला दिसून आलें कीं, त्या सभेत फक्त अरसिकाचा अभाव आहे !

काय नवल पाहा. हातालगत उजवी डावीकडे रसिकाचा ताडाच्या ताडा लागला असतां चंद्राला फक्त एकच रसिक दिसत होता बब्रन-शेट. आणि तिच्या नाजूक व बहारीच्या आदाचा मुख्य रोख वरचेवर होत होता त्याच्यावरच. या अमृतवर्षावाचा परिणाम बब्रनशेटवर कसा होत चालला होता ? मी सांगत नाहीं. तुम्ही अटकळ करा.

गायनाच्या मजलशींत कान्ह्यानें गोपीच्या अंगावर रंगाची पिच-कारी मारणें, तिची चुनरी भिजणे, ती थंडीनें काकडणे नी तिनें पिचकारी मारू नको म्हणून कान्ह्याची शृंगारपूर्ण विनवणी करणें या अर्थाची ठुब्ररी म्हणा किंवा लावणी म्हणा नमणें म्हणजे प्राणावाचून शरीर असण्यासारखेच. अर्ध्या तासाच्या आंत चंद्रानें हा प्राण आपल्या गाण्यात ओतला ! बब्रनशेटच्या भेदरट दृष्टीला आपली खोडकर दृष्टि देत हलक्या सुरात चंद्रानें बोल काढले—**मत मारा–कान्हा–रंगभरी–पिचकारी—!**

द्वापारयुगातील कान्ह्यानें गोपींना रंगात बुडवून काढताना काहीं ताळतंत्र ठेवला होता कीं नाहीं, त्याचें त्याला माहीत ! पण विसाव्या शतकात त्या कान्ह्याचा पराक्रम गाऊन दाखविणारी चंद्रा ! शर्थ केली तिनें. क्षणांत पिचकारी रोखून धरणारा कान्हा नी क्षणात रंग-वर्षावानें ओलीचिंब झालेली गोपी याचा अभिनय करण्यात चंद्रानें इतकी कमाल मर्यादा गाठली कीं, ती पाहून त्या नगरच्या आर्य संस्कृति–संवर्धक मंडळाचा एकहि सदस्य अफू खाल्ल्यावाचून राहता

ना !—बिचारा बबनशेट ! स्वतःच्या घामात विरघळून जाण्याची वेळ आली ! आश्रयार्थ तो क्षणाक्षणाला माझ्याकडे सरकला व मधून मधून मजकडे दीन दृष्टि टाकूं लागला ! शृंगाराच्या ओबडधोबड चेष्टानाहि बिचकणारा तो जीव चंद्राला रसिकाग्रणी वाटत होता आणि त्याचे मुखावर 'माझे आई ! लेकरावर कां हात टाकतेस उगीच !' असा कारुण्यभाव होता !—इतके असून साऱ्या सभेला बेरंग कुठेच खटकत नव्हता ! चंद्रानें गात–हावभाव करीत आणखी बाउंड्री मारली ! तिनें पुढें झुकून बबनशेटच्या हनुवटीला हात घातला !— आणि त्यानें घाबरून तिच्यापुढें डोके टेकलें ! टाळयाच्या गजरानें सारी पेठ हादरली !

हा रसोत्कर्ष मला अगदीं असह्य झाला. काहींशा त्रासिक दृष्टीनें भोंवताली पाहिले. गायिकेच्या पाठीमागे डॉ. जडीबुट्टी फळाटाच्या फळीवर डोके टेकून गाढ झोपी गेला होता ! त्याची ती वाकडी मान, उघडे तोंड, विसकटलेल्या मिशा–छी: सारे काहीं ओंगळ होतें ! त्याच्या पलीकडे आणखी दोनचार रसिक याच अवस्थेत होते ! आणि अशा अवस्थेत चंद्रा गात होती--**कान्हा मत मारो-- पिचकारी !**

मी बबनशेटच्या खवाट्याला धरून खसकन् उठलो ! आणि टाळयाच्या कडकडाटात त्याच्यासह तेथून पसार झालों ! त्या वेळी मी किती लोकांच्या पायघड्या केल्या नि मोबदल्यात शिव्या खाल्ल्या हें मंगलमूर्ति मोरयाला माहीत ! बबनशेटला मी संकटमुक्त केलें होतें व त्याबद्दल तो माझा कृतज्ञ होता, याविषयीं मात्र मला शंका नाहीं.

## आगगाडींत—

जलशानंतर तिसरे दिवसाची गोष्ट. मी नगरास निघालों होतों.

तों माझ्या डब्यांत डॉ. जडीबुट्टी येऊन धडकले! गाडीच्या गती-बरोबर गप्पा चालू झाल्या. का कोण जाणें डॉ. मजकुरानी त्या जलश्याच्या गोष्टी काढल्या. गानकोकिलेच्या गाण्याची बेहद्द तारीफ करीत ते म्हणाले, "वाहवा! क्या मजा आया उस रातको! वाह भाई वाह! जिंदगीभर याद रहेगी—" एवढें सलामीवजा बोलून त्यानी एकदम विचारले, "बब्नशेटची त्या दिवशींची करामत तुम्हाला कळली असेलच! त्यान तर औरच मजा केली!—"

"असं?—ती काय बुवा?" मी नवल दर्शवीत विचारले.

डॉक्टरची कळी एकदम खुलली! माझ्या माडीवर थाप देत ते एकदम म्हणाले, "अरे यार, काय सांगू, मजा मजा केला त्यान. तुम्ही उठून गेलात का–तो मोकळा झाला बघा. (खालच्या सुरात नाकात) ह. त्याला तो नादच. (नाकपुडीवर बोट मारीत) पक्का दर्दी यातला! सांगतो काय? वाणावर जाऊ नका. या बायकांच्या बाबतीत पक्का बदमाष!–(मान डोलवीत) तसा मनुष्य लाख! पण या बाबतीत–कामातून गेलेला!–सांगतो काय, सगळयाच्या समोर पानपट्टी करून दिली त्यान चंद्रीला! आणि त्याखाली हळूच दहा रुपयाची नोट. मी पाहिल ना!–पण चंद्री वस्ताद बर का राव. पट्टी घेतलीन! नोट घेतलीन् न् मारली बब्नशेटच्या हातावर चापटी!–पाहाता काय! मी चाटच झालो. पण बब्नशेट पक्का बेरड! हसून असा डोळा मारलान् चंद्रीला!–तिच विचारू नका! ती काय दहा रुपड्याच्या नोटेला फसते?—गाना क्या गाती है? आवाजी क्या है! दिल्ली रेडिओ सेंटर पर गाना किया, रुपिया लिया डेढ हजार!–लाहोर मे जलसा हुआ! दो घंटे का प्रोग्राम! कितना सवाल किया होगा बोलो?–पन्नह हजार!–भाई गाना हो तो ऐसा? नहीं तो तुम्हारी हमारी एजण्टी!–"

या वाक्‌गंगेला कुठे बांध घालायचा ?—बबनशेटच्या बाबतीत त्याला कोणी बनवले असावे व त्याचा वचपा तो माझ्याजवळ काढीत असावा अशी मी स्वत:ची समजूत केली.

## बॅकबेवर--

दिवाळी उलटून गेली. व्यापारी वर्ष चालू झाले, मी मुंबईस असता बॅकबेवर सहजी डॉ. जडीबुट्टी भेटले ! समोरासमोर धडक झाल्यामुळे 'साहेबजी' करणे भागच होते. भेळ घेऊन वाळवटीं जाऊन बसलो. डॉक्टराची वाक्‌गंगा एकदम उफटली. त्यानी इतर प्रस्तावना न करता एकदम म्हटले, " मी तुम्हाला सांगितलं नव्हतं, तस्स झालं! बबनशेट चंद्रीला घेऊन फरारी झाला ! सराफी दुकानातील पंचवीस हजाराच्या मुद्देमालासह--

" काय, म्हणता काय ? " अक्षर न् अक्षर खोटे असल्याची शंभर टक्के खात्री असताहि मी विचारिलें, " बबनशेट फरारी ! कुठं ? "

" कुठं ?- टर वेडावून म्हणाले, " कुठं म्हणून काय विचारता ? पैसा असल्यावर कुठंहि भरारी मारता येते--"

" अन् चंद्री बरी गेली त्याच्याबरोबर-" पुढील कादंबरी ऐकण्याच्या इच्छेनें मी साळसूदपणें विचारिलें, " त्याच्यात पर्सनॅलिटी तर काहीच नाहीं."

" सांगतो काय-" डॉक्टर म्हणाले, पर्सनॅलिटी करायची काय ? बायकांच्या बाबतींतलं त्रांगडं काहीं वेगळं आहे ! आणखी गंमत सांगू-चंद्री मोकळ्या हातानी गेली नाहीं, त्याच्याबरोबर; एका खुळ्या सावकाराला बनवून त्याचं पंधरा हजाराचं डबोलं घेऊन गेली बबनशेटकडे ! "

" कमाल आहे बुवा ! "—किल्लीचा उगीच वेढा.

" सागतो काय. " डॉ. उल्हसत म्हणाले, " बब्नशेट दर्दी आहे त्यातला म्हणून. मी गॅरटीवर सागतों, आज बब्नशेट कलकत्त्याला मजा करतोय !—तुमच्या आमच्यासारखा एजट थोडाच आहे—"

" पण त्याला वारट सुटल असेल की—"

" हा ! तें बोलू नका ! बब्नशेट असा बनेल आहे ! त्यान काय केल माहीत आहे का ?—" पण या पुढचा हप्ता डॉक्टराच्याकडे तयार नसावा. कारण, लौकरच त्यानी बगल देऊन पब्लाब्रमधील दौऱ्याच्या गोष्टी काढल्या.

आणि या नतर दोनच दिवसानी मोतीबाजारात बब्नशेटनें माझ्याशी हस्तादोलन केले. तो आर्जवानें त्या प्रसगाची आठवण देत म्हणाला,

" मी विसरणार नाहीं बर का ते उपकार !—अन् बर का, गावीं आल्यावर दुकानावर यालच. पण आमच्या घरी आल पाहिजे चहाला !—उगीच गमत ! बसू घटकाभर ! आमची बेबी दाखवू तुम्हाला ! पुरते तीन महिने झाले नाहींत. चिमखडा आहे नुसता ! —पालथी व्हायला लागली ना ! दोनचार महिन्यात रागायला लागणार न दमवून सोडणार ! आमची ही आहे हुशार ! पण पहिलच मूल. नाहीं तितका आटोप राहात !—" मी सुटकेकरिता उतावीळ आहेसें दिसताच त्यानें पुन्हा एकवार भविष्यकालचें चहाचें आमत्रण देऊन मला सोडले.

डॉक्टर मजकुरांनीं वर्णिलेल्या बब्नशेटची या बब्नशेटशीं तुलना करीत मी निघालों.

# बादशाही लॉजच्या खोलींत

तो योगायोग• सहज होता, अटल होता. दोघाच्या प्रसाराचें व प्रचाराचे क्षेत्र एकच पडल्यामुळें अशा अवचित गाठीभेटी होणें आणि एका खानावळींत एका खोलीत राहाण्याचा प्रसग उद्भवणे अगदीं सहज शक्य होते. यापूर्वी तसे पुष्कळदा झाले होते. पण त्या वेळीं जलशाची रात्र होऊन गेली नव्हती. त्यामुळे डॉक्टर मजकूर व मी साधारण तुटकच होतो. पण भाग्यकाल आता सपला होता. आमच्या दोघाच्या आयुष्यात नवा कालखड चालू झाला होता. अर्थात् बादशाही लॉजच्या चालकानी डॉ. मजकुराच्या खोलीत माझे बिऱ्हाड थाटताच मी हबकलो. पण डॉ. निहायत खूष झालें। त्यानी स्वागताचा प्रचड झोत सोडीत म्हटले, "वाह भाई वाह ! अल्लाह की क्या खैरियत है कि आपन फिर मिल गये। नजीर ने क्या खूब कहा है–यह कलजूग नहीं करजूग है इस हाथ दे उस हाथ ले—"

यानतर स्वास्थ्य मिळण्याचा अवकाश; मीच विचारिलें, "ह, काय डॉक्टर, आपल्या बबनशेटची काय हकीगत आहे—"

डॉक्टर एकदम उसळत म्हणाले, "म्हणजे ? तुम्हाला त्याचा पुढचा प्रताप कळलाच नाहीं वाटत ?–छान ! बिलकुल अन्धे हो !– सागतो काय–माझ भविष्यच होत ते. आपला बबनशेट त्या चद्रीच्या नादान, दारुडा बनला ! उगीच डोळे फाडून नका पाहू. तसच आहे ते गणित ! शराब आली कीं रडी–आली आन् रडी गळ्यात पडली की–शराब की बोतल—( पिण्याचा अभिनय ) आपल्याला दया आली त्याच्या बायकोची ! खुदाकी कसम ! चार पाच पोर न् लोकात छीः थू झालेली न् एक ना दोन–शराब पीना एकदम हराम है !– तुम्ही आता गेलात तिकडे तर बबनशेट कुठ तरी गटारात पडलेला

आढळेल !––माणूस तसा लाख ! सोन्यामोत्याची पारख ए नंबर वन् ! पण या चद्रीन बिघडविला त्याला !–मी जवान लोकांना नेहमीं सागत असतों ना–बाबानो अंडी, ब्रॅडी न् रडी यापासून चार पावल दूर राहा ! मिस्टर, तुम्हाला तेच बजावतो बर का—"

या बहुमोल उपदेशाला कोण झिडकारील ?

आणि यानतर बबनशेटची गाठ पडताच काय झाले ? नेहमीं-प्रमाणे पाय पसरून व त्यावर तसलीच लाबलचक रोजकीर्द टाकून स्वारी काहीं खाती पहात होती. मला पाहताच त्यानें माझे स्वागत केले व ओढत आपल्या घरीं नेलें. आधीं चिमखडा बेबी दाखविली, नतर चहा दिला. नतर सुपारी कातरत तो म्हणाला, " आनद झाला अं आपल्याला ! थॅक्स ! मेनीं मेनी थॅक्स बर का ?–आता या दिवाळीला आम्ही काय करणार आहोत माहीत आहे का ?–ओळखा पाहू."

चटकन् पराभव स्वीकारण्यात गमत असल्यामुळे मी तशी चिठी देताच बबनशेट हरखत म्हणाला, " आमच्या बेबीकरिता तुमच्या कपनीची ब्युटी पावडर घेणाराय् ! आख्खा एक डबा ! " मोठा नव्हे आपला एवढा–एवढा असतो तो ! गरिबानी चैन करायची झाली तरी ती वाजवी असावी. होय कीं नाही ?–बर, काय हो त्या डब्याबरोबर ते मिळत का ? "

" तें काय ? " मी नवलानें प्रश्न केला.

" ते अस चपट्या चेंडूसारखं, पख पख असतात वाटत. हाता-वरून फिरवल तर काय मजा वाटते—पावडर लावतात त्यान—"

" पफ् " मी सुचविलें.

" अगदीं बरोबर ! पफ् ! तो डबीबरोबर मिळाला बर झाल नाहीं तर तोहि विकत घेणार. हो जाय सो जाय !–बेबीच्या गालाला पावडर

लावायची. त्याला पफ् न घेऊन कस चालेल!–तुम्ही आमच्या च्छिमुरडीचे गाल नाहीं पाहिले, मखमल आहे नुसती! कुरवाळताना काय मजा येते म्हणता–" दारुडा बबन नी हा ससारी बबन! मला हसू आले! ते पाहून बबनशेट सकोचला. तो म्हणाला, "का हो हसलात? मी चुकलों काहीं बोलण्यात? माफ करा अं तस काहीं असल तर."

मी त्याची समजूत घातली.

## मोटार स्टँडवर!

पण त्या वेळेपासून डॉक्टर मजकुराच्या बबनशेटच जीवन कोठवर आल असाव, हे जाणण्याची उत्कठा लागली! मी आपण होऊन त्याचा शोध घेऊ लागलों. व भेटीविषयीं आतुर झालों. त्यात अशक्य किंवा कठीण काहींच नव्हते.

शेवटीं माझी त्याची गाठ एका मोटार स्टँडवर पडली! लागलीच चहाकरिता हॉटेलात गेलो नी पहिला प्रश्न टाकला, "आपला बबनशेट —"

डॉक्टरानीं शब्द फेकला, "खलास!"

"खलास!"

"हो, खलास!" डॉक्टर म्हणाले, "दारुड्या किती दिवस जगणार? उदर व्हायचा. पानथरी सुजायची, लिव्हर फुटायच! हार्टफेल व्हायच! सागतों काय, मेला बिचारा! सुटला! पुढ पुढं त्याची दुर्दशा झाली! बायको निघून गेली! पोर देशोधडीला लागली!–मयतीला मी होतों. सराफकट्ट्यान वर्गणी करून खर्च भागविला!" त्यांनीं सुस्कारा टाकला! आणि मी टाकला!–पुढच्या भेटीला आता हा विषय राहिला नव्हता!

बिचारा बबनशेट चिरायू होवो !

दिवाळी येताच मी आपण होऊन त्याची भेट घेतली व आमच्या कंपनीनें खास तयार केलेली टायलेट बॉक्स त्याला नजर केली ! त्याच्या चिमखड्या बेबीच्या हातांतच ती दिली ! किती धन्यता वाटली बबनशेटला !

वाचकांची क्षमा मागून मी सागतों—

डॉक्टर मजकुरानी असा बबनशेट का निर्माण केला ?—

मी त्याच्या थापा का ऐकल्या ?

बबनशेट, मी व डॉक्टर कधीं एकत्र आलोंच नाहीं का ? आलों नस् तर का आलों नसू ?—मला या प्रश्नाचीं उत्तरे देता येत नाहींत, सुचतहि नाहींत. अर्थात् आम्हा दोघा श्रोत्या–वक्त्याना काय म्हणावें हे तुम्ही ठरवा !—मी एवढें अनुभवानें सागीन कीं — पण नको. आजकाल गोष्टीला 'तात्पर्या'ची आवश्यकता नसते.

## १०    मूषक नी माणूस

[ हा लघुनिबंध नव्हे सूचना अशा करिता कीं, ज्यांना लघुनिबंधाचे वावडे आहे त्यांनी हीं पृष्टें टाळूं नयेत. त्याचप्रमाणे ही लघुकथाहि नव्हे. कारण तसले तंत्र यात नाहीं. शिवाय ज्यांना लघुकथा वाचण्याचा कंटाळा आहे, त्यानी हीं पृष्टे निर्धास्तपणें वाचावी. बोरा एवढा मेंदू असलेल्या उंदरानें त्याच्या मानानें धिप्पाड व शहाणा असलेल्या माणसाच्या जीवनाचा जो विचार केला आहे तो-पण पाल्हाळ नकोच. मात्र श्लील अश्लीलाचा वास घेत वाङ्मय वाचणाऱ्या समंजस लोकानी ही असमंजस गोष्ट न वाचलेली बरी ! ]

### तो पिंजऱ्यांत अडकला !

[ मूषक ]—अरेरे ! केवढा घात झाला हा !–पिंजऱ्यांत ठेवलेल्या एवढ्याशा खवट खोबऱ्याला भाळलों नी स्वातंत्र्याला मुकलों ! देवा, गणेशा, कसारे निसटूं यातून ?—दुष्ट बुद्धीच्या माणसानें

निर्माण करून ठेवलेला हा धोका, मला काय माहीत नव्हता ?— आमच्यातील तरुण मंडळींना, मुलालेकराना, बाया बापड्याना हजारदा मीच हा धोका समजाऊन सांगितला होता. त्याना हडसून खडसून बजावले होते; अन् आज मीच फसलो. प्रहर झाला ! पिंजऱ्याच्या तारा कुरतुडतो आहे, मुक्त होण्यास धडपडतो आहे, दात पडण्याची वेळ आली. अंग ठेचून निघाले ! गणराय, धाव कीरे ! देवा, आम्ही उंदीर केवढेसे नी तो माणूस केवढा धिप्पाड ! त्याचा आमचा सहवास कशाला रे घडवून आणलास ?—अन् वैर तरी का निर्माण केलेस ?—माझ्या सारख्या क्षुद्र जिवाशीं उभा दावा धरणें, या माणसाला शोभते का ? स्वतः वैर करतोच, शिवाय आमचा फडशा पाडण्यास त्या बोकोबाचें साह्य घेतो !—काय न्याय आहे ! गणेशा, बरे का हे !—माझ्या डोळ्यासमोर माझे चार कर्ते मुलगे, चारपाच लेंकीसुना नी दहापाच नातवडे या बोकोबानें मटकावली !—सहन तरी किती करू ?

तें असो परतें. पण माझी सुटका कशी होणार ?––का देवा, आयुष्याची दोरी तुटणार मधल्यामधे ? नका, गणेशा, असा कोप करू नका या दीनावर !—काही ऽ युक्ति काढा नी या दासाची करा एकदा सुटका ! तुमच्या पायाची शपथ !—पुन्हा मी फार—फार सावध राहीन. चागला वागेन. तुमच्या भजनपूजनात काळ घालवीन, नी उरलेलें आयुष्य सार्थकीं लावीन !—संसारात मुळींच लक्ष घालणार नाहीं. बायकोचा मोह धरणार नाहीं की पोराबाळाच्या मायेंत सापडणार नाहीं. प्रतिज्ञाच केली आहे मनाशीं देवा, तुझ्याच पायाची शपथ.

## योग्यता

देवा, आपण सारें जाणतान्. पण उगीच आठवण देतों. मागे

–फार मागे एकदा उदरांची एक फार मोठी सभा भरली होती. आमच्या जातीच्या संहारार्थ उत्पन्न झालेलें बोकोबाचे संकट टाळण्यास उपाय काय करावा ?—याचा विचार करण्याकरिता त्यावेळीं सभेत मोठा कडाक्याचा वाद झाला ! अनेकानी अनेक युक्त्या सुचविल्या ! एकानें मोठ्या दिमाखात सुचविलें की,—माजराच्या गळ्यात घाट बाधावी ! त्याची ही युक्ति सर्व उदराना फारच पसत पडली. तेव्हा सर्वांनी त्या उदराचा मोठा जयजयकार केला नी त्याला राज्याभिषेक करण्याचे टरविले !—इतक्यात गभीर ध्वनि उमटला " थाबा ! "

सभा टकमक पाहू लागली. वयानें पोक्त व बुद्धीने सर्वांत थोर असा एक महात्मा उदीर पुढें आला नी म्हणाला, " माजराच्या गळ्यात घटा बाधण्याची कल्पना ठीक आहे. पण ती अंमलात कोण आणणार ? "

काय सागू देवा, त्या पुराणपुरुषाचा तो मार्मिक प्रश्न ऐकतांच सारी सभा हादरली नी तटस्थ झाली !—गणेशा, तो बुद्धीमान उदीर कोण होता. माझ्या सातव्या पिढीचा खापर पणजोबा !—त्याचा वशज मी !–माझी अशी दुर्दशा व्हावी का ! एका थोर कुलातील मुख्याचा पिंजऱ्यात शेवट व्हावा हें बरे का ?–देवा तुम्हीच विचार करा !

## दांडगा पुरुषार्थ

देवा, गणेशा, पूर्वजाचे पवाडे गाऊन स्वतःची योग्यता पटविणारा शब्दशूर मी नव्हें ! माझाहि पुरुषार्थ काहीं कमी नाहीं. माणसाच्या हिशेबीं परवाच मी माझा सातवा वाढदिवस साजरा केला. पण एवढ्या अल्पकालातहि, देवा, माझ्या ससाराचा व्याप व

विस्तार तर पाहा! कौतुकानें तोंडात बोटच घालाल! केवढा केवढा वंश वेल पसरला आहे! ही एवढी शभर बिऱ्हाडांची चाळ!— माणसे किती! चारशेच्या आतच! पण माझा ससार पाहा! खोली खोलीगणीक पाचपन्नास उदीर सहज आहे! सारा आकडा पाच हजारांवर जाईल!-आणि हे सारे माझेच कुटुब बरें का देवा!-तीनचार पिढ्याचा कारभार! मुलगे, मुली, सुना, नातवडें मी पाहिली असून माझ्या स्वतःच्या घरधनीणीचा पाळणा अद्याप हालतोच आहे!-हसण्यावारी गोष्ट न्यायची नाही देवा!-माणूस किस झाड की पत्ती आमच्यापुढं!-माणसाच्या या अफाट नगराकडे पाहिलेत व ढोबळ गणना केलीत तरी चाळींचाळींतून, घराबगल्यातून माझ्याच वशजानी व भाऊबदानी वसाहती केल्याचे तुमच्या आढळात येईल!-या पुरुषार्थाला काहीच मान नाही?-देवा, तुमच्या राज्यात एक पराक्रमी जीव असा पिजऱ्यात कोडून मरावा का?—

आणि खरें जर विचाराल देवा, तर ससार करण्याची हौस अद्याप मुळींच फिटली नाहीं! परवाच्या सकष्टीची गोष्ट! आमच्या हिने दोन मोठे मोदक आणले लाटून! त्या प्रसादानें जीव तृप्त झाला नी लाडकीच्या हातात हात घालून साऱ्या घरभर पिंगा घातला!-आणि मनोराज्य केले कीं, वर्षा दोन वर्षांत एक नवें साम्राज्य स्थापायचेंच!— माणसाला सळो की पळो करून सोडायचें!—

तुम्हाला माहीत असेल देवा, माणसापैकीं कोणी एक प्राणी शास्त्रज्ञ आहे. त्यानें म्हणे असें भविष्य वर्तविलें आहे कीं, पृथ्वीच्या स्वामित्वाबद्दल **माणूस नी मूषक** याचा जो झगडा चालला त्यात पुढें केव्हातरी मूषकराजच मात करील!—देवा, हें भविष्य अक्षरशः

खरें करण्याची माझ्यात धमक आहे !-माझी एवढी सुटका करा न् पहा माझा पराक्रम !

[ पिंजऱ्याबाहेर धनीण व आप्तेष्ट गाठी भेटीला येतात. ]

[ मूषक ]--या जिवलगानो, मित्रानो, मुलालेकरानो, या असे. कडकडून भेटायलासुद्धा मी मोकळा नाही. गळा कसा भरून येतो. काय बोलू ? काय सांगू ?—प्राणावर बेतलीय खरी—( धनिणीस ) ये लाडके जवळ ये, लाजू नकोस. दे, हातांत हात दे--लाडके, आपला संबंध संपला !

[ साऱ्यानाच गहींवरून येते. बायका रडतात. ]

[ धनीण ]—उगीच धीर सोडूं नये. देव करील काही कृपा !-होईल सुटका. निराश होऊन कस चालेल ?--मग आम्ही कोणाच्या तोंडाकडे पाहायचे. ( गहिवरते )

## माणूस व माणूसपत्नी

पत्नी--( भयभीत स्वरांत ) ऐकलं का ? मला वाटत पिंजऱ्यात बरेच उदीर एकदम सापडले आहेत. काय मेल्याची धडपड चाल-लीय् पाहा. उठाव--आई ! आई !

पुरुष—( त्रासून ) ए—गप्प नीज आता. सकाळीं पाहू.

पत्नी--( दिवा मोठा करीत ) मला बाई भीति वाटते !—( पिंजऱ्याकडे पाहात ) बाई ! दहा उदीर--( उदराची धावपळ )

( पुरुष उठतो. पिंजऱ्यात डोकावतो. )

पुरुष—एकच लठ्या सापडलाय् ! सकाळीं रांडलेका दाखवतो तुला कचका !--कसा चोरासारखा दबून बसलाय् !

## – सकाळीं –

[ मूषकराज पिंजऱ्यातून टकमक पाहात. ]

देवा गणेशा, आटपला सारा ग्रथ !––काय करू !––कसा सुटू ?– छे: ! संपली आशा ! भरली घटका !––देवा गणेशा !–– आला–– माणूस––माझा काळ आला! देवा ! देवा ! अहो करा कृपा दासावर! कसे निष्ठुर होता असे. मी तुमचें वाहन ना?–– अभिमान धरा काही.

( माणूस पतिपत्नी, मुलें, शेजारचे अप्पा, दादा घोळका जमतो. )

**अप्पा**––भाऊसाहेब, माझ ऐका, पिंजरा सरळ बोक्यापुढे धरा ! न् उघडा दार––तो पहा मन्या बोका आलाच–चल–मन्या मन्या– इसपिस इसपिस !

( बोकोबा म्याव ! म्याव करीत येतात )

**दादा**––चल माऊ–हा बघ तुला केवढा लठ्ठ खाऊ––

**भाऊ**––केवढा लोद्या आहे !–बोक्याला सबंध सरायचासुद्धा नाहीं. थाब अं––दावतो तुला इगा––मन्या–मन्या ( पिंजरा लीलेने हालवतात )

**मूषक**––काय माणसाची जात आहे !–प्रत्येकाला माझा लठ्ठपणा दिसतोयय् जणू काय, मला पोसण्याचा भार सर्वांनी उचलला होता ! थाबा लेकोहो ! दैव हात देऊ दे ! नाही निसटलों तर नाव बदलीन ! देवा गणेशा, संधी द्या बर अनाथाला––

**अप्पा**––ह भाऊसाहेब, आता खेळत बसृ नका ! मन्या चल, हं–अलगद् दार उघडा !–बेतान–ह–सावध––

पत्नी—माजर हातावर फटकारा मारील अं–पिंजरा नीट अलगद् धरावा. दार कराव मोकळ–अस्स ! लीले, मधू, किश्या बाजूला व्हा पाहू——

भाऊ——( पिंजरा झाडीत ) पळ–पळ—लेका, मन्या साभाळ–लड्या पळ--पळ--आ ! चावण्याचा प्रयत्न करतोस ?–अरे चोरा थाब अ—तुला दाढेंतच देतो मृत्यूच्या—

( पिंजरा निसटतो. उघडा होतो. दार उघडे पडतें. उदीर-मामा संधि साधतो. माजर झडप घालणार तों पोराच्या धादलीने उदरास निसटण्यास पुरती सवड मिळतें !– ' पळाला ! मन्या पकड ? हत् लेका ! निसटला !-' साऱ्याची तिरपीट— )

[ मूषकराज एका डब्याआडून ]

मूषक—( अभिमानानें ) जिंकली !–कसा निसटलों !–शाबास ! पठ्ठे ! जीतो रहो !–बोकोबा राम राम ! भाऊसाहेब नमस्ते ! खुशाल हुडका !–आता नाही सापडत !–महाराजा, अस धाडस लागते ! शूरावीराचा पराक्रम आहे हा !– कशी उडी दिली झोकून ! कशा तुरी दिल्या !– बोकोबा खुशाल ओरडा ! वातावरण निवळल की घर गाठायच !– तो पर्यंत माणसाची मजा पाहू.

## भाऊसाहेब त्यांच्या राणीसरकार !

पत्नी—बाई ! उदीर निसटला !– अस कस झाल बाई ?

भाऊ—कस झाल ? त्यान दगा दिला खरा—

पत्नी—अन् बोका काय करीत होता ?

भाऊ·–( हसत ) अहिंसाव्रताचा विचार करीत असावा.

पत्नी—मेली माजरं अलीकडे उदीरच पकडेनाशी झाली आहेत. त्याना खायला घातल नाहीं पाहिजे. अगदीं उपाशीं ठेवल पाहिजे त्या मन्याला–आज रात्रीं पुन्हा त्रास ग बाई —

भाऊ—अग पुन्हा आज पिंजरा लाऊ—

[ मूषकराज मिशा साफ करीत ]

मूषक—माणसा, खुळ्या माणसा–नव्हे दुष्ट माणसा, आता तूं एक सोडून दहा पिंजरे लाव नी त्यात पेढ्याची ताट भरून ठेव. हा पठ्या काही आता तुझ्या तावडींत सापडणार नाही !–न् एका वर्षात एवढी प्रजा निर्माण करतो ! खोली सोडून पळून जाशील बेटया ! चला गमत झाली !– शेवटपर्यंत धीर सोडता कामा नये हेंच खर. माझ्या लाडकीन हेंच मागितल होत काल ! हिम्मत मर्दा, मदत खुदा ! ऑ !–म्याव ! म्याव !–बोकोबा ओरडताहेत ! दिवसभर कठ शोष करू देत ! या पठ्यान हात दाखविलाच !– मघाशीं भाऊसाहेबाची बायको काय बर म्हणाली-बोक्याला खाऊ घालता उपयोगी नाहीं. अगदीं स्तुत्य विचार ! त्या माऊलीन तस कराव !– अगदीं हाल हाल करून मारा म्हणाव त्या मन्याला ! दुष्ट ! —

[ मूषकराज स्वकीयांत आल्यावर ]

काय सागू मडळी, आज माझ्या पराक्रमाची शर्थ झाली ! सोन्याची फुल उधळली पाहिजेत माझ्यावर ! छे छे छे ! आजच्या माझ्या शौर्यांधैर्याला, प्रसगावधानाला नी धाडसाला तोड नाहीं महाराजा ! स्वातत्र्य काय फुकटा फुकटी मिळत ?–मडळी, निधडी छाती पाहिजे, आवेश पाहिजे, तळहातावर प्राण घेऊन प्रसंगाला

तोड दिल पाहिजे ! काय समजल ?–मडळी, तुमच्यापैकीं त्यावेळीं कोणी तरी आजूबाजूला असायला पाहिजे होत !–भाऊसाहेबाला असा हात दाखवला ! बोक्याची तर फटफजिती केली नुसती !– अं–ह नवलान पाहू नका. काल पिजऱ्यात मी घाबरलों होतों म्हणता ! मुळींच नाहीं. खरा वीर प्रसगाला मुळींच डगमगत नाहीं !– काय कळल !–एवढच आहे कित्येकदा सोग कराव लागत ! - तुम्ही सगळी मडळी शोकात. मी कसा बर शौर्याची भाषा काढू ?-- शोभेल असा घाबरलों थोडासा ! बाकी आतून छाती दगडाची होती ! विचार करीत होतो–माणसाचा सूड कसा उगवावा ! नी बोकोबा तडाक्यात सापडल्यास त्याला कसा उलथा पालथा करावा ! रात्रभर विचार केला राजानो, न् काय ? सकाळ झाली मात्र छाती-ठोक तयार झालो पुढच्या लढाईला !

मडळी, आता सागतो कमा डाव टाकला तो !—तरुण मडळी नीट लक्ष द्या बर. ( बायकोस ) ए–तुझ लक्ष आहे ना ?–छान. आता प्रसग ऐकाच.

सकाळ झाली. माणम माझ्या पिजऱ्याभोवतीं जमली. सर्वांनी ठरवल मला बोक्याच्या तडाक्यात द्यायच. जमलेले प्रत्येक माणूस माझा सूड घेण्याची नवी नवी शक्कल काढीत होते नी मनात माडे खात होते. मी घाबरल्याचें सोग घेऊन गमत पाहात होतो. इतक्यात एक तो लठ्ठ्या मन्याहि मॅव मॅव करीत आला !–विचार करा मडळी, मी बदींत पडलेला ! भोवताली शत्रूचा कोट ! सुटकेची आशा नाहीं. अन् सुटलों तरी पळून जाण्यास सवड नाहीं !— एखादा लेच्यापेच्या असता तर भीतीनें तिथेंच मेला असता !— पण मी समुद्राप्रमाणें शात व पर्वताप्रमाणें गमीर होतो !–सकटात डगमगेल तो वीर कसला ?

आता पुढची मौज ऐका! दृश्य थरारून जाईल नुस्त. त्या माणसानें पिंजरा असा बोक्यापुढें धरला! बोका मारे पंजा उगारून तयार झाला! मीहि संधि पाहू लागलो. तोंच काय चमत्कार झाला. पिंजरा धरलेल्या माणसाचें बोट असें माझ्या जबड्यासमोर आलें— मग काय महाराजा, ताराच्या अरुंद बेचकेतून मुंडके खुपसलें नी जिवाची पर्वा न करिता त्या माणसाचें बोट काडकन् फोडलें!—दहा हात रक्ताची चिळकांडी उडाली! माणूस बोंबलत उठला! पिंजरा पडला उपडा झाला! दार उघडें पडलें!—बाहेर बोकोबा तोंड फेंदारून तयार होते. पण मी भितों काय! वीरश्रीनें धुंदच झालों होतों! सरळ त्याच्या अंगावर तुटून पडलों—

उंदरीण—बाई! म्हणजे? बोक्याच्या अंगावर धावून गेला आपण! शर्थच झाली!—

मूषक—( ताठ्यानें )—सांगतों काय!—त्याचें नरडच फोडणार होतों. पण एखाद्याचा उगीच प्राण घेणें बरें काय?—त्याचें नाक तेवढें नकटें केलें नी दिला सोडून! बोका तशीं साठ मैलांच्या वेगानें पळत सुटला! बिचारा अद्याप विवळत पडला असेल कोपऱ्यांत—

[ सर्व मूषक स्तुति करीत जातात. ]

मूषक—( स्वगत )—भल्या माणसा, माझी ही बढाई ऐकलीस की तू खो खो हसत सुटणार हें मी जाणून आहे. पण खरेंच सांग गड्या, तुम्ही माणसें असेंच नाहीं का वागत?—जीवनात काव्याला जितकें महत्त्व आहे तितकेंच व्यवहारात खोटें बोलण्याला नाहीं का? जें जसें घडतें, बनतें किंवा असतें तें तसेच्या तसें तुम्ही सांगतां का? बेट्यानो, इतिहास तरी सत्याला धरून लिहिलेला असतो का?— युद्धाच्या गप्पा मारताना तुम्ही या बोटावरची थुंकी या बोटावर

करताच ना? जयाची वार्ताहि नसता विजयाचे निश्चय सागताना ?– मग माझी बढाई तुम्हाला का डाचावी ?––

[ दीड प्रहर रात्रीच्या सुमारास सर्वत्र सामसूम झाल्यावर–

मूषक नी त्याची पत्नी याची पाठशिवणी सुरू झाली ! ]

मूषक––आमच्या हिच्या डोक्यात हे काय वेड शिरलेंय ! सारखी धावपळ ! माझ्या वाऱ्यालासुद्धा उभी राहणार नाहीं म्हणते ! वा ! काय शहाणपण आहे !–( धावतो ).

मूषकी––सोडावी माझी शेपटी !–मी आता आपल काहीं ऐकणार नाहीं !–झाला एवढा ससार पुरे झाला !

मूषक––ऑ !–ससाराला इतक्यात कटाळलीस ?–नवल आहे ! वेड तर नाही लागल ? रात्र किती गमतीची आहे––

मूषकी––नकोच ते गोड बोलणे.

मूषक––अग पण–त्याचें अस आहे––

मूषकी––ते मला सार माहीत आहे.–जरा वयाकडे पाहावं आता. देवाधर्माला लागा आता मुकाट्यान.

मूषक––पसत–पसत आहे तुझी कल्पना ! चार दोन दिवसात करू त्याचा विचार !–तोंपर्यंत आधी प्रपच करावा नेटका !

मूषकी––मुळींच नाहीं. मी व्रतस्थ राहाण्याचा पण केलाय !

मूषक––छान !–पण त्यामुळ दाम्पत्यधर्म टाळावा, असं नाहीं काहीं–पहा कशी खुदकन हंसलीस ! ( दाडगाई करतो, )

मूषकी––ही काय दाडगाई ! काल पिंजऱ्यात अडकला होता, त्या वेळची करा आठवण जरा. किती पश्चात्ताणत पडला होता त्यावेळीं सकटातून सुटलों की भजनपूजनास लागीन म्हणून आणाभाका वाहिल्यात. तें सारं थोतांडच वाटत !

मूषक––दुधखुळी रे दुधखुळी ! अग, संकटांत सापडल्यावर

पश्चात्ताप करावाच लागतो मुळीं ! देवाच्या नावान टाहो फोडायचा, तोंडात मारून घ्यायच्या, आश्रू ढाळायचे, शपथा वाहायच्या !—सकट टळल ! पश्चात्ताप खलास ! मागून त्या गोष्टी आठवण्यात अर्थ काय ! तेव्हा चल सुखाची रात्र वाया घालवण बर नाहीं.

[ जोराची धावपळ ]

[ माणसाच्या जगात. माणूस व त्याची पत्नी. अंथरुणे पसरली आहेत, जवळ दोन मुलें नीजली आहेत. दिवा साधारण बारीक. पतिपत्नी काहींतरी चिंतेत व्यग्र. वरच्या बाजूस उदराची धावपळ चित्कार ! गडबड ! ]

**बायको**—( घाबरून त्रासून ) बाई ! बाई ! या उदरानी तर नको जन्म केला !—काय धावपळ ! मेल्यानो, टाळक्यात पाडा वरून काहीं. म्हणजे तुम्ही सुटलात आम्ही सुटलो ! ( दिवा मोठा करून ) —बाई ! पाहिल—तो पाहा लोच्या ! - पहा मेला कसा लुकू लुकू पाहातोय् !—मला वाटत, सकाळीं पिंजऱ्यातून पळून गेलेला तोच असावा !—पाहिल त्या दुसऱ्या उदराच्या माग धावला !—पाहा धावतोय कसा ?—

**नवरा**—भाडू देत ! नवराबायको असतील !—न् तीं आपसात खरच भाडताहेत का ? प्रेमविनोद करताहेत. कोणी सागाव—तिकडे नको लक्ष देऊंस. न् तेवढा मालवून टाक बर आता—

**बायको**—अं—ह ! मी एवढा श्लोक लावणार आहे गीतेचा !—ध्यायते विषयान्—पुस:—ह सागावा याचा अर्थ. म्हणजे मन लागेल दुसरीकडे—( पुन्हा वाचू लागते. नवरा पुस्तक हिसकावून घेतो. आणि बाजूला फेकतो.

[ सुस्कारे ! सुस्कारे ! ! ]

[ वळचणीला मूषकराजा मूषकीसह माणूस जोडप्याकडे कौतुकानें पाहातो. हसतो.]

मूषक—आता देवाधर्माची करू या चर्चा ।

मूषकी—चला बोलू नका माझ्याशीं ? दाडगाई करून छळ करायचा माझा-नी-मागून थोताड करायच-

मूषक—चालायचच !

मूषकी—चालायचच काय ? खालच्या माणूस माणसीकडे पाहाव कस शात न् विचारी आहे. देवाधर्माकडे कस लक्ष आहे त्याच-माणसाला शहाण म्हणतात ते उगीच नाहीं. का, इतक हसायला काय झाल ?-

मूषक—खुळी आहेस. भोळी आहेस. वेड्या मूषकी, माणसाच्या कृती वृत्तीकडे अस उथळ दृष्टीन पाहू नकोस. फसशील ! तें जोडप काय सुखासुखी स्वस्थ बसलय् ? मुळींच नाहीं. त्याच्या त्या चिंतातुर मुद्रा पाहा. त्याची परस्पराकडे पाहाण्याची उत्सुकता पाहा, तळमळ पाहा, सुस्कारे लक्षात घे. जवळ जवळ बसून ते जोडप विरहानलात पोळत आहे !-निसर्गाच्या ओढीप्रमाण त्यानाहि दाम्पत्यधर्म पाळण्याची तीव्र उत्कंठा आहे-

मूषकी—मग अडलय् कशात !

मूषक—कशात ?-त्याचीं साधन आज खलास झाली आहेत ?

मूषकी—म्हणजे काय बाई !

मूषक—तें माणसाच शास्त्र आहे. उदराना ते कळायच नाहीं. न् तुझ्या गळीं उतरायला तर जन्म पुरायचा नाहीं.

मूषकी—बाई !-पण आपल्याला बर कळल हें ?

मूषक—थोडा तसा विचार केला म्हणून !—दोन आठवड्या-पूर्वीची गोष्ट. तू प्रसुतीगृहात होतीस न् आमची स्वारी तुझ्याकरितां

काहीं चविष्ट खायला आणावं म्हणून भटकत होती. त्या वेळीं सहज मनात आल, आपण माणूस झालों तर काय मजा होईल. म्हणून तसाच गणरायाकडे गेलों नि माणूस बनवा म्हणून घेतला हट्ट. ते हंसले व म्हणाले—या घरातल्या माणूस जोडप्याचा आयुष्यक्रम नीट पाहा. त्याची जीवनविषयक धडपड, त्याच्या अडचणीं, त्याचीं सुखदु:ख सार नीट बघ. मग ये माझ्याकडे. अस म्हणून त्यानी माझ्या मस्तकावर हात ठेवला. या प्रसादान मला विवेक ज्ञान आल—

मूषकी—मग अनुभव काय आला ?

मूषक—अगदीच विचित्र ! उदराच्या मानान माणूस शहाणा असेल कदाचित, पण दु:खी मात्र फार आहे. तुला माहीत आहे. माणसान आपल सार ज्ञान साठवल आहे पुस्तकात. मी त्यापैकीं काहीं ग्रथ चाळले !—माझ्या हातात पहिल पुस्तक कोणत पडल, माहीत आहे ? सततिनियमनाच !

मूषकी—( नवलानें ) काय म्हटलत ?—सततीनियमन ?— अन् ते का ?

मूषक—मनुष्य झाल पाहिजे ते शास्त्र कळायला !—मी तुला एक विचारतों !—आपल्या मुलाबाळाची पोट कशीं भरतील ? ही काळजी तुला कधीं वाटतें का ?—नाही ना !—तसं माणसाच नाही. त्याला आपल व आपल्या मुलाबाळाच पोट कस भरेल हीच प्रमुख चिंता ! म्हणून त्याला मुल नकोशी वाटतात !—खालच जोडप त्या चिंतेंत आहे. सुख पाहिजे मुलं नकोत !—कळल ?

मूषकी—अं—ह ! काही नाहीं.

मूषक—तू एवढ्याशा डोक्याची उदरीण ! तुला नाही कळायच तें. माणसाचा गाढवपणा अजब आहे !—तो ज्ञानी आहे. हिकमती

आहे, धूर्त आहे! तो शेत पिकवतो नी अन्नवस्त्राचे डोंगर निर्माण करतो. पण तें सौख्य तो वाटून घेत नाही. तसा तो मोटा स्वार्थी नी दुष्ट आहे! तो केवळ उदराचा वैरी नाही! आपसातहि तो राक्षस-वृत्तीन वागतो. एक अजीर्ण होण्याइतकं खातो नी दुसरा त्याच्या समोर उपाशी मरत असतो!

मूषकी—माणूस!–वेदांताच्या गप्पा मारतात, साऱ्या जगात बंधुभाव वाढविण्याचा डांगोरा पिटणारा, समता, स्वतंत्रता म्हणून नाचणारा माणूस इतका दुष्ट–नीच आहे!—

मूषक—निःसंशय!–माणसान ज्ञानान प्रचंड वैभव मिळवल नी राक्षसी स्वार्थापायीं तें धुळीला मिळवल!–माणसाइतकी भांडण, स्वार्थ, हव्यास, दुष्टपणा अन्यत्र नाहीं!–माणूस माणसाला खातो! आणि त्याला जीवनकलह अस प्रचंड नाव देतो. "मला सार काहीं पाहिजे. तू मेलास तरी हरकत नाहीं." अस ताटयान बोलून पायातळीं दुसऱ्याला चिरडणारी माणस आहेत न् राष्ट्रंहि!–सबळानी चराव नी दुर्बलानी त्याच्या लाथा खात मराव अस माणसान आपल विचित्र शास्त्र निर्माण केलय्! अन् यात दुबळया जिवाच कल्याण आहे अशी त्याची द्वाही आहे!

मूषकी—मग दुबळीं माणस हें सहन कस करतात?

मूषक—त्याचहि माणसान शास्त्र केलय्! दुर्बलाला चिरडून भरडून काढण्याच्या नाना योजना आहेत!–आणि त्या साऱ्या सुंदर मोहक भाषेच्या चौकटींत बसवून वेशीवर लावलेल्या आहेत! त्या पाहून प्रत्यक्ष परमेश्वरालाहि आपल्या बुद्धीचा विश्वास वाटत नाहीं. जगाचे पालक इतके न्यायप्रिय, उदार मनस्क, स्वार्थत्यागी असता, आपण आणखी दुर्बलाचे कैवारी म्हणून घेण्यात अर्थ काय!–असाचा विचार जगन्नियत्यास पडला असावा!–दुष्टानी निर्माण

केलेल्या परिस्थितीन लक्षावधी–कोट्यावधी जीव गाजले असताना आणि अन्यायाची व अत्याचाराची शीग पोंचली असताना राक्षस मलीदा खात आहेत न् पापभीरू दुर्बळ अन्नाच्या कणाकणाला महाग झाले आहेत!–धन्याला धक्का नी चोराला मलिदा हा उलटा न्याय किंवा घोर अन्याय माणसाइतका अन्यत्र नाहीं. मूषकी, तू माणूस नाहीस हें भाग्य मान !

मूषकी—आई ! आई ! किती ज्ञान मिळवल आहेत हो !

– समाप्त –